

# माणूस

७ एप्रिल १९७३ । पन्नास पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

७ एप्रिल १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा — अंक : चव्वेचाळीस

## सप्रेम नमस्कार....

□ आपल्या मार्च २४ च्या अंकातील 'सखाराम, दो राहा आणि दैनिके' हा सौ. शकुंतला फडणीस यांचा लेख वाचला. लेखिकेने मांडलेले मुद्दे योग्य वाटले; पण यात एक गोष्ट खटकते. कारण आपण 'माणूस'च्या मुखपृष्ठावर 'बिन्नी'शो रूमच्या जाहीरातीला स्थान दिले आहे. हे छापण्यामागे आपण 'माणूस'ची सवंग जाहिरात करण्याचा प्रयत्न करीत आहात नव्हे काय ?

२६ मार्च, ७३. व्ही. डी. म्हेत्रे, मुंबई.

[ माणूस शुद्धता मानतो. सोवळेपणा नाही. मुखपृष्ठ अंकातील लेखाशी जोडलेले आहे. हा संदर्भ सोडून ते वेगळे, तुटक पाहिल्यास सवंगच काय ते कुणाकुणाला अश्लीलही वाटल्यास निरुपाय आहे. —संपादक ]

□ दिनांक २४ मार्च, ७२ च्या अंकातील सौ. शकुंतला फडणीस लिखित 'सखाराम, दो राहा आणि दैनिके' हा लेख वाचला. या लेखातील बरीचशी विधाने सरळधोट पद्धतीची वाटली आणि म्हणून सौ फडणीस यांना काही प्रश्न.

१ : दैनिके अश्लील जाहीराती छापतात आणि त्यामुळे 'अजाण मुलांच्या' आणि मुलांसारख्याच 'कोवळ्या बुद्धीच्या बहुजनसमाजाच्या' मनात विकृती निर्माण होतील असे वादासाठी मान्य केले तरी खरोखर किती लोक दैनिके वाचतात ? चार कोटी मराठी जनतेचा विचार केला तरी जेमतेम वीस टक्के साक्षरतेच्या प्रमाणात साधारण एकदोन टक्के लोकच वृत्तपत्रे वाचीत असतात तेव्हा कामुक जाहीरातीचा

मुखपृष्ठ : मीनाकुमारी चित्रकार : अनंत सालकर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७६५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

परिणाम झालाच तर तो अत्यल्प होईल हे खरे आहे ना ?

२ : भडक जाहीराती, अश्लील वाङ्‌मय; नाटके, सिनेमे यामुळे माणसाच्या मनात विकृती निर्माण होतात. याला काही सबळ संशोधनात्मक पुरावा आहे काय ? माणसाच्या सर्वंकष ऱ्हासाला कारण असलेली आर्थिक विषमता आणि परंपरांची गुलामगिरी हेतुतः विसरून इतर फालतू गोष्टींची भुई धोपटण्याचा उथळपण आपण किती दिवस करणार आहोत ?

३ : भारतीय समाज जडणघडणीच्या दृष्टीने अजूनही भांडवलशाही आणि सरंजामशाहीच्या चौकटीतच गुदमरतो आहे. अशा समाजात स्त्री भोग्य वस्तू मानली जाणे आणि तिच्या देह प्रदर्शनाचा व्यापारी उद्दिष्टांसाठी वापर होणे अपरिहार्यच नाही काय ?

४ : भांडवलशाही समाजरचनेत वृत्तपत्रे हा प्रायः जाहीरातीवर जगणारा 'व्यवसाय' असतो आणि त्यामुळे जाहीरातीच्या रचनेबद्दल वा मसुद्याबद्दल चिकित्सक भूमिका घेणे वृत्तपत्रांना परवडण्यासारखे नसते हे सौ. फडणीसबाईंना ठावूक नाही काय ?

५ : रस्तोरस्ती टांगलेल्या भडक-कामुक जाहीरातींविषयी बोलायचेच तर स्वतःच्या देहाचे उत्तान प्रदर्शन करणाऱ्या आखूड, घट्ट आणि झिरझिरीत कपडे घालणाऱ्या आपल्या भगिनींबद्दल सौ. फडणीसांना काय म्हणायचे आहे ?

६ : कामुक जाहीरातीचे समर्थन करणे गैरच आहे. पण कामुक जाहीरातीवर घसरून, 'सखाराम, दो राहा' इत्यादी नाटक चित्रपटांची वकिली (की फडणविशी ?) सौ. फडणीस करीत असल्याचा दाट संशय येतो. प्रागतिकता आणि लेखकांचे स्वातंत्र्य या दोन गोंडस गोष्टींच्या पांघरुणाखाली नग्नता आणि लैंगिकता यांचे समर्थन करण्याची सध्या शिष्टसंमत प्रथा आहे. नुस्ते अश्लील चित्र पहाणे आणि दोन जिवंत स्त्री-पुरुषांनी स्टेजवर वा पडद्यावर अश्लील वा कामुक चाळे करणे यात सौ. फडणीसबाई फरक करीत नाहीत काय ?

आणि शेवटचा सवाल माणूसच्या संपादकांना आहे. वृत्तपत्रांतील अश्लील जाहिरातीवर टीका करणारा लेख छापून.. एक अश्लील चित्र स्वतःच्याच नियतकालीकाच्या कव्हरवर छापून आपण त्या दैनिकांच्या माळेचेच एक मणी आहोत हेच माणूसच्या संपादकांनी सिद्ध केले नाही काय ? 'माणूसचे' समाजाभिमुक स्वरूप आणि ध्येयनिष्ठा या दोन संदर्भात मुखपृष्ठावरचे चित्र खटकले आणि खेद वाटला.

२७ मार्च ७३. राजा राजवाडे, मुंबई.

□ दि. १७ मार्चचा 'माणूस'चा अंक वाचला. या अंकातील श्री. चंद्रकांत अंबार्ड, सौ. तारा पंडित यांचे लेख आवडले. आंध्र-तेलंगण वादासंबंधी श्री. भारत देगलूरकर यांचा लेखही वाचला. मी 'माणूस'चा नवीन वाचक आहे. आजपर्यंत मधून मधून 'माणूस' वाचत असे. हल्लीच्या अंकात मुंबई-वार्तापत्र का नसते समजू शकत नाही.

# याला कुठेतरी आळा घालण्यासाठी 'मनगटी' बळ वापरावे लागेल

पूर्वी श्री. अरुण गोसावी ते सदर लिहीत असत.

याच अंकातील श्री. दि. बा. मोकाशी यांचा लिंगवादासंबधीचा लेखही वाचला व खूष झालो. त्यांनी कामशास्त्रा-संबंधी जे काही सांगितले आहे त्याचा शासन विचार करणार आहे काय? नग्न स्त्रियांचे फोटो सनसनाटीसाठी छापणारे अघोर कृत्य करत आहेत. मुलेही नग्न फोटो या वयात पहातात हे योग्य नव्हे. स्वैर कल्पना देणाऱ्या लेखकांनाही त्यांनी आपल्या लेखात कानपिचक्या दिल्या आहेत त्या योग्यच आहेत. कामसेवनाचे ज्ञान दिले जावे हे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केलेले मत मला पटले.

लिंगवाद आणि झुंडवाद हा आपला लेखही वाचला. खरे सांगायचे तर मी नाही म्हटले तरी जर इतर उपायाने न्याय मिळत नसेल तर झुंडशाहीनेच मिळवावा या मताचा आहे. विजय तेंडूलकर यांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकाने ११ भारतीय भाषात भाषांतरित होऊन पहिले पारि-तोषिक मिळविल्याबद्दल आम्हाला फार आनंद झाला. पण भविष्यकाळात हेच विजय तेंडुलकर संभोगदृश्ये असणारी नाटके लिहितील असे वाटले नव्हते. आता तर त्यांना समाजातील वाईटच दिसते की काय? चांगले दिसतच नाही काय अशी शंका मनात येते. नाहीतर ते सखारामाप्रमाणे, घाशीराम लिहितेच ना? न जाणो उद्या तुकाराम महाराज, रामदासांवर असे काही ते लिहितील आणि मग जरी लोकशाहीने त्यांना तसे स्वातंत्र्य दिले असले तरी याला कुठेतरी आळा घालण्यासाठी 'मनगटी' बळच वापरावे लागेल! लेखणीचा सामना लेखणीनेच करावा हे ठीक पण एखादा दारुडा नशेत वाट्टेल ते चाळे करू लागला तर त्याच्या काना-खाली आवाज काढून त्याची नशा घालविणे योग्य नव्हे काय? का तेव्हाही सत्याग्रह करावा व म्हणावे, 'दारू पिण्याचा त्याला लोकशाहीत अधिकार आहे, आणि त्यात आता गरिबांसाठी सरकारने दारू स्वस्त केलीच आहे!'—नाही, कुठे ना कुठे आळा घालावाच लागतो. पण आपण याला विरोध केलात तरी लेख संपव-ताना आपण म्हणता, 'आमजनतेची सांस्कृतिक अभिरूची बिघडवणाऱ्या हजारो झगमगीत मदिरा व मदिराक्षी केंद्रांकडे दुर्लक्ष करून मूठभर प्रेक्षकांच्या आश्रयावर जेमतेम जगणाऱ्या तेंडूल-करांच्या नाटकांवरच निर्मूलकांनी एकदम धाड का घालावी?' याचाच अर्थ काय तर आपले म्हणणे, 'अशा कॅबरे हॉटेलांवर यांनी धाड का नाही घातली? पण म्हणजे श्री. ग. मा.,

आपण न कळतच झुंडशाहीचे समर्थन करता! सखारामवरील धाडीचा निषेध करता मग ही कॅबरे हॉटेलावर झुंडशाही व्हावी असे का आपल्याला अभिप्रेत आहे? एकंदरीत आपल्या विचारात गोंधळलात! असो. अर्थात् मलाही वाटते, 'नाटकांपेक्षा या कॅबरे हॉटेलांवर जाऊन झुंडगिरी करावी.' 'मनगटी' जोरवाल्यांनो, चला हॉटेलां-वर (कॅबरे), दारूअड्डे, मटकाअड्डे — दाखवा मनगटो जोर. श्री. ग. मा. स्पष्टोक्तीबद्दल राग नसावा.

जय महाराष्ट्र!

२० मार्च, ७३ माधव ल. बिवलकर,
गिरगाव.

□ आपल्या २४ मार्चच्या माणूस अंका-तील 'राऊ आणि जया' यांची हकी-गत ऐकून शहारे आले. आपण स्वातं-त्र्यात आहोत का पारतंत्र्यात आहोत, लोकशाही राज्यात आहोत का हुकूम-शाहीच्या राज्यात आहोत हेच कळेनासे झाले आहे. अनिल बर्वे याची विचार-सरणी असे प्रसंग, घटना पाहूनच तयार झाली असावी यात शंका वाटत नाही. आम्ही युवकांनी हे असले प्रसंग एक आव्हान समजले पाहिजे. अन्याय, अत्याचार ह्याचा प्रतिकार करण्यास सिद्ध झाले पाहिजे. कारण शासनयंत्रणे मार्फत न्याय मिळेल की नाही माहीत नाही. एका गरीब महिलेचा पाशवी अत्याचाराने मृत्यु होतो, अन् तक्रारी—आरडाओरड केल्यावर जाग येते, ही गोष्ट दूषणास्पद आहे. याप्रसंगाने माझी एक आठवण नमूद करावीशी वाटते १९४३-४४ सालची गोष्ट. पुण्याहून लोक अरण्येश्वरला मुद्दाम एकादशी—शिवरात्रीला जात असत. त्यावेळी स्वारगेटाच्या पलीकडून सारा रस्ता निर्मनुष्य असायचा. त्यावेळी आम्ही काही मुली—बायका स्वारगेटाच्या पलीकडून जात होतो. तेवढयात इंग्र-जांच्या दोन जीप्स भरधाव वेगाने आल्या. त्या पाहून, त्यातील गोरे लोक पाहून आम्ही घाबरून झाडाच्याकडेला उभ्या राहूलो. तितक्यात मागून एक जीप आली अन् थांबली. त्यातील एक-दोन गोरे सार्जंट खाली उतरून आमच्यातील एक-दोघींशी लगट करू लागले. त्यांनी एकीचे पातळ धरून ठेवले. आठ-दहा बायका—घाबरलेल्या पण साऱ्यांनी मिळून जोर लावला व त्या बाईला ते पातळ सोडून देऊन ओढून काढले अन पळ काढला. गोरे सार्जंट मात्र शरमिंदे होऊन जीपकडे गेले. आम्ही तशाच उलटबाजूने पळत पळत स्वारगेट गाठले! आमच्या पोलिसांनी केवळ पुढाऱ्याच्या सांगण्यावरून देशद्रोहीपणा करावा, ही बाब आमच्या स्वातंत्र्याला, लोकशाहीला काळीमा आणणारी आहे. आपल्या अंकातील कात्रण, मुद्दाम श्रीमती इंदिरा गांधी यांचेकडे पाठवित आहे. निदान बाईची अब्रू कशी लुटली जात आहे ती स्त्री या नात्याने समजून घेतली तरी पुरे!

२४ मार्च, ७३. सौ. सुनीता श. जोशी,
नासिक

●

# दुष्काळ मदत धोरण
# एक शतकापूर्वी केल्या गेलेल्या काही सूचना

निवेदक : कुश

महाराष्ट्रामध्ये गेली तीन वर्षे दुष्काळाचे वातावरण आहे आणि त्यातही यावर्षीचा दुष्काळ अतिशय तीव्र आहे. दुष्काळात लोकांचे होणारे हाल विविध वृत्तपत्रातून सविस्तर वर्णन केले जात आहेत. तसेच दुष्काळग्रस्तलोकांना कशाप्रकारे मदत करावी याच्याही अनंत सूचना केल्या जात आहेत. सुमारे १०० वर्षापूर्वी महाराष्ट्रात अशीच तीन वर्षे दुष्काळाची गेली होती. १८७६ ते ७८ या वर्षात भारतात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ महाराष्ट्रात विशेषत: पुणे, सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्यात अतिशय तीव्र होता. या काळात त्यावेळी अस्तित्वात असलेल्या 'पुणे सार्वजनिक सभा' या मातबर संस्थेने दुष्काळासंबंधी अभ्यास करण्यासाठी खास प्रतिनिधी पाठविले होते. या प्रतिनिधींनी पाठविलेले अहवाल एकत्र करून 'दुष्काळ कथा' या नावाने सरकारला सादर करण्यात आले. आजच्या दुष्काळ कथा वाचताना लोकांच्या अडचणी आणि त्यावेळच्या अडचणी यात विलक्षण साम्य दिसून येते. तसेच त्या दुष्काळ कथातून जे दुष्काळविषयक धोरण सांगण्यात आले आहे ते आजही बरेच उपयोगी पडण्यासारखे आहे असे वाटते. म्हणूनच या लेखात हे धोरण वर्णन करण्यात आले आहे.

पुणे सार्वजनिक सभा ही पुण्यातील त्या काळातील मातबर लोकांनी स्थापन केलेली संस्था होती. काही काळ न्या. रानडे या सभेचे कार्य चालवित होते. ही संस्था १८७० साली स्थापन झाली आणि लोकांच्या गरजा व इच्छा सरकारला सादर कराव्यात असा तिचा प्रमुख उद्देश होता. दुष्काळ कार्य बघण्यासाठी प्रतिनिधी नेमण्याचे काम तसेच त्यांनी पाठविलेले अहवाल एकत्र करून दुष्काळ कथा तयार करण्याचे काम न्या. रानडे यांनी स्वत: केले. अर्थात हे अहवाल सरकारला सभेच्या सेक्रेटरीच्या सहीने पाठविण्यात आले. असे एकूण ५ अहवाल तयार करण्यात आले आणि ऑक्टोबर १८७६ ते मार्च १८७७ या काळात ते सरकारला पाठविण्यात आले. पहिल्याच अहवालात, देश दुष्काळाच्या संकटात सापडलेला असून धान्य, पिण्याचे पाणी व जनावरांसाठी चारा या सर्वांचे अत्यंत दुर्भिक्ष आहे असे नमूद करण्यात आले आहे. या अहवालांवरून दुष्काळ निवारण कार्यासंबंधी पुढील धोरणे अवलंबिली पाहिजेत असे सुचविल्याचे दिसते.

१ : सरकारने रेल्वे व कालवे या

सारखी मोठी कामे हातात घ्यावीत. छोटया कामावर अनेक जणांना काम मिळू शकत नाही. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे लोक खेडयातून स्थलांतर करून इतरत्र जातील तेव्हा अशा ठिकाणी त्यांना कामे देता येतील. अनेक मजूर एका ठिकाणी काम करीत असल्यास त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे सोपे जाईल.

२ : अशा प्रकारची मोठी कामे मंजूर होण्यास आणि सुरू होण्यास बराच वेळ लागण्याचा संभव आहे. तोपर्यंत गावोगावी छोटी कामे सुरू केली पाहिजेत व चालू ठेवली पाहिजेत.

३ : सरकारने धान्याची बाहेरून आयात केली पाहिजे, सरकारी धान्य दुकाने उघडली पाहिजेत तसेच ठराविक दराने धान्य विकण्याची सक्ती केली पाहिजे.

४ : लोकांमध्ये विश्वास निर्माण व्हावा आणि त्यांच्या तक्रारी दूर व्हाव्यात म्हणून दुष्काळी जिल्ह्यांसाठी एखादा कमिशनर किंवा कमिशनरांचे मंडळ नेमण्यात यावे. या खास कमिशनरला विशेष अधिकार असले पाहिजेत आणि दुष्काळ निवारण कार्य बरोबर व्हावे म्हणून सरकारची इतर खाती विशेषत: रिव्हेन्यू, बांधकाम खाते, जंगल खाते सार्वजनिक आरोग्यखाते त्यांच्या हाताखाली देण्यात यावीत. अनेक गोष्टी एका खात्याकडून दुसऱ्या खात्याकडे जाण्यास बराच वेळ लागतो. हा विलंब दुष्काळाच्या काळात होता कामा नये.

५ : जंगलात गुरांना चरू देण्यासंबंधीचे नियम शिथिल करण्यात यावेत. योग्य ठिकाणी गुरे नेता यावीत म्हणून गुरांच्या वाहतुकीचे रेल्वेचे दर कमी करण्यात यावेत तसेच या कामासाठी गुरांच्या मालकांना थोडीफार मदत देण्यात यावी.

६ : मजूरांच्या रोख वेतनात वाढ करण्यात यावी किंवा काही वेतन तरी धान्याच्या रूपात देण्यात यावे. कारण दुष्काळामुळे धान्याच्या किंमतीत वाढ झाली असून कमी वेतनात ते पुरेशा प्रमाणात घेता येत नाही.

७ : ज्या ज्या ठिकाणी दुष्काळी कामांवर मजूर काम करतात त्या त्या सर्व ठिकाणी त्यांना धान्य पुरवठा करण्याची सोय करण्यात यावी.

८ : रविवारची सुटी बद करण्यात यावी किंवा महिन्याच्या स्वरूपात वेतन देण्यात यावे. आठवडयाची सुटी बिनपगारी असते त्यामुळे मजुरावर उपासमारीची वेळ येते.

९ : कामाच्या ठिकाणी तात्पुरत्या शेडस् उभारण्याची व्यवस्था करण्यात यावी बऱ्याच ठिकाणी अशी व्यवस्था झालेली नाही त्यामुळे कामगारांना सर्व दिवसभर उघडयावर रहावे लागते. तसेच लहान मुलांचीही गैरसोय होते.

१० : शक्यतो दुष्काळी जिल्ह्यातील खेडूतांना त्यांच्या गावातच काम देण्यात यावे. ते शक्य नसल्यास ज्याठिकाणी पाणी व निवारा यांची सोय आहे अशा जवळच्या ठिकाणी त्यांना काम देण्यात यावे.

११ : सरकारी अधिकाऱ्यांनी सर्व

खेड्यांना आणि खेड्यातील सर्व घरांना भेट देण्याची आवश्यकता आहे. जर काही लोक एखाद्या कारणामुळे दुष्काळी कामावर जाऊ शकत नसतील तर त्यांना सरकारतर्फे किंवा खासगी मदत समित्यांतर्फे मदत देण्यात यावी. अनेक वयस्कर, अशक्त आणि पंगु लोक कोणत्याही प्रकारचे काम करू शकत नाहीत. त्यांच्यासाठी सरकारने किंवा खासगी मदत समित्यांनी अन्नछत्रे चालवावीत.

१२ : दुष्काळी कामातून शेतजमीन मालकांना किंवा कोणालाही वगळण्यात येऊ नये. कोणीही त्याच्या घरापासून दूर आणि तुटपुंज्या मजुरीवर काम करण्यास तयार होणे हीच त्याच्या निकडीची खूण आहे.

१३ : या सर्व सूचनांबरोबर एक आणखी गोष्ट ध्वनित होते ती म्हणजे लोकांजवळून माहिती घेऊन त्यांच्या अडचणी सरकारपुढे मांडण्यासाठी एखाद्या स्वतंत्र संस्थेची गरज आहे. सरकारी अधिकारी अतिशय संकुचित दृष्टीकोण ठेवतात आणि त्यांच्याद्वारेच मिळणारी माहिती एकांगी व अपुरी असण्याचा संभव असतो.

या दुष्काळकथा वाचताना त्यांच्यात व अलिकडे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या कथा यांच्यात बरेच साम्य आढळते. उदा. सरकारने ठरवून दिलेली किमान मजुरी प्रत्यक्षात कमाल मजुरी ठरते आणि कामगारांना मिळणारी प्रत्यक्ष मजुरी अतिशय तुटपुंजी असते अशी तक्रार सर्व वृत्तपत्रांनी केली आहे अनेक कामाच्या ठिकाणी शेडसची व्यवस्था नाही, अनेक ठिकाणी वृद्ध लोकांना कामावर घेतले जात नाही तर एकट्या स्त्रीलादेखील कामावर घेतले जात नाही अशीही तक्रार आहे. बहुसंख्य ठिकाणी सुटी म्हणजे 'सक्तीचा उपवास' असे समीकरण झाले आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे. ६ किंवा ७ दिवस लागोपाठ काम करणाऱ्याला त्या नंतरचा एक दिवस काम न करता मजुरी दिली तरच खऱ्या अर्थाने विश्रान्ती मिळू शकेल नाहीतर विश्रान्तीचा दिवस हा सर्वात वाईट असा उपासमारीचा दिवस ठरेल. सरकारने काही ठिकाणी गुरांचे कॅम्पस् काढले आहेत. अशा ठिकाणी गुरे पाठविण्यासाठी त्यांच्या मालकांना थोडीफार मदत देण्यात यावी ही सूचनादेखील अतिशय योग्य वाटते. ● ● ●

---


# एक सफर वेदनांची !

दलित ऽऽ दलित ऽऽ म्हणजे केवळ नवबौद्धच काय ?

......निदान आजचा राजकीय ढंग तेवढेच दर्शवतो.

आणि ही जर परिस्थिती अशीच कायम राहिली तर जातीयता नष्ट होणे राही दूर. ब्राह्मण आणि मराठा जातीयवादासारखा एक नवा जातीयवाद पोसला जाईल—'महार जातीयवाद.'

दहा महिन्यांच्या कालावधीनंतर बावड्याच्या आजच्या सामाजिक जीवनाचा

**अनिल बर्वे यांनी घेतलेला एक वेगळा शोध....पुढील अंकी**

# आदिवासींना कायद्याचे संरक्षण देण्यासाठी
# २८ एप्रिल रात्रौ : छबीलदास सभागृह

धुळे जिल्ह्यात सातपुड्याच्या कुशीत दडलेल्या शहादा तालुक्यात आदिवासींवरील अन्यायाच्या बातम्या गेल्या दोन वर्षांत अधिकाधिक ऐकू येत आहेत. 'माणूस' साप्ताहिकाने या आदिवासींवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली. सर्वोदय मंडळ, आदिवासी भिल्ल सेवा मंडळ या संस्थांचे काम आज कित्येक वर्षे त्या भागात चालू आहे. मात्र आजपर्यंत निमूटपणे अन्यायाला सामोरा जाणारा आदिवासी आज पाय रोवून, मान वर करून अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला तयार आहे.

अन्याय अनेक प्रकारचे. कोणीही सावकाराने यावे, थोड्याशा कर्जाच्या बदल्यात आदिवासींकडून अगठा उमटून घ्यावा आणि जमीन घशात घालावी आणि मग जमीनकंगाल झालेल्या आदिवासीला सालदार म्हणून भाकरीच्या तुकड्यावर वर्षभर राबवावे. जंगलात जाऊन लाकूड तोडून मोळी विकावी म्हटलं तर जंगलच्या अधिकाऱ्याने तेथेच अडवावे. चिरीमिरी देऊन किंवा पाया पडून त्याने वाट मोकळी करून घ्यावी. 'पीक संरक्षण समिती' ही येथील सधन शेतकऱ्यांची खास संस्था. जणू त्या भागातील कायदा आणि संरक्षण यांचा हक्क त्यांनाच. या समितीच्या नावाखाली कोणाही आदिवासीला उचलावे, पीक चोरल्याच्या आरोपाखाली सालटी निघेपर्यंत बडवावे, विजेचे शॉक द्यावेत, हा तर नित्याचाच प्रकार. आणि आदिवासी स्त्रिया तर जणू वाऱ्यावरच पडलेल्या. त्यांच्यावरील अत्याचाराला सीमा नाही.

अशा परिस्थितीतच २ मे १९७१ रोजी पाटीलवाडी प्रकरण घडले. सध्या ते प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्याची फारशी चर्चा करता येणार नाही. परंतु सारांश असा. त्यादिवशी पाटीलवाडीचे प्रगत शेतकरी विश्राम हरी पाटील यांच्या कोठीवर २००–३०० भिल्ल आपापल्या थैल्या घेऊन हजर झाले. उन्हाळ्याचे दिवस, घरातला दाणा संपलेला. भिल्लमंडळी पाटलांच्याच शेतावर राबणारी. पाटील त्यांचे मायबाप. प्रत्येकी ३–४ पायली ज्वारी उसनी द्यावी, कापणीच्या टायमाला पैसे वळते करून घ्यावे अशी विनंती करण्यात आली. पाटलांचे चिरंजीव उठले. कमरेच्या किल्ल्या काढून कोठाराचे दार उघडले आणि भिल्लांच्या जमावाने शिस्तीत, लायनीत उभे राहून धान्य घ्यायला सुरुवात केली. पाटील-चिरंजीव तेथेच खुर्चीवर बसलेले. शेवटचा भिल्ल धान्य घेऊन चालू पडला आणि धान्य-कोठार लुटल्याची आवई उठली. पोलीस फौजदाराला निरोप गेला आणि ट्रॅक्टर, जीप, घोड्यावरून मंडळी बंदुका घेऊन हजर झाली. धान्य मिळाल्यामुळे तृप्त होऊन घरी निघालेला भिल्लसमुदाय अडविला गेला. ज्वारीच्या प्रत्येक दाण्यासाठी झगडावे लागत असता आज सुखासुखी कसे काय धान्य मिळाले याच्या आश्चर्यात असतानाच भिल्लांचे डोळे खाडकन् उघडले. पोलीस-फौजदाराने समोरच्या शांत जमावावर पूर्ण चौकशी केल्याशिवाय बंदूक चालविण्याचे नाकारलं. (पुढे त्याला तात्पुरते बडतर्फ करण्यात आले) तोपर्यंत भिल्लांचेही भाईबंद आपले भाले,

तिरकमठे घेऊन हजर झाले. गोळीबार सुरू झाला. काही वेळाने जेव्हा ही अश्मयुग आणि जेटयुग यांच्यातील लढाई संपली तेव्हा एक भिल्ल गोळी लागून गतप्राण झाला होता. दुसऱ्या दोघांना प्राणान्तिक जखमा झाल्या होत्या. मृत्युमुखी पडलेला भिल्ल माल्याच्या जखमांनी मेला असे सर्टिफिकेट डॉक्टरकडून मिळवून त्याला पुरूनही टाकला. त्याचे प्रेत उकरून पोस्टमार्टेम केल्यावर दोन बंदुकीच्या गोळ्या सापडल्या आणि मैदानावरची लढाई कोर्टात सुरू झाली.

आज १०१ भिल्लांवर धान्यकोठार लुटल्याचा आरोप ठेवला गेला आहे आणि आदिवासीला ठार मारल्याबद्दल बंदुकी बाळगणाऱ्या ६ जमीनदारांवर सरकारतर्फे फिर्याद करण्यात आली आहे. १०१ आदिवासींपैकी एका भिल्लाला जामीन नाकारण्यात आला. तो आज खटला सुरू होण्यापूर्वी जवळजवळ दोन वर्षे तुरुंगात आहे. जमीनदार मात्र केव्हाच जामीनावर सुटले आहेत. खटला लांबत आहे. शहाद्याच्या तालुका कोर्टातून तो आता धुळ्याच्या जिल्हा कोर्टात आला आहे. १०१ आदिवासी एस्. टी. स्टँडवर उघड्यावर झोपतात. उन्हात बसून रहातात. जबानीची वाट पहात. त्यात एक लेकुरवाळी बाई आहे. मजुरी सुटली आहे. बायकोने, भावाने मजुरी करून काहीतरी चतकोर भाकरी आणून दिली तर तेवढाच पोटाला आधार. नाहीतर न्यायदेवतेची आराधना करत महिनोन् महिने भकास चेहऱ्याने रिकाम्या पोटी बसून लोकशाही मूल्यांवरची श्रद्धा जपणे सोपे काम नव्हे.

तर आता हा प्रश्न आहे आदिवासींना कायद्याचे संरक्षण देण्याचा. या दुर्दैवी देशात न्याय आपोआप मिळत नाही. तो मिळवताना पैशाचा प्रश्न उभा ठाकतो आणि आदिवासी तर जन्माचेच कफल्लक. केवळ पैशाअभावी त्यांच्या बाजूचे समर्थन दिले गेले नाही असे होऊ नये म्हणून हा अट्टाहास.

गेले दोन वर्षे तेथील आदिवासी एकजुटीने उभा आहे. मुंबईचे ७–८ पदवीधर तरुण आदिवासींबरोबर खंबीरपणे उभे राहून त्यांचा आत्मविश्वास जागृत करीत आहेत. त्यांच्यात ऐक्याची भावना जागवून दारू, मटका बंद करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सावकारांच्या ताब्यात बेकायदेशीरपणे गेलेली ४००० एकर जमीन सोडविली गेली आहे. ती जमीन सहकार्यांने कसण्याचे प्रयत्न चालू आहेत.

या १०१ आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी मुंबईतून १०,००० रुपयांचा निधी जमविण्याचे ठरले आहे. शहरवासीयांनी समाजातील सर्वांत तळच्या भागाबद्दल आत्मीयता दाखविणारी आणि त्यांचा अन्याय तो आमचाही अन्याय ही भूमिका घेणारी मोजकीच उदाहरणे घडतात. हे त्यांतील एक. यशवंत देव, कृष्णा कल्ले, अरुण दाते, प्रमिला दातार व व. पु. काळे या कलावंतांनी मदतीचा हात पुढे केला आहे. २८ एप्रिल रोजी रात्रौ साडेआठ वाजता मराठीतील निवडक संगीतरचनांचा कार्यक्रम छबिलदास हायस्कूलच्या हॉलमध्ये आयोजित केला आहे. त्याला मुंबईचे नागरीक उत्स्फूर्त प्रतिसाद देतील अशी आमची खात्री आहे.

**चिटणीस, ग्रामस्वराज्य समिती, शहादे.**

# जय पुरवठा मंत्री !

काही महिन्यापूर्वी माणूसमध्ये आलेले 'ना. भाऊसाहेब वर्तकांच्या जिल्ह्यातील हिरवळ होरपळ' हे वार्तापत्र वाचले. त्यानंतर मधून मधून श्री. प्रभाकर म्हात्रे यांनी वर्णन केलेली 'होरपळ'-ही वाचली. यंदासारख्या दुष्काळी परिस्थितीत काही लोकांची होरपळ ही व्हायचीच. पण खुद्द वर्तकांच्या ठाणे जिल्ह्यातच, सुक्या गवताच्या रुक्ष गोदामात उगवलेल्या हिरवळीकडे कोणाचे कसे लक्ष गेले नाही, याचे आश्चर्य वाटते. त्याचीच माहिती आज देत आहे.

त्याचें असे आहे की, मुंबईच्या जनावरांना (गाई, म्हशी, बैल, घोडे इ.) वैरणीचा पुरवठा पालघर, डहाणू वगैरे विभागातून नियमितपणे होत असे. गुजरात सरकार पण बऱ्याच प्रमाणात गवताचा पुरवठा करीत असे यंदाच्या दुष्काळामुळे गुजरातने गवतावर राज्यबंदी घातली. त्यामुळे गवताचे भाव बेसुमार वाढले. ज्या गवताला रु. ८० ते १२० (५०० कि.) पडत असत त्याला रु. ३७५ पर्यंत पडू लागले. मुंबईत सर्वत्र ओरड सुरू झाली. शिष्टमंडळे पुरवठामंत्र्यांना भेटू लागली. गवतासंबंधी गवळी व गवत व्यापारी यांनी स्वतंत्रपणे आपापली बाजू पुरवठा मंत्र्यांसमोर मांडली आणि एक दिवस सरकारने भाव बांधून दिले.

फूल गवत रु. १३५–०० ५०० कि. चे
भेळसेल रु. १६०–०० ,,
बेर गवत रु. १८०–०० ,,

दूध सहकारी सोसायटयांना परमिटे देण्यात आली. ती परमिटे गवतव्यापाऱ्यांना देऊन त्यांच्याकडून गवत घ्यायचे या व्यवस्थेमुळे कितीतरी लोकांना काम मिळाले. मामलेदार ऑफिसमधून परमिटांची मुदत वाढवून आणावी लागे. तेथील लोकांना काम मिळाले. वेगवेगळ्या स्टेशन मास्तरांना काम मिळाले. पोलिसांना काम मिळाले. दुष्काळात सर्वांची शक्य तितकी सोय बघितली गेली.

जिथे प्रत्येक म्हशीला रोजी ८ कि. सुके गवत मिळालेच पाहिजे, तिथे परमिटवर प्रत्येक म्हशीला रोजी ४ कि. प्रमाणे गवत मिळू लागले. गवळ्यांनी सुद्धा जास्त गवत वापरू नये म्हणून की काय, व्यापाऱ्यांनी गवताचे भाव वाढविले. बांधून दिलेल्या भावात चुकून सुद्धा गवत मिळेनासे झाले. शासनाला फक्त या भावात गवत मिळते. परंतु

हे गवत म्हणजे खासच असते. परवा काही दिवसापूर्वी गवताची चौकशी करण्यासाठी पालघरला गेलो होतो. तेव्हा तिथ काळा, भिजलेला माल गठ्ठ्यांमध्ये बांधून ठेवलेला होता, असला निःकृष्ट व टाकाऊ माल ठेवण्याचे प्रयोजन काय म्हणून सहज चौकशी केली. तेव्हा समजले की तो फुकट न दवडता, शासनाला जो पुरवठा बांधील भावात करावा लागतो, तो त्यातून केला जातो.

त्याच वेळी माझे पालघरचे एक मित्र आणखी पाच-सहा व्यापाऱ्यांकडे मला घेऊन गेले, एका व्यापाऱ्याकडे झालेला संवाद मोठा बोलका आहे

माझे मित्र : हे करमरकर, मुंबईहून आलले आहेत. त्यांना गवत हवे आहे, तर मिळेल का ?

गवत व्यापारी : हवे तेवढे मिळेल.

माझे मित्र : भाव काय ?

गवत व्यापारी : रु. २१५-००

माझे मित्र : भाव तर तुम्ही फारच सांगता.

गवत व्यापारी : (मला समजावण्याच्या स्वरात) हे पहा, तुम्ही माझे ऐका. ह्या भावात तुम्ही माझ्याशी सौदा केलात, तर तुमचा त्यात फायदाच आहे. मलाच दहापंधरा टक्के नुकसान आहे, माझे प्रामाणिक मत आहे की नंतर गोडाऊनमध्ये माल गेला की भाव आणखी वाढतील. माल पण मिळणार नाही. तेव्हा माझ्यापेक्षा कमी भावात कुणी गवत देणारा भेटला तर तुम्ही विचार न करता हजार दोन हजार गठ्ठ्यांचा सौदा करून टाका.

माझे मित्र : पण सरकारचे धोरण पुढे बदलले तर ?

गवत व्यापारी : (सात्त्विक संतापाने) अरे एवढा चार लाख रुपयांचा माल घेतला आहे. तेव्हा सरकारची धोरणे कशी बदलायची हे काय आम्हाला कळत नाही ? आम्ही काय स्वस्थ बसू काय ? कुणीही येऊ दे, काहीही होणार नाही.

मी : तुम्हाला जर एवढी खात्री आहे, तर तुम्ही दहापधरा टक्के नुकसान सोसून मला गवत द्यायला का तयार झालात ?

गवत व्यापारी : त्याचे असे आहे, की आता तुमच्याशी सौदा झाला तर तुम्हाला पैसे रोख द्यावे लागतील. असे लाख दीड लाख रुपये रोख मिळाले तर आत्ता तेलाचा स्टॉक करून ठेवता येईल. आणि आत्ता हे झालेले नुकसान त्यात दामदुपटीने भरून निघेल या अजब अर्थशास्त्रावर मी बापडा आणखी काय भाष्य करणार ?

जय पुरवठामंत्री ! जय दुष्काळ !!

—डॉ. भारत करमरकर

# स्वातंत्र्य हवे आम्हा प्रेक्षकांना !

वि. भा. देशपांडे

लिंगवाद, झुंडवाद इत्यादी शब्दांवरून सध्या बरीच वर्दळ चालू आहे. उलटसुलट चर्चा सुरू आहे. उभयपक्ष आपापल्या ताकदीने आपली बाजू प्रगट करीत आहेत. 'माणूस'च्या दिनांक १७ च्या अंकात श्री. माजगावकरांनी संपादकीय लिहून आपली भूमिका स्पष्ट केली आहेच. मनगटशाहीच्या बळावर सांस्कृतिक क्षेत्रात कोणी काही करू पाहील तर योग्य नाही. या दुष्प्रवृत्तीला वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. ह्या विचाराशी कोणताही सुजाण सुबुद्ध वाचक, प्रेक्षक सहमत होईल. त्याच संदर्भात एक नाट्यप्रेमी, नाट्यप्रेक्षक या नात्याने काही विचार मांडण्यासाठी हा लेखनप्रपंच.

लेखकाला लेखन-स्वातंत्र्य हवे, ही तर निर्विवाद गोष्ट. नाटककार आपल्या इच्छेनुसार, अनुभवानुसार आणि प्रतिभा सामर्थ्यावर नाट्याविष्कार करीत असतो. त्याने नाटकासाठी कोणता विषय-आशय निवडावा, मांडणी कोणत्या प्रकाराने करावी, हे त्यानेच ठरवायचे असते. पण नाटकाच्या बाबतीत लेखकाने आपले कार्य करून सगळे संपत नाही. तिथेच खरी सुरुवात होते. कारण ते नाटक रंगमंचावर येण्यासाठी दिग्दर्शक, कलाकार, नाट्यसंस्था अशा अनेक गोष्टी लागतात. तिसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रेक्षक. प्रेक्षकांच्या समोर नाट्यप्रयोग साकारीत झाल्याविना त्या नाट्यकृतीला पूर्णाकार अशक्य, हे सहज समजण्याजोगे आहे.

आज आपल्याकडे आचार-विचार-उच्चार लेखन स्वातंत्र्य आहे. प्रश्न आहे तो प्रयोग-स्वातंत्र्याचा आणि प्रेक्षक-स्वातंत्र्याचा! तो प्रश्न अलीकडच्या तेंडुलकरांच्या नाटकावरून सुरू झाला. सखाराम-घाशीराम ह्या नाटकांमध्ये समाज – जातीविघातक गोष्टी आहेत, असा एक शोध काही मंडळींनी लावला. त्यांनी ठरवले, की हे प्रयोग होऊ द्यायचे नाहीत. का? तर त्यांच्या जवळ सांस्कृतिक–सामाजिक स्वरूपाची

गुळगळीत झालेली काही कारणपरंपरा आहे. माझा प्रश्न असा आहे, की ह्या तथाकथित संस्कृतीवाद्यांनी कोणत्याही नाटकाचे भवितव्य का ठरवायचे? काही मूठभर लोकांनी किंवा नेत्यांनी आमच्या सर्व प्रेक्षकांच्यावतीने हवाला कशासाठी द्यायचा? जसे नाटककाराला नाटक लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे, तसेच दिग्दर्शकाला ते रंगमंचावर आणण्याचे, प्रेक्षकाला पाहण्याचेही स्वातंत्र्य आहे. पुण्या-मुंबईत किंवा अन्यत्रही तेंडुलकरांच्या नाटकांचा एक खास प्रेक्षकवर्ग आहे. त्यांना जर तेंडुलकरांची नाटके पहायची असतील तर या लोकांनी त्यांच्या (प्रेक्षकांच्या) स्वातंत्र्यावर कशासाठी घाला घालायचा? एका अर्थाने आम्हा प्रेक्षकांची ही गळचेपी आहे. त्यांच्यावर होणारा जुलूम आहे. आमची वाङ्मयीन, कलात्मक स्वरुपाची आवडनिवड आमची आम्ही ठरवणार आहोत. प्रत्येकाला ती ठरविण्याचा अधिकार आहे. तो अधिकार त्याला जरूर वापरू द्या. पण आमच्यावर कोणतीही आवड लादू नका. मनगटशाहीच्या जोरावर नाटक बंद पाडण्याची भाषा करू नका!

रंगभूमीच्या संदर्भात प्रेक्षक ही एक प्रचंड शक्ती आहे. खरोखरीच प्रेक्षकांना एखादे नाटक नको असेल तर ते होणे कठीण आहे. कारण प्रेक्षकाविना कोणताच नट-नाटककार मोठा होऊ शकलेला नाही. जर लिंगवादी समितीवाल्यांना किंवा त्यांच्या पाठीराख्यांना सखाराम-घाशीराम ही नाटके प्रायोगित व्हावयास नको असतील तर त्यांनी त्यावर बहिष्कार टाकावा. प्रयोगाच्यावेळी दारावर उभे राहून प्रेक्षकांना विनंती करावी, निषेध करावा; लेख, भाषणे इत्यादी अनेक मार्ग आहेत. तुम्ही अनेक पद्धतीने लोकमत जागृत करू शकता. त्यात जर तुम्हाला अपयश येत असेल तर नाइलाज आहे. ज्या आम्हा कोणाला घाशीराम–सखाराम पाह्यचे आहे, त्यांना तुम्ही अडवू शकत नाही, रोखू शकत नाही.

सारे सौम्य, सुसंस्कृत प्रकार संपल्यावर मुद्द्यावरून गुद्द्यावर यावेच लागते, त्याशिवाय लिंगपिसाटांना धडा मिळणार नाही, अशी काहींची भूमिका आहे. हा केवळ भ्रम आहे. कलाक्षेत्राचा संबंध बुद्धी आणि भावना यांच्याशी आहे. मनगटाशी नाही. मराठी रंगभूमीच्या इतिहासात तरी मनगटाच्या जोरावर क्रांतीकारक बदल घडलेले नाहीत. घडणार नाहीत. प्रत्येक नवीन नाटकाच्यावेळी नाटककाराने, दिग्दर्शकाने लिंगवादी समिती किंवा तत्सम वृत्तीच्या लोकांची परवानगी काढून मगच आपले कलाकार्य ठरवायचे का? आणि ते कशासाठी?

हा प्रश्न केवळ घाशीराम–सखाराम पुरताच मर्यादित नाही. प्रेक्षकांच्या दृष्टीने तो कामयचा होऊ नये, म्हणून त्याची गंभीरपणे चर्चा होणे आवश्यक आहे. मनगटशाहीच्या बळावर आज काही प्रयोग तुम्ही बंद पाडाल. उद्या तुम्हाला तुमच्या पद्धतीने उत्तर देणारी विरोधी फळी तयार होईल. त्यावेळी

नाटक कलात्मक की अकलात्मक याही-पेक्षा दोन पक्षामध्ये–गटामध्ये मनगटी ताकद किती यावरच नाटकाचे श्रेष्ठत्व ठरविण्याची वेळ येईल. म्हणजे मनगटाच्या बळाची भाषा ही भीती दाखवण्यापुरती ठीक आहे. परिणामी ती विध्वंसक आहे. त्यातून साधणार काहीच नाही. घाशीराम–सखाराम नाटकांच्या प्रयोगावर, लेखन-स्वातंत्र्यावर बंदी आणू नये अशा पत्रकावर लेखक–नाटककार–टीकाकार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यांना ' विचारवंत ' या विशेषणाने उत्साहाने उल्लेखिले जाते. त्यांना भेकड म्हटले जाते. पत्रक काढणे, लेखामधून आपली भूमिका व्यक्त करणे या शांततामय मार्गावर त्यांचा विश्वास आहे. कलेतील महत्त्वाचे प्रश्न रस्त्यावर सोडवता येत नाहीत, यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांचा त्यांच्या बुद्धीवर विश्वास आहे. आणि अशाच मार्गाने जाणाऱ्या ' विचारवंतावर ' आमच्या सारख्या प्रेक्षकांचाही विश्वास आहे.

(याच संदर्भात जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करणे उचित होईल. श्रीशंकराचार्यांच्या रास्ता पेठेतील एका सभेत दगडफेक, चप्पलफेक झाल्याची वार्ता वाचली. तोही अनिष्ट प्रकार आहे. 'श्रीं'ना त्यांचे धर्मविषयक विचार मांडण्याचा हक्क जरूर आहे. ते विचार चुकीचे असतील किंवा बरोबरही असतील ! तो प्रश्न वेगळा आहे. त्यांना त्यांचे म्हणणे मांडू द्या. ज्यांना ते ऐकायचे आहे, त्यांना प्रतिबंध करू नका. त्या श्रोत्यांचे श्रवण-स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही. शंकराचार्यांना उत्तर द्यायचे असेल तर स्वतंत्र सभा घ्या, व्यासपीठ तयार करा, पण त्यांची सभा उधळण्याने काय साधणार आहात ? )

मनगटशाहीने नाटकातील लिंगपिसाटपण दूर करण्याची प्रतिज्ञा काही मडळी करीत आहेत. ती नुसती नाट्यप्रयोग बंद पाडीत नाहीत, तर त्या वृत्तीपैकी एकाने तेंडुलकरावर हात उगारला. ही तर लज्जास्पद गोष्ट आहे. आज तेंडुलकरांना त्यांच्या कार्यालयात जाऊन मारण्याचे धाडस एकाने केले, उद्या त्यांच्या कुटुंबियांना ती दहशत बसेल. त्या सर्वांना जगणे असह्य, अशक्य करून टाकायचे, ही त्यामागे भूमिका आहे का ? तशी असेल तर चिंताजनक परिस्थिती आहे ! एका तेंडुलकरांना जायबंदी करून, किंवा समाजातून उठवून रंगभूमीवर स्वच्छ वातावरण होणार आहे का ? ज्या तेंडुलकरावर आज लिंगवाद निर्मूलक आग पाखडीत आहेत, त्यांनी तेंडुलकरांचे एकेकाळचे ऋणही मान्य करावे. याच तेंडुलकरांच्या ' शांतता कोर्ट ' नाटकाने मराठी नाटकाची ध्वजा भारतभर पसरवली. भारतातल्या चौदा भाषांमध्ये त्यांच्या नाटकाचे रूपांतर झाले. कमलादेवी चटोपाध्याय हे पारितोषिक देण्याला तेंडुलकरापासून प्रारंभ झाला. मराठी नाटक ज्या ज्या नाटककारांनी मोठे केले, त्यामध्ये तेंडुलकर हे एक आहेत, हे विसरू नका. याचा अर्थ तेंडुलकरांनी काहीही लिहिले तरी

ते 'थोर 'च आहे, असेही नव्हे. तेंडुलकरांच्या नाटकांचे मूल्यमापन टीकाकार यथायोग्यपणे करीत आहेत. प्रेक्षक तर त्या टीकाकारांच्या साथीला आहेतच. पण काळ हा सर्वात मोठा टीकाकार आहे. काळ त्यांच्या नाटकांचे लहान-थोरपण ठरवील. तोपर्यंत त्यांना मनसोक्त लिहू द्या. नवेनवे नाट्यप्रकार शोधू द्या त्यांनी लिहिलेले नाटक रंगभूमीवर आणण्याचे स्वातंत्र्य कलाकारांना असू द्या. आणि अर्थातच ते प्रयोग पाहण्याचे भाग्य आम्हाला असू द्या. दहा वर्षांपूर्वी तेंडुलकरांच्या नाटकाला प्रेक्षक गोळा करावा लागत असे. रंगायन संस्थेने जेव्हा तेंडुलकरांच्या किंवा तत्सम नवीन नाटककारांच्या नाटकांचे प्रयोग पुण्यात केले, तेव्हा प्रेक्षक जमवताना किती यातायात पडत असे, हे त्यावेळच्या संबंधित लोकांना चांगलेच आठवत असेल. आज परिस्थिती उलटी आहे. आज तेंडुलकरांच्या नाटकाला जाऊ नका असे सांगणे सुरू झाले आहे. तेव्हा प्रेक्षक आपापला निर्णय आपापल्या पद्धतीने घेत असतो. त्याच्यावर प्रयोगाला जाणे किंवा न जाणे लादण्यात मतलब काय ?

शेवटी एकाच गोष्टीचा उल्लेख आवश्यक वाटतो. 'सखाराम' नाटकाचे दिग्दर्शक सारंग यांच्यामागे महाराष्ट्रातले अनेक विचारवंत उभे राहिले. वस्तुत: ते सारंगांना पाठिंबा देण्यासाठी नव्हे तर लेखनस्वातंत्र्य, प्रयोगस्वातंत्र्य असावे, हे म्हणण्यासाठी उभे राहिले. त्यामध्ये सारंगांना संरक्षण मिळाले. पण ते संरक्षण एका घटनेने धोक्यात आले. सारंगांनी शिवसेनाप्रमुखांना 'सखाराम'चा प्रयोग दाखवला. त्यांची मान्यता मिळवून पुढील प्रयोग सुरू केले. सारंग, हे तुम्ही कोणत्या स्वार्थासाठी केलेत ? तुमच्या या कृत्याने 'सखाराम'चे काही प्रयोग होतीलही, पण मूळ भूमिकेचा कणाच तुम्ही मोडलात. एका अर्थाने सेन्सॉर मान्य केलेत. तेंडुलकरांच्या ताठ मानेच्या लेखन भूमिकेला छेद दिलात. एकापरीने आमच्यासारख्या सामान्य प्रेक्षकांचा विश्वास गमावलात. सारंग अशा सोयीने भूमिका बदलू नका. पुन्हा तुमच्यासाठी उभे राहण्याची वेळ आली तर विचार करावा लागेल. नाटक कोणा एका व्यक्तीच्या इच्छेने चालवू नका. ते आपल्या मरणाने मरते, गुणाने जागते हेच आम्ही लिंगवाद समितीवाल्यांना सांगत आहोत. आमच्यासारख्या सामान्य प्रेक्षकांच्यासाठी स्वातंत्र्याची पुन:पुन्हा घोषणा करीत आहोत.

ooo

# आ ले पा क

■ एका वैवाहिक तपासणीत, फक्त २५ टक्के पती व १५ टक्के पत्नी यांनी असे मत व्यक्त केले की विवाह हा ' करार ' आहे.

हा करार ताश्कंद वा सिमला करारासारखा आहे, अशी पुस्ती त्यांनी जोडली नाही काय ?

■ ' भारतीय लोकशाहीच्या समस्या ' या विषयावर मुंबई विद्यापीठात दिलेल्या व्याख्यानात स. का. पाटील म्हणाले : ज्याप्रमाणे परब्रह्माची व्याख्या करता येत नाही, आणि परब्रह्म म्हणजे काय ते निश्चित सांगता येत नाही त्याप्रमाणे समाजवाद म्हणजे काय ते नक्की सांगता येत नाही.

का नाही ? कित्येकजण समाजवाद हेच परब्रह्म मानतात !

■ या व्याख्यानात एका धरणयोजनेबद्दलच्या बैठकीचा संदर्भ देऊन पाटलांनी सांगितले : बैठकीत सगळ्याच मुख्यमंत्र्यांनी आमच्याही राज्यात नद्यांवर धरणे झाली पाहिजेत असा आग्रह धरला. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यापैकी काही ठिकाणी नद्याच नव्हत्या. (हशा)

हसले त्यांचे दात दिसले. तहान लागल्यावर विहीर खणण्यापेक्षा धरण बांधल्यावर नदी आणणे केव्हाही शहाणपणाचे ठरेल.

■ पुण्यामुंबईच्या पत्रककाढू विचारवंतांच्या सुरात सूर मिसळून मामा पेंडसे म्हणतात : ' मनगटी ' पद्धतीने नाटके बंद पाडण्याची चळवळ आपल्याला मान्य नाही.

आपल्यालासुद्धा ' मनगटी ' पद्धतीने नाटके चालू ठेवण्याची चळवळ मान्य नाही.

■ मलकापूर येथे ' बी ' कवींच्या जन्मशताब्दी सोहळ्यातील व्याख्यानात कवी मंगेश पाडगावकर म्हणाले : केशवसुतांनी मराठी काव्याच्या भाषेला लढाऊ भाषेची देणगी दिली; बालकवींनी सौंदर्याच्या भाषेची देणगी दिली; आणि ' बी ' कवींनी मराठी काव्याला तत्त्वचिंतनाच्या भाषेची देणगी दिली.

माधव ज्यूलियननी मराठी काव्याला फारसी भाषेची देणगी दिली; मर्ढेकरांनी इंग्रजी भाषेची देणगी दिली; पाडगावकरांनी वात्रट भाषेची देणगी दिली.

इतक्या देणग्या मिळूनही नवकाव्याची भाषा करंटी ती करंटीच, असे काहीजण म्हणतील. ●

## पॅरिसमधील उद्यानबंदी

पॅरिसमध्ये सध्या वसंत ऋतू फुलला आहे. वसंत ऋतू सगळीकडे सारखा असतो, अशी आपली माझा समजूत आहे. त्यामुळे मी त्या पॅरिसी वसंत ऋतूचे वर्णन करत नाही. त्याशिवाय मी इथे बसून 'पॅरिसमध्ये सध्या वसंत ऋतु फुलला आहे' असे तुम्हाला सांगतो आहे, ही गोष्ट आपण उभयतांनी विसरून कसे चालेल बरे? असो.

पॅरिसमध्ये वसंत ऋतूचे आगमन झाले आणि पाठोपाठ एक उद्वेगकारक सरकारी हुकूम प्रसृत झाला. या हुकूमा प्रमाणे, लॅटिन क्वार्टरमधील लक्सेमबर्ग उद्यानात १५ ते ४० वर्षांच्या तरुण–तरुणींना यापुढे प्रवेश दिला जाणार नाही. याचे एक कारण असे की फ्रेंच सिनेटची इमारत याच उद्यानातील लक्सेमबर्ग राजवाड्यात आहे (आणि उद्यान खासगी आहे). दुसरे कारण असे की गेल्या वर्षी काही तरुणांनी उद्यानातील सुंदर पुष्पवाटिकेतील फुले ओरबाडली होती आणि काहींनी कपडे काढून उद्यानातील विशाल सरोवरात असभ्य जलविहार केला होता.

ही कारणे फारशी खरी नाहीत असे तरुणमंडळींना वाटते. त्यांच्या मते फ्रेंच राज-समाजकारणात तरुणांना बाजूला ठेवण्याचे जे कारस्थान प्रौढ मंडळी चिकाटीने रचत आहेत त्याचा उद्दाम आविष्कार म्हणजे ही नवी उद्यानबंदी. हे कारस्थान असेच चालू राहिले तर १९६८ साली फ्रान्सभर उसळलेली तरुणांची चळवळ पुन्हा उभी राहील, अशी ताकिद उद्यानवंचित तरुण-तरुणींनी दिली आहे. या तरुणांवर आता कोणती प्रौढाई केली जाते ते पाहायचे

आपल्याकडे अशी भानगड उद्‌भवू शकत नाही. कारण उद्याने आहेतच कोठे? प्रश्न उद्‌भवल्यावर त्याला शर्थीने तोंड देण्यापेक्षा प्रश्न उद्‌भवणारच नाही अशी वातड परिस्थिती कायम करणारे आम्ही किती धोरणी आणि दूरदृष्टीचे आहोत याची साक्ष अशा एखाद्या प्रसंगाने पुन्हा पटते. ●

## रांगवाले ब्रिटन

रांग लावणे हा ब्रिटिशांचा राष्ट्रीय गुणधर्म आहे. दोन ब्रिटिश माणसे जवळ आली की लगेच रांग लावून मोकळी होतात. एकटा ब्रिटिश माणूसदेखील (म्हणे) आपण रांगेतच आहो, असे मानत असतो. ब्रिटिश रांगा आणि रांगवाले यांच्यावर आता मुळी एक ग्रंथच एका ब्रिटिश लेखकाने लिहिला आहे. लेखकाचे नाव आहे प्रोफेसर पी. एस्. स्नॅप. ब्रिटनमधील सर्वश्रेष्ठ 'रांगाचार्य' असा त्यांचा लौकिक आहे. पुस्तकाचे नाव आहे: 'एव्हरिथिंग यू ऑल्वेज वॉन्टेड टु नो आबाऊट क्यूज बट वेअरंट इंटरेस्टेड इनफ टु आस्क' (Everything you always wanted to know about question but

weren't interested enough to ask) प्रोफेसरसाहेब या पुस्तकाची तयारी तब्बल अकरा वर्षे करत होते. या अवधीत ते ८,७५,००० (आठ लाख पंचाहत्तर हजार) रांगात उभे राहिले आणि २००,००० (दोन लाख) रांगांची हवाई छायाचित्रे त्यांनी घेतली.

रांगेबाबतच्या अमेरिकन आणि ब्रिटिश भूमिकेत मोठाच फरक आहे, असे प्रो. स्नॅप यांचे मत आहे. आपल्या मताचे विवरण यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. अमेरिकन माणसे ओळ करतात; ब्रिटिश माणसे रांग लावतात. रांग लावण्यात ब्रिटिश माणसाला आत्मिक सुख लाभत असावे. रांगेत उभे राहण्याच्या आपल्या चिकाटीचा त्याला आत्यंतिक अभिमान वाटतो. अमेरिकन माणूस ओळ करतो ती नाईलाजाने; त्यात त्याला अपमान तर वाटतोच; पण शक्य झाले तर पुढे घुसण्यासाठी सर्वतोपरी धडपड करण्याची त्याची तयारी असते. रांगेत पुढे घुसणे ब्रिटनमध्ये अधमपणाचे मानतात; आणि तसे काही केले तर वर्तमानपत्रात वाचकांची पत्रे येतात; राष्ट्राच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त केली जाते. ●

## अमेरिकन ब्रेन-ड्रेन

आपले आर्थिक वर्तमान आणि भविष्य सुधारण्यासाठी भारत सोडून परदेशी वास्तव्य करणारे कितीतरी भारतीय तरुण-तरुणी आपण पाहतो. आपल्याला त्यांचे अनुकरण करणे शक्य नसल्यामुळे त्यांच्या स्वदेशाभिमानशून्यतेबद्दल आपण कठोर ताशेरे झाडतो. एक बिकट सामाजिक प्रश्न म्हणून या परिस्थितीची चिकित्सा करतो.

भारतीयांना ज्या प्रदेशाचे विशेष प्रलोभन वाटते तो. प्रदेश म्हणजे अमेरिका. अमेरिकेत काय नाही? आपल्याला स्वप्नात हवे ते सारे प्रत्यक्षात तेथे आहे, असे म्हणतात. असेलसुद्धा तसे. पण ही स्वप्ननगरी सोडण्याचा निर्णय सावधपणे घेणारा एक अमेरिकन पठ्ठ्या निघाला. एस. जे. पर्लमन हे त्याचे नाव. अमेरिकेतील या सुप्रसिद्ध विनोद-विडंबनकाराने अमेरिकेचा त्याग करून ब्रिटनमध्ये कायमचे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला आणि अंमलात आणला.

वस्तुत: बिचारा पर्लमन अमेरिकेत सुखी असायला काहीच हरकत नव्हती. त्याच्याजवळ भरपूर स्थावरजंगम संपत्ती होती; सहासष्ट वर्षांचे भलेमोठे आयुष्य येथेच तर घालवले होते त्याने.

पण अमेरिकेच्या स्वभावात झालेल्या बदलाने हा हाडाचा विनोदकार खचला. न्यूयॉर्कसारख्या शहरातील गर्दी-गजबजगलक्याने तो अस्वस्थ झाला. न्यूयॉर्कसारख्या शहरात, अनेकदा उच्छवासलेल्या हवेत श्वसन करण्याच्या कल्पनेने तो व्याकूळ झाला. जोडीला वाढती गुन्हेगारी, विवेकशून्यता, आततायी राजकारण आणि सर्वंकष असभ्यपणा;

यामुळे त्याचा निर्णय पक्का झाला.

पर्लमनने काही दिवसापूर्वी लिहिलेल्या पुस्तकाचे नाव होते : 'बेबी, इट्स कोल्ड इनसाइड.' अमेरिकेतील जीवनामुळे मनाला आलेल्या गारठ्याचाच उल्लेख त्याने वरील नावात केला आहे.

वास्तव्यासाठी तुम्ही ब्रिटनची निवड का केलीत ? ब्रिटनमध्ये असे काय आहे की जे अमेरिकेत नाही ? असे जेव्हा कोणीतरी पर्लमनला विचारले तेव्हा त्याने उत्तर दिले—'वर्तमानपत्रातील मजकुरातूनच मी माझ्या लेखनासाठी कल्पना उचलत असतो. आणि मला ज्या प्रकारच्या विक्षिप्त, चमत्कारिक लोकविलक्षण, लहरी, खुळचट बातम्या हव्या असतात त्यांना अमेरिकन वर्तमानपत्रात मुळी स्थानच काठे उरले आहे ? सगळी जागा व्यापली जाते अविवेक आणि हिंसाचाराने. ब्रिटनमध्ये मात्र अजून विक्षिप्त, चमत्कारिक, लोकविलक्षण, लहरी, खुळचट गोष्टींना स्थान आहे: वास्तव्य ब्रिटनमध्ये करायचे ते यासाठी.'

●

## गाढव कायदा

---

भडक, उत्तान, अश्लील साहित्य प्रकाशित करणे हा अमेरिकेतील एक सभ्य आणि प्रतिष्ठित व्यवसाय आहे. त्याविरुद्ध क्वचित आरडाओरड होते; नाही असे नाही. पण आरडाओरड करणाऱ्यांनाच अपराधीपणाचे वाटत असते; संकोच त्यांनाच बिचाऱ्यांना वाटत असतो.

दहा वर्षांपूर्वीची परिस्थिती थोडी वेगळी होती. उदाहरणार्थ कोण्या राल्फ गिन्सबर्ग नावाच्या प्रकाशकाने 'इरॉस' नावाचे नियतकालिक १९६० साली काढले. उघडपणे 'प्रेम आणि रतिरंगाच्या आनंदाला वाहिलेल्या' या नियतकालिकाला कोणी अश्लील ठरवले नाही; अश्लीलपणा म्हणे त्या नियतकालिकाच्या जाहिरातीत होता. टपालखात्याने जाहिरातीचे साहित्य जप्त केले. मग प्रकरण न्यायालयात गेले. तेथे दहा वर्षे भिजत पडून त्याचा निकाल नुकताच लागला. या निकालानुसार गिन्बर्गला तीन वर्षांची सजा झाली.

वास्तविक या दहा वर्षांत अश्लीलतेबद्दलची अमेरिकन समाजाची दृष्टी पार पालटली आहे. त्या दृष्टीला राल्फ गिन्सबर्गचे नियतकालिक फार सोवळे वाटण्याचाच संभव अधिक. शिवाय खुद्द 'इरॉस' हे नियतकालिकच अश्लील होते असे कायदाही म्हणत नाही. कायद्याने फक्त 'इरॉस' नियतकालिकाची जाहिरात तेवढी अश्लील ठरवली आणि आपला गाढवपणा पुन्हा एकदा सिद्ध केला !

● ● ●

# रतनचा मटका आणि सरकारची लॉटरी यात गुणात्मक फरक काहीच नाही

निळू दामले

दुष्काळानेही जेव्हढी खळबळ माजवली नसेल, एव्हढी खळबळ रतन खत्री आणि त्याच्या मटक्याने गेल्या काही महिन्यात माजवली आहे. यू. एन. आय. ह्या वृत्तसंस्थेच्या एका वार्ताहराने पहिल्या प्रथमच मटका-किंग खत्रीची मुलाखत मिळवली आणि बऱ्याच मोठ-मोठ्या वृत्तपत्रात ती छापूनही आली. गेल्या आठवड्यात इलस्ट्रेटेड विकली-नेही फोटोसहीत एक लेख छापला.

रतन ज्यावेळी दौऱ्यावर होता त्या-वेळीही तो ज्या ठिकाणी जात असे त्या ठिकाणची वृत्तपत्रे त्याच्या रसभरीत मुलाखती छापत असत.

हिंदुस्थानात अवतारांची कमतरता कधीच नसते. लोककल्याणाचा वसा घेतल्याचे दाखवून, तत्त्वज्ञानाचे चाळ पायात बांधून बुवाबाजीचा तमाशा करणारे 'आचार्य' आजचेच नाहीत, पूर्वीपासून त्यांची परंपरा आहे. ह्या अवतारात आणखी एका रतनबुवाची भर पडली आहे एव्हढेच. जसे वृत्तपत्रे भासवत आहेत, तशी वस्तुस्थितीही आहे.

त्याच्या ज्या ज्या मुलाखती छापल्या जातात त्यातून त्याचे एक मोहवणारे चित्र उभे करण्यात येते. रतन खत्री एक अवलिया आहे, त्याला पैशाची हाव नाही, स्वार्थ नाही. तो एक अत्यंत प्रामाणिक माणूस आहे, अगदी साधे-पणाने रहातो. समाजाच्या उन्नती-अवनतीची चिंता त्याला आहे. मटका बंद झाला तर मटक्यावर जगणाऱ्या लाखो लोकांवर बकारीची कुऱ्हाड कोसळेल ह्या काळजीनेच तो मटका बंद करायला तयार नाही. आपल्या मुलांनी खूप शिकावे असे त्याला वाटते. रतन अतिशय उदार आणि दिलदार माणूस आहे. असा एकंदर वर्णनाचा प्रकार. बुवाबाजीची चटक लागलेल्यांपैकी जर मी असतो तर मुंबईत एक रतनमठ मी सुरू केला असता, आणि ह्या मठात हजारो भक्त सामील झाले असते, ह्यात

मला तरी शंका वाटत नाही.

मटका हा प्रकार काय आहे ? हे समजून घेण्यासाठी काही विशेष करण्याची आवश्यकता नाही. बऱ्याच वृत्तपत्रांनी सविस्तर वर्णने, आकडा कसा निघतो, बुकींची संघटना कशी असते वगैरे सर्व गोष्टी सपशीलासह, दिलेली आहेत. आपल्या घरचा गडी, ऑफिसातला शिपाई, किंवा स्वतःचा कॉलेजातला मुलगा (किंवा मुलगीही) ह्यांना विचारले तरीही सर्व माहिती व मदत जिज्ञासूंना मिळू शकेल !

घरोघरी मातीच्या चुलीसारखीच गल्लोगल्ली, मुंबई–पुण्यात इराण्याची हॉटेल्स आहेत, आणि ह्या हॉटेलात गेल्या २।३ वर्षांतल्या आलेल्या आकड्यांचे पंचांग घेऊन आजचा आकडा काढण्यात गर्क झालेले लोक पहायला मिळतात. संध्याकाळी ६ पासून रात्रीपर्यंत सर्व हॉटेल ह्या लोकांनी भरलेले असते. फारच 'मेडिटेशन' करावे लागते, तप साधना ह्या आकडा सिद्धीसाठी अतिशय मेहनत घेऊन करावी लागते. हातात सिगारेटचे थोटूक आणि समोर फिजिक्सची वही अशीही 'फिट' आकड्याची मनधरणी चालू असते. खुर्चीच्या बाजूला भाजीची पिशवी अडकवली आहे, घरी बायको वाट पहाते आहे, समोर चहाच्या कपात माशा पडल्या आहेत, चिंता भाजीच्या वाढत्या भावापेक्षा अनेक दिवस 'बंद' होऊन पडलेल्या एकाद्या आकड्याचीच जास्त असते. दातांची कवळी आणायला विसरले म्हणून खारी बिस्किटे चहात भिजवून, मऊ बनवून खात खात चष्म्याच्या वरून बघत मटक्याच्या 'डेल्यां'चे पारायण करणारे काही म्हातारे अर्कही ह्या इराण्याकडे असतात. पूर्ण घुरकट वातावरण, मटकामय झालेले असते.

काल आलेला आकडा आणि आज संध्याकाळचा संभाव्य आकडा, दोन्ही मुले शाळेच्या फळ्यावर लिहितात. आधी नीटपणे ते पाहून, आपला नेमका कितीने चुकला त्याचा हिशोब करत मास्तर रागारागाने मग तो आकडा पुसतात, नागरिक शास्त्राचे पुढले प्रश्न तेथे लिहिण्यासाठी. दाराआडून शाळेचा शिपाई हसतो. त्याने जी 'लाईन' मास्तरना सांगितलेली असते ती मास्तरानी जुमानलेली नसते. परिणामी मास्तरांचा रुपया फुकट जाऊन शिपायाचे मात्र ७ रुपये झालेले असतात.

मोठमोठ्या खाजगी कंपन्या, सरकारी कचेऱ्या, बँका, इथले बरेच शिकलेसवरलेले लोक आपल्या शिपायामार्फत 'चिठ्ठी' पाठवतात. दररोज ऑफिसमधे आल्यावर, पहिल्या प्रथम, न चुकता आज संध्याकाळच्या आकड्याचे पैसे घ्यायचे व कालचा हिशोब शिपायाकडून बरोबर घ्यायचा. नियमितपणे ! हा कार्यक्रम आटोपल्यावर मग वर्तमानपत्रातल्या बातम्यावर चर्चा करायची आणि समाजाची कशी सर्वांगीण अवनती होते आहे ह्यावर गंभीरपणे चर्चा करायची हेसुद्धा अगदी नियमितपणे.

दररोज ओपनचा आणि क्लोजचा आकडा फुटायच्या सुमारास लोक बेचैन

असतात. बायको प्रसूतीसाठी डिलीव्हरीच्या खोलीत गेल्यावर बाहेर येर-झारा घालत मुलगा की मुलगी ह्याची वाट पहात राहणाऱ्या नवऱ्यासारखे ! रविवारी वेडेपिसे ! कारण मटका बंद ! मटका साहित्य छापणाऱ्यापासून तर अड्डयावर काम करणाऱ्या बुकींपर्यंतचा हा नोकर वर्ग आणि मटका साम्राज्यातले असंख्य प्रजाजन, अशांचे मिळून करोडो लोकांचे हे मटका साम्राज्य बनलेले आहे.

वर्ग संघर्षाचा सिद्धांत मांडून गरीब-श्रीमंत असे वर्ग नष्ट करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला, सवर्ण दलित अशी विभागणी नष्ट करण्याचा विडा आंबेडकरांनी उचलला. पण ह्या दोघांनाही जे जमले नाही ते दुसऱ्या वेगळ्या मार्गाने परम पूज्य रतनजी खत्रींनी मात्र करून दाखवले आहे. मालक, मजूर, हरिजन, सवर्ण; सर्व भिंती नष्ट करून सर्वांनाच एका आकड्यावर चिंतन करण्यासाठी बसवून ठेवण्याची क्रांती रतन खत्रीने घडवून आणली आहे, हे मात्र कबूल करावेच लागते !

### प्रचंड साम्राज्य

ह्या साम्राज्यात असतोष आहेत. भांडणे आहेत. बुकींच्या आपसातल्या कुरबुरी, मटका व दारू दोन्हींच्या साहचर्यांतून अपरिहार्यपणे होणारी भांडणे, धंद्यात पैसे गुंतवलेल्या शेठ लोकांची नाराजी, पोलिसांना कमी पडणारे हप्ते अशा अनेक गोष्टींमुळे भांडणे होतात आणि अनेकवेळा सुरे, सायकलीच्या चेन्स, सोडा वॉटरच्या बाटल्या अशा आयुधांनी शेकडोंच्या संख्येने जमलेल्या सैनिकांचे युद्धही होते. एकदम संध्याकाळी ५ च्या सुमारास इकडून काही जण, दुसरीकडून काही जण, क्षणार्धात समोरासमोर येतात. १० मिनिटं तुफान मारामारी होते, रक्त सांडते, बाजारहाट करायला आलेले लोकही जखमी होतात. जितक्या अवचितपणे सुरवात होते तितक्याच अवचितपणे मारामारी संपते सामसूम. पुढल्या मारामारीची, सूडाची बीजे पेरली जातात. हा सामान्य माणसाला भयभीत करणारा अनुभव मुंबईत नित्याचाच होऊन बसला आहे. सुपारी घेऊन मारामाऱ्या करणाऱ्या असंख्य गँग्ज आता फोफावत आहेत. 'राडा' करणे हाच त्यांचा नित्याचा धंदा असतो. सामान्य माणसाला हे लोक सुखाने जगायला देतील असे दिसत नाही.

पोलिसांचे बिचाऱ्यांचे हात ह्या प्रकरणी नेहमीच अडकलेले असतात. सफेद कपडे घालून काळ्या कारभारात रममाण होता येते, मग निळ्या आणि खाकी कपड्याने काय पाप केले आहे ? तेही जमेल तेव्हा रेकॉर्डसाठी एखाद-दोन धाडी घालतात व अन्यवेळी डोळे उघडे ठेवून झोपा काढत असतात, मग बिचारे शरद पवार तरी काय करणार ? संसदीय मार्गाने, जाहीर करून, विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणाऱ्या नेत्यांना झटपट अटक करून महिनोन महिने तुरुंगात ठेवणाऱ्या पवारांना विधानसभेत मृणाल गोरेंच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगावे

लागते की,' आम्ही रतन खत्रीच्या हालचालीवर लक्ष ठेवून आहोत.' पुरावा सापडल्यावर अटक करूच. पोलीस-यंत्रणेचेच हात बरबटल्यावर पवारांना काही करणे शक्य होत नाही. ही त्यांची अगतिकता मान्यच करावी लागेल.

असा हा मटका एका अंडर ग्राऊंड अशा भयानक जगाची पायभरणी करणारा. समाजाची झोपच उडवणारा !

### कोणती उपाययोजना ?

सरकार ह्यावर कायदेशीर उपाययोजना करणार आहे ! कोणावर उपाययोजना करणार ? माणसाच्या मनात खोलवर रुजवलेल्या वाईट सवयींवर ? मटका ह्या प्रवृत्तीला कारणीभूत होणाऱ्या सामाजिक परिस्थितीवर ? माणसाला सर्व बाजूंनी घेरून असहाय्य बनवणाऱ्या नैराश्यावर ? की एखाद्या दुर्बल, हातात सापडलेल्या चिल्लर मटका बुकीवर ?

एखाद्या विशिष्ट आकड्यावर चार आणे लावणे आणि काही तासांनी आकडा बरोबर असल्यास पैसे घेणे ही अगदी साधी क्रिया वाटते. पण एखाद्या माणसाने ही क्रिया का केली आहे ह्याचा जर बोध घेतला तर डोळ्यावरची झापड उडवणाऱ्या गोष्टी लक्षात येतील. ज्यांबद्दल विचार करण्याची सवड सध्या कोणाला नाही.

जुगारी प्रवृत्ती किमान आजपर्यंत तरी माणसाच्या मनात टिकून आहे. कमी श्रमात जास्त फळ घेण्याची ही प्रवृत्ती. आजच्या काळात १०० रुपयावर वर्षाला जास्तीत जास्त २५ रुपये मिळणे हे कायद्याला मान्य आहे. पण १०० चे दहा हजार मिळविण्याची हाव माणसाला असते. ह्या हावेपायी माणूस शोषणाकडे झुकतो, अत्याचारी मार्गाचा अवलंब करतो, मात्स्य न्याय सुरू होऊन समाजाचा गाडा चालेनासा होतो. म्हणून समाज शासन संस्थेद्वारे काही निकष ठरवून अनर्जित उत्पन्नावर बंधने घालतो. ही माणसाची झटकन पैसा मिळवण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात काबूत राहते त्यावेळीच समाज सुरळीत चालतो. ज्यावेळी त्या त्या काळच्या कायद्यांना, संकेतांना झुगारून ही प्रवृत्ती आक्रमक बनते त्यावेळीच समाजाचा पाया हादरायला लागतो. मटक्यावर पैसे लावणाऱ्यांचे वाढते प्रमाण ह्या प्रवृत्तीचे आक्रमक होण्याचे लक्षण आहे. म्हणूनच ही एक प्रवृत्ती आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. सामान्य ४ आणेवाला आणि लॉटरीचे तिकीट घेणारा दोघांच्यातही ती रुजलेली आहे. मटक्याचा आकडा दिवसातून २ वेळा निघतो तर लॉटरी महिन्यातून दोन वेळा फुटते, एकाची चिठ्ठी लहान व ओबड धोबड असते, तर दुसरीची चिठ्ठी-तिकीट हे फार चांगल्या रंगात डिझाईनमध्ये असते. मटका कुठेतरी गुप्त ठिकाणी निघतो तर लॉटरी जाहीरपणे, नटनट्यांच्या हस्ते निघते. असा तपशीलाचा काय आहे तेव्हढा फरक. नाहीतर रतनचा मटका आणि सरकारची लॉटरी ह्यात गुणात्मक फरक काहीच नाही. झटकन आपल्या शक्तीबाहेर असलेल्या सुखाच्या पाठी

लागण्याची प्रवृत्ती शासनाने कायदेशीर ठरवली आहे एव्हढेच. घोड्यावर पैसे लावून गबर होण्याचा मार्ग मंत्र्यांसह समाजातल्या सर्व उच्चभ्रू लोकांना खुला करून देताना शासन ह्याच प्रवृत्ती-पुढे मान तुकवत असते. आणि म्हणूनच रतन खत्री आणि शासनकर्ते दोहो-तही मूलतः काहीही फरक नाही. समाजाला घातक प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचे, आणि मूळ कारणाकडे न पहाता वरवरचे उपाय शोधण्याचे अंतिमतः घातक कृत्य दोघे करत आहेत.

मटका लावण्याकडे लोक वळतात ह्याला सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, सर्व आघाड्यांवर समाजाला, सामाजिक संस्थांना आलेले अपयश आज माणसाला मटक्याकडे खेचून नेत आहे.

## धूळफेक ठरेल

वाढलेल्या शिक्षणाच्या सोयींमुळे, वृत्तपत्रांची दळणवळणाची झालेली वाढ, माहितीच्या पातळीवर सामान्य माण-साचे वाढलेले ज्ञान अशा बाबींमुळे सामान्य माणसाच्या आकांक्षा वाढल्या आहेत. नवनवीन सुखाची चटक त्याला लागते आहे. पण आपल्यासारख्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशात ही सुखे पुरवू शकणारी साधने, पैसा त्यांना मिळणे शक्य होत नाही. पण दुसऱ्या बाजूला फूटपाथवर झोपणारा कुली करोडो रुपये मिळवू शकतो, मंत्री-पदावर येण्यापूर्वी फकीर असलेला माणूस मंत्रीपद भोगल्यावर अमीर बनू शकतो, सामान्य असा काहीच जमीन नसलेला माणूस सरकारी कॅनॉलचे पाणी चोरून हरितक्रांती करू शकतो, हातात पैसा नसताना स्वतःच्या सुंदर बायकोचेच भांडवल करून जयंती शिपींग कंपनी उभी राहू शकते, हे त्याला पहायला मिळते. पुन्हा सुखाची स्वप्ने तो पाहू लागतो. ज्यांच्या मन-गटात ताकद असते तो धर्मा तेजा होतो. पण ज्यांच्याकडे ताकद नाही, निगरगट्ट-पणा नाही, अशांचीच संख्या जास्त असते; आहे. परिणामतः मटक्याच्या रांगेत उभे राहण्यापलीकडे त्याला दुसरा मार्ग नाही. त्यात मग जे घाबरट मध्यमवर्गीय असतात ते लॉटरीची तिकिटे घेतात. दारू तर प्यायची, पण जर कायद्याने मान्य केली तर, अशा प्रवृ-त्तीची ही मंडळी. भयानक वेगाने वाढणारी महागाई सामान्यांचा खिसा महिन्याच्या ५ तारखेलाच रिकामा करुन टाकते. पैशाची क्रयशक्तीही दिवसेंदिवस कमी होत जात आहे. बटाट्याची किंमत सफरचंदाच्या किंमतीला जाऊन भिडते आहे. साध्या स्वच्छ मार्गाने बऱ्यापैकी जीवन जगणे कठीण करून टाकले आहे, बोकाळलेल्या भ्रष्टाचाराने ह्या सर्वांचा अपरिहार्य परिणाम मटका प्रवृत्ती बळावण्यातच होत रहतो. कायदा करून मटका बंद करण्याचा सरकारचा प्रयत्न हा धूळफेक करण्यासारखा आहे. आपले आर्थिक आघाडीवरचे अपयश लपवून लोकांना फसवण्यासारखा आहे. आर्थिक विपन्नावस्था आणि कायदा ह्या दोन पात्यांच्या कात्रीत सामान्य माण-साच्या चिंध्या सरकार करत आहे.

'थ्रिल' साठी मटक्याकडे वळणारे लोकही आहेत. दारूतसुद्धा हल्ली इतके पाणी कधीकधी घालतात की नशाच येत नाही त्यापेक्षा मटक्याच्या आकड्याची वाट पहात स्वप्ने रंगवीत बसण्याचीच नशा बरी असे म्हणणारे हे लोक असतात.

१९३५ ते १९४२ ह्या काळातली वर्तमानपत्रे चाळून पहावीत. आजच्यापेक्षा कितीतरी पटींनी त्यावेळी कमी गुन्हेगारी होती हे पहावयाला मिळेल. आपल्या स्वार्थाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी, देशासाठी काही भव्य-दिव्य करण्याची आकांक्षा सामान्यातला सामान्य माणसात फुलवण्यात गांधीजी यशस्वी झाले होते. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी सत्याग्रह करुन तुरुंगात जाणारे अनेक तरुण त्या काळात होते. ९ ऑगस्टला मुंबईत झालेल्या चलेजावच्या घोषणेला, गांधीजींना कधी पाहिलेलेही नाही, अशा माणसाने दूर, चंद्रपूर जिल्ह्यातल्या चिमूरच्या सामान्य माणसानेही प्रतिसाद दिला, सत्याग्रह केला, ग्रामसफाई केली, सहभोजन केले, वंदेमातरमचा घोष अट्टाहासाने केला. वेळच नव्हता कोणाला गुन्हे करण्यासाठी. स्वच्छ चारित्र्याचे बोलेल त्याप्रमाणे चालणारे, निस्वार्थी नेतत्वही त्याकाळात चळवळीत आघाडीवर होते. स्वतःचे घर आणि राष्ट्रीय चळवळ, समाजोन्नती अशा दोन बिंदूतच जणू सामान्य माणसाचे जीवन सामावलेले होते. आज ह्यापैकी काय आहे? खाबूगिरी, भ्रष्टाचार, ह्या बोटावरची थुंकी त्या बोटावर करणे, स्वतःची तुंबडी भरणे हेच नेतृत्वाचे पैलू शिल्लक आहेत. चळवळही स्वार्थासाठीच राबवली जाते. सामान्य माणसाला आलेले राजकीय जीवनाचे कटु अनुभव स्वतः-पलीकड लोकांकडे बघण्यापासून परावृत्त करतात. रिकामटेकडे बनलेले हे लोक भव्यदिव्य स्वप्न पहाण्यातून काही फायदा नाही हे जाणवलेले हे जनसामान्य झटकन गुन्हेगारीकडे वळतात.

सामाजिक बाबतीतही जीवन निरस, संशयाने पछाडलेले होते आहे. अध्यात्मिक सुखाकडे शेवटला मार्ग म्हणून जाण्याचा प्रयत्न करावे तर चोरून माल आणणारे, परदेशातून, बुवा भेटतात. समाजाचा कळवळा आहे असे कळकळीने बोलणारे लोक स्वतः ऐषआरामात 'वुडलँड्स' मध्ये राहातात. अध्यात्माची शिकवण देताना कंपन्यांच्या शेअर्स घेण्यासारखी 'ऐहिक' काळजी ही मंडळी घेतात. देवस्थानातले पैसेही भटजी चक्क खातात. बुवांचे बलात्कार तर राजरोसच. कोणाकडे पहावे मार्गदर्शनासाठी? किमान नीतीमत्तेची पातळीच राहिलेली नाही, ज्याला मॉरल फायबर म्हणतात तोच मुळी नष्ट झालेली. मूल्यांचीच दिवाळखोरी माजल्यावर समाजाचे चांगले-वाईट ठरवायचे मापच शिल्लक राहात नाही. निराशा वाढतच जात आहे.

अशाप्रकारे सर्व दरवाजे बंद होत होत मटक्याच्या दरवाजाशी मग सामान्य माणूस येऊन उभा ठाकतो. सावकाशीने पण अपरिहार्यपणे. ही आहे सुरुवात.

बादळाची नांदी. खरे वादळ अजून यायचे आहे.

कायदा करून हा प्रश्न सुटणार नाही. कायदा आवश्यक आहे हे अमान्य नाही. पण कायदा जन्माला घालताना त्यातून पळवाटा काढणारे वकीलही समाज जन्माला घालत असतो. कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा भ्रष्ट करण्याची पावलेही समाज व सरकार टाकत असते हेही विसरता कामा नये. ज्यांच्या हातात पैसा आहे, पायाशी मोटार आहे, प्रतिष्ठेची झूल अंगावर आहे ते सुटतात, सामान्य माणूस मात्र कचाट्यात सापडतो. पण प्रवृत्ती वाढतच राहते. 'केसरी'सारखे वृत्तपत्र आता टिळकांचा वारसा बरोबर चालवते--पान भरून मटक्याच्या शुभराशी देऊन, 'तेल्या-तांबोळ्यातही' मटका लोकप्रिय करण्याची कामगिरी बजावून--हेही विसरता कामा नये. समाज, शासन, हितसंबंधी सर्वांचे पाय कसे एकमेकात गुंतलेले असतात त्याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

समाजात झालेली कोंडी सोडवण्यासाठी, माणसाचे नैराश्य घालवण्यासाठी, आर्थिक व सामाजिक विपन्नावस्था घालवण्यासाठीच जर प्रयत्न झाले तर ह्या खतरनाक प्रवृत्तीतून माणूस सुटेल.

प्रश्न आहे मटक्याच्या गळ्यात घंटा बांधायची कोणी ?

• • •



# एक प्रेमपत्र !

—श्री. रा. रा. नोएल बर्न साहेबांस,
स. न. वि. वि. !

आपली माझी तशी ओळख नाही. पण गेल्याच आठवड्यातील 'टाईम्स' वगैरे मुंबईच्या प्रमुख वृत्तपत्रांमधून आपले फोटो आणि मुलाखती प्रसिद्ध झालेल्या पाहिल्या. आपण 'बर्मिंगहॅम चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' ह्या इंग्लंडमधील मान्यवर संस्थतर्फे बारा जणांचे शिष्टमंडळ घेऊन भारतात आलेले आहात हे समजले. शिष्टमंडळाचे प्रमुख ह्या नात्याने आपण, मुंबईस गेल्या चौदा मार्चला पत्रकारांना मुलाखत दिली. त्यामध्ये आमच्या सरकारी कारभारावर, लालफीतीवर टिका केलेली आहे. एक मतदार म्हणून, माझ्यावरच ती टिका मी समजतो. सरकारतर्फे आपणास काही उत्तर देण्यात येणार नाही, म्हणून, मीच पर्सनल उत्तर देत आहे.

बर्नसाहेब, आपण कुणी मंत्री, खासदार, आमदार नाही, त्यामुळे आपली मुलाखत रेडीओवर, टिव्हीवर आली नसणारच स्वतंत्र लोकशाहीच्या या देशात तुमच्या विद्वत्तेला, नावामागच्या पदव्यांपेक्षा, खुर्चीलाच अधिक महत्त्व आहे, हे ध्यानात घ्यावे तेव्हा पुढील खेपेस प्रसिद्धीसाठी असे काहीतरी बनून येण्याचे लक्षात ठेवालच. मुंबईस आपण म्हणे भलभलते वक्तव्य केले. उदा. कायदेकानून अधिक सोपे करावेत, लायसेन्सेस देण्याच्या सध्याच्या पद्धती सुधाराव्यात, सरकारी कामकाज भराभर व्हावे नाहीतर एके दिवशी देशाचा जीव गुदमरून जाईल! बर्नसाहेब, आपणाला चष्मा लावायला पाहिजे. म्हणे देशाचा जीव गुदमरून जाईल! अहो, मग सध्या काय आहे ते दिसलं नाही वाटतं? जिकडेतिकडे देशभर काहीना काहीचा दुष्काळ अन् कपात. धान्याचा दुष्काळ, वीज कपात, पाण्याचा दुष्काळ, साखरेत कपात, वनस्पती तूप अदृश्य, गव्हाचा दुष्काळ आणि खूप खूप! हेच सारं जीव गुदमरण्यास पुरेसं नाही काय?

जगातील अनेक उद्योगपतींना म्हणे भांडवल गुंतवण्यास भारतापेक्षा इतर देशच बरे वाटतात व ते भारतात येत नाहीत. तुमचा गैरसमज झालाय साहेब. त्यांना ठाऊक आहे की भारत हा भांडवलदारांचा देश नाहीये. इथे प्रत्येक धंद्याचे राष्ट्रीयीकरण पायरीपायरीने होणार आहे व देशातील प्रत्येकाची गरिबी हटविली जाणार आहे आपण धंदा काढला अन् राष्ट्रीयीकरण झालं तर? ह्या भीतीने ते येत नाहीत. स्पष्ट शब्दात म्हणजे ते भांडवलदार भित्रे, भेकड आहेत.

उद्योगधंद्यांना परवाने देण्याबाबत आपण अक्षरश: खोटी विधाने केली आहेत. म्हणे, साधा परवाना मिळवण्यास किमान ६ महिन्यापासून दोन-वर्षांपर्यंत वेळ लागतो. त्या काळात म्हणे कागदपत्रे निरनिराळ्या २५ खात्यांच्या फाईलीतून जावी लागतात. एकेका टप्प्यावरच कागद अडून राहातात. आर्थिक मदत मिळून, आयात परवाना मिळून ती मशिनरी भारताच्या किनाऱ्याला लागेपर्यंत म्हणे जुनी होऊन गंजून गेलेली असते. पुरे! पुरे! बर्नसाहेब, सहा महिने कशाला पाहिजेत हो साध्या लायसेन्ससाठी ? परवाच्या मध्यावधी निवडणुकांच्या आधी पंधरा दिवसातच किती लायसन्सेस दिली ती ठाऊक नाही वाटतं ! कागदपत्रे २०।२५ फायलींतून अशासाठी ठेवायची की, उद्या ऐनवेळी एखादी नेमकी 'फाईल' गहाळ झाली तर दुसरी असावी. समजा संबंधीत ऑफिसला आग लागून नेमकी तीच फाईल जळाली तर? टप्प्याटप्प्यांवर कागद पुढे सरकतच नाहीत म्हणे, म्हणजे कागद टेबलावर राहातात हे मान्य आहे तुम्हाला तर! "पेपरवेट" शिवाय कागद "गेले उडत" असे होत नाही, हेच थोडेथोडके आहे काय ? कोण म्हणतो आर्थिक मदत मिळण्यास अनंत अडचणी असून खप वेळ लागतो ? महाराज, आमच्या देशातील बँका आता जनतेच्या आहेत. दिल्लीला बूटपॉलीशवाल्याला, रिक्शावाल्यांना काहीही पत न पाहता २५।२५ रुपये कर्जे दिलेली छायाचित्रे 'आपण 'टाईम', 'लाईफ'मधे पाहिली नाहीत काय ? पूर्वी बँकांचा पैसा भांडवलदार काळ्याबाजारासाठी वापरीत असत. आता तो पैसा गरीब उद्योगी कल्पक इंजीनियर्संना पतीशिवाय मिळतो आहे. सन १९७१ मध्ये दरमहा ६० रुपये उत्पन्न इन्कमटॅक्सचे रिटर्नमध्ये दाखविणाऱ्या कुणा कल्पक इंजीनियरलासुद्धा बँकेने कर्ज दिले–झटपट, विनासायास–आणि आज तो तरुण 'मारुती' ही जनतेसाठी स्वस्तातली मोटारगाडी तयार करीत आहे. बर्नसाहेब, तुम्ही आपली विधाने कृपया माग घ्या.

आपले नंतरचे विधान म्हणजे भारत निर्यातीच्या बाबतीत खूपच मागे आहे. निर्यात अनेक प्रकारे वाढविता येईल म्हणे. पण कशाची निर्यात हा खुलासा केलेला नाहीये! आमच्या केरळातून बाटविलेल्या मुलींची निर्यात ठाऊक नाही वाटतं ? तुमच्याच देशातील आमच्या वकिलातीमध्ये असणारा भारतीय नोकरवर्ग चौपट वाढला होताच ना ? शिवाय अनेक मंत्री, त्यांची कुटुंबे परदेशी जातच असतात ना !

भारतातील सध्याची वीजकपात पाहून तुम्हाला म्हणे धक्काच बसला. त्यासाठी म्हणे मोठमोठे पॉवर जनरेटर्स इग्लंडात आहेत आणि भारताकडून शब्द मिळण्याचीच खोटी – ते जनरेटर्स भारताला पाठवण्यास तुमचा देश म्हणे एका पायावर तयार आहे, वगैरे वगैरे !

आत्तापर्यंतच्या मुक्ताफळांत एवढंच

काय ते "शुभ बोल नाऱ्या" म्हणायची पाळी आलीय. ते जनरेटर्स भारताच्या किनाऱ्यावरच नव्हे तर, आम्ही सांगू त्या त्या द्राक्षमळ्यात, त्या त्या लग्न-मंडपात तुमच्या खर्चाने बसवून देणार का? 'हो' म्हणायचाच अवकाश की, येथे लगेच "जनरेटर्स कार्पोरेशन ऑफ इंडिया" स्थापन करून, जनरेटर्स पहाणी–मोजणी करण्यासाठी मोठ्ठे थोरले शिष्टमंडळ घेवून मीच तिकडे येतो बघा. मग जनरेटर्सचे प्रकरण गेल्या खेपेच्या ट्रॅक्टर्सप्रमाणे झाले तरी हरकत नाही...ते दुरुस्त होण्यास आणखी २१४ जरी वर्षे लागली तरी इथली वीजकपात बंद होणार नाही हे पक्के समजा. मग काय ठरले तर? आता ह्या पत्रान्वये आपलीभेट झालेलीच आहे, सॉरी ओळख झालीय. पुढील २१४ महिन्यातच आपली लंडनला भेटही होईल. कारण मी झेड्. पी. ची निवडणूक लढविणार आहे आता. असो. तेव्हा, बर्नसाहेब काय अधिक उणं लिहिले जर असेल तर मनावर घेवू नका बरं का!

आपणास पत्र पाठवायचे तरी कुठे? आपले शिष्टमंडळ भारताचा दौरा करीत असणार, म्हणून पत्र प्रसिद्धच केले. कळावे. लोभ असावा ही विनंती. (तेवढं जनरेटर्सचं विसरू नका हं.)

आपला,


**सोमाजी गोमाजी कापशे**


**शनवारवाड्यातील शमादान**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**





# लिंघा सानै

## अनिल बळेल

लिंबा सानेशी काल काही पहिलीच भेट नव्हती. अनेकदा भेटी झाल्या होत्या, गप्पा रंगल्या होत्या. पण तिच्यांशी बोलताना कालच्यासारखा पूर्वी कध च प्रभावीत झालो नव्हतो.

तिचे म्हणणे खोटे नव्हते. मी नेहमीच तिच्याकडे दुर्लक्ष करत आलो होतो. हे तिला तीव्रतेने बोचले होते. वरवर जरी मी असे दर्शविले असले तरी मनात तिच्याबद्दल एक कोपरा निश्चित होता. पण तो तिच्या लक्षात कसा यावा ? म्हणूनच व्याकुळतेने ती म्हणत होती. "ही काही पहिलीच वेळ नाही तुमची माझ्या बाबतीतल्या बेपर्वा वृत्तीची. तुम्ही नेहमीच मला उडवून लावता. झिडकारता तुम्ही भाषाप्रभु आहात शब्दभांडार भरपूर आहे तुमच्याजवळ आमच्याजवळ शब्दांचा ठणठणाट. म्हणूनच मी तुमच्याशी जास्त वाद घालत बसत नाही. माझी नाराजी माझ्या पेंटिंगमध्ये बुडवते. त्या रंगांत माझा दर्द मिसळून जातो. खुलून उठतो. आजही असेच करणार आहे. रात्रीतून पेंटिंग पूर्ण करेल. उद्या सकाळी याल बघायला ?"

"जरूर" मी बसावधपणे कबूल करून बसलो.

"खरंच या विद्यानिवासात कोणीही सांगेल माझी खोली कोणती ते–"

गहिऱ्या निळ्या रंगातलं पेंटिंग गुलाबी रंगाच्या भींतीवर असे काही उठून दिसत होते की जणू त्यासाठीच तो रंग दिला गेलाय; असे त्याने दिमाखाने सांगावे. बरोबर त्याच्या समोरच लँडस्केप लाजत-मुरडत होते. छोट्याशा गोदरेज कपाटावरच्या त्या दोन गोंडस हस्तीदंती मूर्ती ! एक न्यूड ! जमिनीवरचा गालिचाही कलात्मक ! एका दृष्टिक्षेपातच कळत होतं की येथे रसिल्या जातीचा कलावंत रहातोय.

"हं" चहाचा कप माझ्या हातात देत लिंबा साने कोचावर बसली.

मस्तच झाला होता चहा ! एका कपाने माझे काय समाधान होणार ?

"मला तुमच्याशी चर्चा करायची आहे. तुमच्या कवितांवर."

"चर्चा ? माझ्या कवितांवर ?"

"का ? आश्चर्य वाटायला काय झालं ? सर्व कला अखेर एकच नाहीत का ? एखादी चांगली कविता पेंटिंगचा विषय होऊ शकते. तसेच एखादे पेंटिंगही कवितेचा विषय नाही का होऊ शकत ? –पेंटिंग–पेंटिंगच माझं जीवन आहे. त्याशिवाय मी जगूच शकणार नाही. तुम्ही जगू शकाल कवितेशिवाय ?... नाहा मला तुमच्याशी वाद नाही घालायचा. पण तुम्ही मला समजावून

घ्या. पिकाबोला जसं जाणता. रविवर्म्याला जसं जाणता, आपल्या दलालमुळगावकरांना जसं वाखाणता, तसंच मलाही जाणून घ्या–मला माहीत आहे ते. सर्व थोर आहेत–माझी पात्रता तेवढी नाहीय. मी त्यांच्याशी तुलना करा असेही म्हणत नाहीय...फक्त मलाही जाणून घ्या. एवढच माझं म्हणणं आहे. कारण तुम्हाला ती दृष्टी आहे–

ती बोलत होती. मी ऐकत होतो. अवाक होत होतो. माझ्यावर 'भाषाप्रभु'चा आरोप करून तीच शब्दनृत्य करीत होती. खरच का मला ती जाण होती...समज होती...दृष्टी होती की जी तिला अभिप्रेत होती. मला तिचे पेंटिंग आवडले होते. पण...

लिबा साने नावाप्रमाणेच लिंबासारखी पिवळीधमक अन् रसरशीत... तिच्या ठेंगण्या-ठुसक्या देहेयष्टीनी त्या सौंदर्यात भरच घातली होती. भुरभुऱ्या केसांनी ते सौंदर्य वाढतच होते–एक पेंटिंगच!

माझ्या स्वभावामुळे म्हणा अगर कवितामुळे म्हणा माझ्या जीवनात आणखीनही काही मुली येऊन गेल्याहेत. पण सध्या माझ्या मनात बसली आहे निम्मी! नाही म्हटले तरी माझे मन लिबा-निम्मीची तुलना करू लागले. छे! त्यांची तुलनाच होऊ शकत नाहीय. निम्मीही सुंदर आहे. तिच्यातही काही अनोखे सौंदर्य साठविलेले आहे जे लिबापेक्षा वेगळे आहे. त्या सौंदर्यात आव्हान असेल तर ह्या सौंदर्यात आवाहन! प्रत्येक स्त्री आपापल्या परीने सुंदर असतेच. ते तिचे वरदानच! परंतु प्रत्येक स्त्री कलाकार असतेच असे नाही. लिबा सुंदरही आहे अन् कलाकारही! तितकीच सुंदर कलाकार!

मनात येऊन गेले. निम्मी कोणाही बड्या माणसाची पत्नी म्हणून मिरवू शकेल पण लिबा? तिचा भिडू तिच्या भावनांना समजून घेणाराच हवा, नाहीतर...नाहीतर काही खरे नाही... संवेदनशील कलाकाराला तडजोड माहीत नसते. तो एकतर जीवनाला तरी कवटाळेल नाहीतर...नाहीतर मृत्यूला...

"काय बघताय एवढ?" लिबा मला तंद्रीतून बाहेर काढते.

"अं? काही नाही."

पुढ्यात आणून ठेवलेली तिची पेंटिंग्ज मी बघू लागतो. विषयांची रेलचेल–माध्यमांची विपुलता–शैलीचे संमेलन–कलागुणांची विविधता–अकारण तपशील न भरणारा रेषेचा सहज सुंदर खेळ–फिक्कट व किंचित गर्द रंगछटांच्या मोहक पार्श्वभूमीवर उभी ठाकलेली यौवना. विचारांच्या तंद्रीत हरवून बसलेल्या या तरुणीच्या डोक्यातील रक्तवर्णी फूल चित्रातील आकर्षकबिंदू–पाण्याला निघालेल्या गौळणी हा कलाकारांचा नेहमीचा विषय. त्याचा ढंग उठून दिसतो रंगाची पखरण होते तेव्हां–निखळ सौंदर्याचा अविष्कार करणारी 'कोजागिरी' विकृत नजरेने पहाणाऱ्या समाजाचे भक्ष्य बनलेली असहाय 'अबला'–किती तरी–

"अच्छा. चलतो–" मी घड्याळा-कडे बघत म्हणतो.

"थांबा. मी पण येते. मला 'कॉफी-हाऊस'पाशी सोडता?"

"जरूर. मला पण तिकडेच जायचंय. निम्मी वाट पहात असेल तेथ."

–निम्मीचं नाव काढल्यावर ती खट्टू होईल वाटलं होतं, पण ती तर खुशी दर्शवते. मी अस्वस्थ.–अरे हिच्या मनात आहे तरी काय! अखेर कला-काराला जाणणे इतके सोपं आहे का?

"कॉफी हाऊस"पाशी निम्मी कोठे दिसत नाही. वाट पाहून गेली असावी.

मी कॉफी हाऊसमधून तिला फोन करतो–

"तुझं हे नेहमीचं! कधी वेळेवर आला आहेस?"

"अग पण–"

"अग पण नाही न बिग पण नाही. आता ताबडतोब ये बरं. आम्ही सारे 'एम्प्रेस'ला निघालो आहोत. डायरेक्ट तिकडेच ये"

"निघतोच. लिबा साने माहितीय नं? ती आहे बरोबर तिलाही घेऊन येतो. येऊ नं?"

"अं ऽऽ–वील डू"

"ओ के"

मी लिबाला फोनवरचे बोलणे सांगतो.

"काही हरकत नाही. जाऊ या"

"चलो"

"पण आता आलोच आहोत तर कॉफी घेऊनच बाहेर पडू या नं ऽ"

मला तिचा प्रस्ताव पटतो.

"तुमचे निम्मीशी कोठपर्यंत संबंध" कॉफी घेता घेता ती फँकली विचारते.

"अजून तसे काही नाही–"

"इतरांशी?"

"हं"

"मला वाटतं–मला वाटतं–आपण एकमेकांना साथ द्यावी."

"लग्न"

"हं"

"पण तुला माझ्याबद्दल काय माहिती आहे?"

"मी एक स्त्री आहे. स्त्री पहिल्या दृष्टिक्षेपातच पुरुषाला ओळखते. तुमचं व्यक्तिगत जीवन काहीही असलं, त्यात काहीही संबंध आले असले, तरी एक नक्की तुमच्याजवळ सौंदर्यदृष्टी आहे. कलेची समज आहे. तुम्ही भावना जाणता. मी सर्वांबरोबर नाही राहू शकणार. कोणीही माझा जीवनसाथी नाही होऊ शकणार. विवाह म्हणजेच सर्वस्व असंही मी मानत नाही. पण मला माझी कला जाणणारा हवाय–ती जाण तुमच्या डोळ्यांत आहे–मला माझं सुख हवंय–तुमचं सुखही तुम्हाला मिळेल–मग?–"

मग आम्ही 'एम्प्रेस'ला गेलोच नाही.

● ● ●

पुस्तके

# शेणोलीकर □ देशपांडे

दादुमिया

थोडक्यात सर्व सांस्कृतिक मुद्द्यांचा परामर्ष घेणारे शेणोलीकर व देशपांडे यांचे हे एक अभ्यासनीय पुस्तक होय. प्रा. शेणोलीकर हे त्यांच्या संत वाङ्मयावरील व्यासंगामुळे प्रसिद्ध आहेत. 'ज्ञानेशांची अमृतवाणी' हा त्यांचा ग्रंथ रसिकांना सुपरिचित आहे. डॉ. प्र. न. देशपांडे हे धुळ्याच्या कॉलेजातील इतिहासाचे प्राध्यापक त्यांच्या 'मराठी किल्ले' या प्रबंधामुळे एकदम प्रकाशात आले. पुणे विश्वविद्यालयाने त्यांना या विषयावर डॉक्टरेट पदवी दिली. या दोघा प्राध्यापकांनी खूपच मेहनत घेऊन महाराष्ट्राच्या संस्कृतीवर हा उत्कृष्ट ग्रंथ लिहून मराठी वाचकांची फार मोठी सोय केली आहे.

पहिल्या सात प्रकरणात, म्हणजे सुमारे १९४ पृष्ठांत शेणोलीकरांनी महाराष्ट्राची ऐतिहासिक कूळकथा अत्यंत बहारदार रंगविली आहे सातवाहन ते यादवांचे साम्राज्य ही माहिती मोठी मजेदार आहे. पृ. ५–६ वर संस्कृती हे मानवाचे वैशिष्टच कसे व संस्कृती म्हणजे संस्कार परंपरा कशी याचे विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. यात डॉ. देशपांडचांनी Geo-politics ची सुंदर माहिती पृ १० वर दिली आहे

## चित्पावनांची कूळकथा

कोकण व कोकणस्थ ब्राह्मण यांच्या सुरस कथा आपण खूप ऐकतो. या लेखकद्वयांनी त्यांचा अर्थ असा दिला आहे, 'भूकंपामुळे वा अन्य कारणांमुळे अपरांताचा प्रदेश समुद्रातून वर आला होता. तो भाग परशुरामाच्याबरोबर आलेल्या आर्यांनी नांगरून, कालवे काढून, जंगलभाग तोडून वसाहतीयोग्य केला. परशुरामाने देशावरून आठ गोत्रांचे ब्राह्मण आणले. सिंधू तीराच्या कोळ्यांना ब्राह्मण्य दिले. दधीचिपुत्र सारस्वत यांच्याशी संबंधित अशी सारस्वत ब्राह्मणांची ६६ कुळे आणून त्यांची गोमंतकात स्थापना केली, समुद्रातून वाहत आलेल्या १४ प्रेतांना सजीव केले. या चिता–पावन झालेल्या ब्राह्मणांपासूनच १४ गोत्रांचे चित्पावन ब्राह्मण झाले. त्यांना ह्या नव्या प्रदेशात चांगली समृद्धी प्राप्त झाली. पुढे त्यांच्या वंशजांनी कारण नसता परशूरामाला

साकडे घातल्यामुळे संतप्त झालेल्या परशूरामाने 'ही समृद्ध भूमी यापुढे नापीक होईल. चरितार्थासाठी तुम्हाला दरवर्षी कष्ट घ्यावे लागतील. तुमचा स्वभाव कुत्सित व निंदक, भांडखोर व संशयी होईल' असा शाप दिला...या कथांचा भौगोलिक परिस्थितीशी चांगला अनुबंध लागतो.

महाराष्ट्राचे खरे रहिवासी कोण यावर या ग्रंथात पृ. ३९ ते ४३ वर फार सुंदर माहिती आढळते. दंडकारण्यात यक्ष, राक्षस व वानर रहात होते. आर्य जसजसे पुढे सरकू लागले तसतसे नाग वगैरे आर्यपूर्व लोक दक्षिणेस सरकले. हा प्रकार जनमेजयाच्या सर्पसत्राच्यावेळी घडला असावा, असे रामायण व महाभारतात आढळते. आर्येतर नागप्रभृती लोक हे खरे मऱ्हाटे! पुढे यज्ञसंस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आर्य ऋषीमुनींनी प्रथम विदर्भ, अपरांत व मग दंडकारण्य येथे प्रवेश केला. अगस्तीने विदर्भात, परशूरामाने अपरांतात व गौतमाने मराठवाड्यात आर्यीकरणाचे काय सुरू केले. वांशिकदृष्ट्या मराठे हे समिश्र रक्ताचे आहेत. आजचे जाधव पूर्वीचे यादव. हे मराठे पूर्वी धनगर-गवळी असावेत. वांशिक पुराव्यानुसार राजपूत लोक दीर्घमस्तक आहेत, मराठे खासच राजपूत नव्हेत. माध्यदिन ब्राह्मण सर्वस्वी मराठ्यासारखाच आहे.

मऱ्हाठ्यात तीन गट आढळतात :

१ : वारली, भिल्ल वगैरे आदिवासी उत्तर सीमा, वायव्य कोपरा, मधल्या डोंगर रांगा या भागात आढळतात.

२ : दुसरा गट शेतकऱ्यांचा आहे. हे उत्तरेकडून आले.

३ : तिसऱ्या गटात इतर जाती बसतात. शेणोलीकर व देशपांडे सारांशरूपाने मराठ्यांविषयी लिहितात, "या तीन गटामध्ये इतर जाती बसतात... माध्यंदिन ब्राह्मण मराठ्यापासून जवळजवळ अविभक्त आहेत. देशस्थ ऋग्वेदी हे वैश्यवाणी मुंबई गट व मराठे यांच्या दरम्यान येतात. ह्याचा अर्थ हा की मराठा, तिरोळे, कायस्थ, पाठारे व सर्व ब्राह्मण यांच्यातील शारीरिक साधर्म्यामुळे त्या सर्वांना एका गटात घालावे लागेल. ह्या जातींचे मूळच्या दीर्घमस्तक जातींशी व काही वन्य जातींशी निरनिराळ्या प्रमाणात मिश्रण होऊन इतर जाती झालेल्या दिसतात." (पृ.४७)

## जुना भाषावाद

नवव्या शतकात चालुक्य व यादव यांच्या राजवटीत संस्कृतचे महत्त्व वाढले. त्यामुळे प्राकृत भाषेवर संस्कृतची छाप महाराष्ट्रात जास्त दिसते. (त्याच कारणासाठी गुजराथीवर पर्शियन भाषेची छाप जास्त आढळते.) मात्र इ. स. ८०० च्या सुमारास लीलावई हे काव्य मरहट्ट देशी भाषेत लिहिल्याचा उल्लेख आहे. त्या वेळी राजशेखर या कवीने आपल्या काव्यमीमांसा ग्रंथात तत्कालीन राजदरबारातील भाषावादाचे बहारदार वर्णन केलेले आढळते. उत्तरेकडे संस्कृत कवी व त्यांचे मागे वैदिक, दार्शनिक, पौराणिक, स्मृतिशास्त्री यांचे स्थान आहे.

पूर्वेला प्राकृत भाषेचे कवी. त्यांच्या मागे नट, नर्तक, गायक, वादक इत्यादींच्या जागा. पश्चिमेला अपभ्रंश भाषेतले कवी. त्यांच्या मागे चित्रकार, लेणकार, मणिकार, सुतार, लोहार यांची सोय केलेली आहे. दक्षिणेकडे पैशाची भाषेतले कवी. त्यांच्यामागे वेश्या जादूगार, पहिलवान, शिपाई यांची रांग आहे. हे लेखकद्वय गंमतीने म्हणतात, '१३ व्या शतकात मराठी अभंग वाङ्मय निर्माण करणारे उत्पादक व्यवसाय करणारे कष्टकरी वर्गातले संतजनच होते,' हे सादृश्य अर्थपूर्ण वाटते.

संतवाङ्मय शेणोलीकरांचे 'होम पिच'. तेथे त्यांचो 'बॉलींग' समर्थ न पडल्यास आश्चर्य. पृ. १३१ वर ज्ञानेशाच्या तत्त्वज्ञ नावर त्यांनी लिहिलेले भाष्य मूळातून वाचकांनी वाचावे. महाराष्ट्रात प्राचीन काळी मातृदेवतेची पूजा रूढ होती. बौद्धधर्मामुळे चैत्य आणि विहार महाराष्ट्रात आले. ग्रामीण जीवनात आर्य व अनार्य देवतांचे पूर्वीपासून Peaceful Co-existence आढळते. चालुक्याची कुळदेवता 'वराह' होती. राष्ट्रकूटांच्या अमदानीत शैव, वैष्णव व जैन पंथ लोकप्रिय होते. यादव काळातच महाराष्ट्राचे खरे सांस्कृतिक चित्र मोहरले. यादवांनी स्थानिक देवतांना पूज्य मानले. त्यातून पंढरपूरचा विठ्ठल, जेजूरीचा खंडोबा, कोल्हापूरची महालक्ष्मी, मातापूरची रेणुका, कोकणातील परशूराम व तुळजापूरची भवानी यांचे महात्म्य वाढले. लिंगस्वरूप शिवपूजा महाराष्ट्रात प्राचीन आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी ५ स्थाने महाराष्ट्रात आहेत. शिव ही देवता मूळची अनार्यांची वीरभद्र व भैरव (बहिरोबा) ही शिवाची रूपे. बहिरोबास तर महाराष्ट्राने ग्रामरक्षक मानले आहे. खंडोबांच्या पूजेत ब्राह्मणांपासून अस्पृश्यांपर्यंत सारे भाग घेतात. गणपती हा वेदपूर्व देव महाराष्ट्रात पूर्वीपासून लोकप्रिय आहे अष्टविनायकाची सर्व स्थाने महाराष्ट्रातच आढळतात. पेशव्यांची ही कूळदेवता. साहजिकच पेशवाईत या देवतेची भक्ती व महात्म्य वाढले. कितीतरी गणेशमंदिरे बांधली गेली. टिळकांनी गणेशोत्सव सुरू करून या देवतेस सार्वजनिक दैवत बनविले. त्यामानाने विष्णू भक्ती महाराष्ट्रात एकंदर कमी. देशस्थ ब्राह्मणात विष्णूच्या नरसिंह या अवताराचे कुलदैवत म्हणून व चित्पावनात परशूराम या अवताराचे महात्म्य आढळते. श्रीराम या दैवतास सर्वप्रथम संत एकनाथांनी लोकप्रिय केले, तोवर महाराष्ट्रात रामाचे महात्म्य खास नव्हते मुस्लिमांच्या वर्चस्वाखाली मराठी मनास मरगळ आली होती, ती दूर करण्यासाठी आणि भारतीयांना त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी धनुर्धारी रामाची प्रतिमा जनमानसात निर्माण करण्याचे काम एकनाथांनी केले. याच कालखंडात उत्तर भारतात हे महत्कार्य तुलसीदासांनी केले. शिवकालात गावोगाव मारुतीची देवळे बांधली गेली व आखाडे तयार झाले. मारुती या देवतेचे वैशिष्ट्य

म्हणजे सर्व जातीजमातींना त्याचे दर्शन मुक्त होते.

## मराठी दैवते

विष्णूचा ८ वा अवतार श्रीकृष्ण महाराष्ट्रात लोकप्रिय आहे, विशेषत: बाळकृष्ण. पण महाराष्ट्र श्रीकृष्णाच्या विठ्ठल या रूपाची जास्त भक्ती करतो. आजही पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेताना 'वासुदेव हरी' हा घोष होतो. दत्तास गुरु मानले गेले. त्यामुळे निरनिराळ्या गुरुसंप्रदायांनी दत्तास उचलून धरले. १६ व्या शतकात 'गुरुचरित्र' जन्मास आले. पौराणिक देवतांची अवहेलना करणाऱ्या महानुभाव पंथीयांनीही दत्तास आपल्या पंथामध्ये स्थान दिले. मात्र नाथसंप्रदाय व महानुभाव यांचा दत्तत्रिमुखी नाही, एकमुखी आहे. पिराशी साम्य कल्पिल्यामुळे व बिदरचा बादशहा बरा झाल्याच्या कथेमुळे मुसलमानदेखील दत्ताची पूजा करतात !

नाथपंथ, महानुभाव व लिंगायत यांचे उत्तम वर्णन शेणोलीकरांनी केले आहे त्यात बरच नवीन माहिती वाचकास कळते. उदाहरणार्थ महानुभावांच्या प्रेमभक्तीला वैराग्याचे कोंदण असावे लागते. त्याकरता अन्न, वस्त्र, अटन निद्रा नि उपासना या बाबतीत चक्रधरांनी कडक नियम घालून दिले. जैनांप्रमाणे चक्रधारांचाही अहिंसेवर आग्रह होता. साऱ्या संतांना महानुभावी लोकांबद्दल तिरस्कार दिसतो तो का ? 'करणी कसब्याची, बोलणी मानभावाची' असे का म्हणतात ? याचे कारण त्या लोकांचा अनाचार व भ्रष्टाचार. या मानभावांनी मुस्लीम राजकर्त्यांच्या मोहबतीसाठी हिंदुधर्मीयांना उगाचच दुखावले ! त्यांनी सकेत लिप्या वापरल्या. उलट त्यामुळे त्यांच्याविषयी संशय वाढले ! वैदिक धर्माची त्यांनी पद्धतशीर हेटाळणी केल्यामुळे त्यांचा विरोध व प्रतिक्रिया एवढी वाढली की अवघ्या पाचश वर्षांत या पंथाची नावनिशाणी उरली नाही !

## सूफी संत (?)

सूफी पंथाचे केलेले विश्लेषण असेच डोळे उघडणारे आहे. हल्लीच्या मिशनऱ्यांप्रमाणे यांनी मुस्लीम राजसत्तेचे पाठबळ लाभले होते. मुस्लीम राज्यसत्तेस दृढ करण्यासाठी सूफींनी आपले बळ खर्ची घातले. सेतू माधवरावांच्या शब्दात, हिंदुस्थानावर राजवट दोन प्रकारची होती. एक बादशहा, सुलतान, अमीर उमराव यांची; व दुसरी मठातील सूफी साधूंची. बादशहा व सुलतानांनी देशावर राज्य केले तर या सूफी साधूंनी लोकांच्या मनावर (चमत्कार करून) प्रभाव गाजविला. 'बज्मे सूफिया' चा कर्ता 'अध्यात्मिक फौजेची दक्षिणेवरील चढाई' असे मिशनऱ्यांच्या आक्रमणाप्रमाणेच सूफींचे वर्णन करतो. १०० वर्षांत या फौजेने हिंदूंच्या मंदिरांचा विध्वंस करून वऱ्हाडपासून विजापूरपर्यंत व खानदेशपासून गुलबर्ग्यापर्यंत सर्व महाराष्ट्रभर आपले जाळे विणले. कोकणात व्यापाऱ्यांमार्फत इस्लाम ८ व्या शतकात आला. सर्व सूफी कट्टर मुस्लीम जातीयवादीच होत ! बहामनी कालात त्यांच्या

चाळयांना जोर चढला! या सूफी लोकांचे चाळे मूळातून वाचकांनी वाचावेत. (पृ १८०–१८२)

'महाराष्ट्र धर्माचे प्रवक्ते' हे प्रकरण या ग्रंथात सर्वोत्कृष्ट उतरले आहे. शेणोलीकरांनी बहुधा त्यांचे सारे ज्ञान व कसब या प्रकरणात खर्ची घातले असावे अशा समर्थ शैलीत हे प्रकरण लिहिले आहे की वाचताना डोळयांतून अश्रूच यावेत. पुष्कळ वेळा तर नको हे मराठयांच्या गत इतिहासाचे दुःखद दर्शन अशी भावना होते! इस्लामच्या आक्रमणाने शक १३०० ते शक १५०० या काळात तोलामोलाचा मराठी क्षत्रियच उरला नव्हता, त्याने तलवार टाकून नांगर हाती घेतला होता. वैश्य वर्ग अजिबात नाहीसा झाला होता. दैन्य व दारिद्र्य यांचे जणू महाराष्ट्रात राज्य होते. मुस्लिमातील आपापसातील लढाया चालत. दोन्हीकडच्या हिंदूंचा त्यात फुकट अपमान, जाळपोळ, बाटवा-बाटवी व कत्तल चाले. देशमुख-देशपांडे सामान्य जनतेस लुबाडून बादशहास राजी ठेवीत! राजकीय पारतंत्र्य आणि आर्थिक विपन्नावस्था यांचे दुष्परिणाम धार्मिक व नैतिक अधःपाताच्या रूपात सर्व थरात पसरले असले तर आश्चर्य नाही. धार्मिक छळणूक हेही या अधःपाताचे एक कारण असावे.

पुंड मुस्लिमांसमोर हिंदू नरमाईनेच वागीत. या पारतंत्र्याच्या काळात मराठे स्वाभिमानशून्य व तत्त्वभ्रष्ट बनले. राजकर्ते सर्व बाबतीत श्रेष्ठ आहेत असे वाटू लागले. विजार, चढाव, दाढी, गोषा, पडदा, डोक्यावरचा पदर —सारी मुसलमानी पेहरावाची रीत मराठयांनी उचलली. उर्दूचा स्वीकार केला गेला. पूर्वी लग्नात संबळ, पावा, टिमक ही वाद्ये पुरत. त्यांची जागा ताऊस, ढोल, ताशे, मर्फे यांनी घेतली. अर्जदास्ताची मराठी सुरुवात असे 'अर्जदार अर्जदास्त, बंदगी बदे नवाज अलेकू सलाम। साहेबांचे' सेवेसी ॥' हिंदूंची धर्म-भावनाही शिथिल झाली. हिंदू मुस्लीम पिरांना भजू लागले. दत्तमंदिरात मूर्ती-ऐवजी पादुका पुजल्या जाऊ लागल्या. पूर्वीचे नाथ–महानुभाव–वारकरी पंथ निस्तेज झाले. नामदेव पंजाबात होता. गोरा, चोखा, सावंता केव्हाच कालवश झाले होते. सर्वत्र अराजक माजले होते. अज्ञान, स्वार्थ व भीती यांच्यापोटी सामान्य माणसे क्षुद्र दैवतांच्या किंवा सूफी फकीरांच्या मागे जाऊ लागली होती. नाथांच्या कालापर्यंत, म्हणजे मुस्लीम अमदानीतील २०० वर्षांच्या कालावधीत हिंदू समाजाचे सत्त्वच नाहीसे झाले. अशा परिस्थितीत दत्त-संप्रदायाने हिंदू समाजाचे काही काळ पुनरुज्जीवन केले

## संतांचे सामाजिक कार्य

एकनाथाने ज्ञानेश्वरांची परंपरा पुढे चालविली. रामायणाचा त्यांनी राजकीय अन्वयार्थ लावला. तुकाराम रामदासांनी एकनाथाचा वारसा उचलला. राम-दासांच्या कार्याचे वर्णन करताना शेणो-लीकर–देशपांडयांच्या लेखणीस विलक्षण धार येते. तो भाग प्रत्येकाने वाचला पाहिजे इतका रसाळ व वास्तव उतरला

आहे. ज्ञानेश्वर–तुकारामांचा भागवत-धर्म आणि रामदासांचा महाराष्ट्र धर्म हे परस्परविरोधी नाहीत. रामदास हे अचाट वीर होते यात शंकाच नाही. त्यांच्या वाक्प्रवाहात प्रक्षोभक तेज आहे, त्यांच्यात आक्रमक पवित्रा आहे. या थोर विचारप्रवर्तकाने 'सहिष्णू' हिंदुधर्मास 'जयिष्णू' बनविला व मध्ययुगीन भारतात क्रांती करून सोडली.

या तेजस्वी प्रकरणानंतर हे लेखक-द्वय शिवकाल व पेशवाई यांचा परामर्श घेऊन त्या काळातील सामाजिक परि-स्थितीवर बराच नवा प्रकाश टाकतात. त्याची काही उदाहरणे :

१ : पेशवेकालात विलायती डॉक्टरांचे प्रस्थ हळूहळू वाढत चालले. १७७३ त एक इंग्रज डॉक्टर पेशव्यांच्या दरबारी पगारी नोकर होता.

२ : मद्यपानाबाबत पेशवाईत कडक नियंत्रण होते.

३ : व्यभिचाराबद्दल स्त्री व पुरुष दोघांनाही शिक्षा होत असे.

४ : ब्राह्मण समाजावर अत्यंत कडक बंधने होती.

५ : इंग्रजांकडे चाकरी केल्यास तो गुन्हा समजून अपराध्यास शासन होई.

६ : अनेक विवाह करणे हा नियम होता, अपवाद जवळ जवळ नसतच.

७ : श्रीमंत लोक कसबिणी ठेवीत. ६०–७० रुपयांना बटकी मिळत असे. फ्रेंच, युरोपियनही बटक्या विकत घेत. अडचणीच्या प्रसंगी त्या गहाण ठेवता येत.

८ : ज्योतिषाचे जबरदस्त वेड होते. भूतबाधा, चेटूक वगैरेवर नितांत श्रद्धा असे.

९ : भोजनांची रेलचेल होती. वीस प्रकारच्या कोशिंबीरी असत मग पक्वा-न्नात किती प्रकार असतील ?

१० : ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद पेश-वाईत सुरू झाला हे खरे असले तरी ब्राह्मण-ब्राह्मण वादच पेशवाईत प्रकर्षाने माजले ब्राह्मणांच्या पोटजातीतले वादही डोके वर काढीत.

### इंग्रजांचे फायदे

अव्वल इंग्रजीतील सांस्कृतिक परि-वर्तन हे १३ वे प्रकरण अत्यंत वाचनीय झाले आहे. एल्फिन्स्टनने ब्राह्मणांची मने कशी जिंकली ते पृ. ३२१ वर जरूर वाचावे. इंग्रजांविरुद्ध महाराष्ट्रात बंडे अनेकांनी अनेक वेळा केली, त्यात


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०.

कोल्हापूरचे शहाजी राजेही होते. १८३७ त त्यांच्या मृत्यूनंतर इंग्रजांनी कोल्हापूरच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरवात केली. ब्रिटीश राजवटीचे फायदे हे उपप्रकरण मात्र न पटणारे आहे. इंग्रजांनी पेशवाईला कंटाळलेल्या सामान्य जनतेस शांतता व सुरक्षितता देऊन त्यांचा दिलासा मिळविला हे खरे वाटते. आमच्या शाहीरांनी इंग्रजांच्या केलेल्या स्तुतीचे पोवाडे वाचून (पृ. ३३०) मनाची तगमग होते. म. फुले व रानडे 'इंग्रज येथे आले ही दैवी योजना आहे' असा प्रचार करतात तेव्हा मात्र मनात खटकते. वन्य डोंगरी जमातींनी सुरुवातीस इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले, त्याउलट नागर जनतेने इंग्रजी राजवटीचा उदो उदो केला. इग्रजांनी बंडवाल्या जमातींना ठोकून काढले व नागरी जनतेस ख्रिस्ती पद्धतीचे शिक्षण देऊन खास राजनिष्ठ असा मध्यमवर्ग मुद्दाम तयार केला. या गडबडीत समाजसुधारकांची एक नवीन पिढी निर्माण झाली. मिशनऱ्यांनी इग्रजी सत्तेचा पुरा लाभ उठविला. त्यांच्यामुळे आमच्या बऱ्याच ब्राह्मणांची डोकी बिथरली. हरणई, बाणकोट, पुणे, नगर, नाशिक, जुन्नर, सातारा, शिरूर या ठिकाणी त्यांची प्रचारकेंद्रे होती.

त्यांच्या प्रचारामुळे हिंदुधर्माभिमानी लोकांचा आत्मरक्षणाचा प्रयत्न सुरू झाला. हिंदूधर्म व संस्कृती यांच्या अभिमानावर पोसल्या जाणाऱ्या पुनरुज्जीवन प्रवृत्तीस चांगले खत मिळाले. त्या राष्ट्रवादाचा पहिला हुंकार चिपळूणकरांच्या निबंधमालेत ऐकावयास मिळतो. तो वारसा पुढे केसरीने चालविला. 'आमच्या देशाची स्थिती' हा चिपळूणकरांचा निबंध खूप सांगून जातो. टिळकांनी त्या राष्ट्रवादास वास्तवाची बैठक दिली. १८८० ते १८८५ या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या आधुनिक संस्कृतीच्या विकासाचा पूर्वार्ध (तयारीचा कालखंड) ठरतो. या पूर्वार्धात महाराष्ट्राच्या नवसंस्कृतीची जडणघडण पूर्ण झाली.

जवळजवळ येथे हा ग्रंथ संपतो.

पुढे वसंत बापटांचे उत्कृष्ट महाराष्ट्र काव्य, सूचि व संदर्भ ग्रंथाची यादी आहे. संदर्भ ग्रंथाच्या यादीत 'अर्वाचीन मराठी साहित्य', न. चिं. केळकरांचे 'मराठे व इंग्रज' सारख्या ग्रंथांचा समावेश नाही तेवढंच साऱ्या पुस्तकात खटकते. ◻

**महाराष्ट्र संस्कृती**

घडण आणि विकास
प्रा. ह. श्री. शेणोलीकर
डॉ. प्र. न. देशपांडे
पृ. ४००, मूल्य बावीस रुपये
मोघे प्रकाशन, कोल्हापूर

# केतकर पत्रिका

## एक अभिनंदनीय उपक्रम

नांदेडच्या पीपल्स कॉलेजने १९६६-६७ साली संशोधन विभागाची स्थापना केली व त्या विभागास 'केतकर संशोधन मंदिर' असे नाव दिले. महाविद्यालयास पदव्युत्तर शिक्षणासाठी मान्यता मिळाल्यानंतर ह्या संशोधन विभागातर्फे १९७१ सालापासून दरवर्षी एक शोध निबंधसग्रह प्रसिद्ध होत आहे. १९७१ व १९७२ ह्या दोन वर्षांचे दोन संग्रह केतकर पत्रिका या नावाने आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत आणि १९७३ च्या अंकाची आम्ही उत्सुकतेने वाट पाहत आहोत.

नांदेडला संशोधन मंदिर प्रस्थापित व्हावे व त्या संशोधन मंदिरास डॉ. केतकरांचे नाव देण्यात यावे, ही अतिशय अर्थपूर्ण घटना आहे. डॉ. केतकरांनी केवळ स्वतःच्या इच्छाशक्तीच्या बळावर मराठीमध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानकोशाचे स्वप्न पाहिले व कसलीही तक्रार न करता ते स्वप्न प्रत्यक्षात आणून दाखविले. अशा या महापुरुषाचे निदान या प्रकारे स्मरण तरी ठेवण्याची इच्छा व्हावी, यात केवळ त्या महापुरुषाचा गौरव नसून समाजाच्या कर्तव्यबुद्धीची ज्योत कुठेतरी तेवत असल्याचे ते निदर्शक आहे, असेच म्हणावे लागेल.

ह्या केतकर पत्रिकेचा पहिला अंक दुसऱ्यापेक्षा महत्त्वाचा वाटतो. पहिल्या अंकाच्या वेळी संचालकांची तळमळ उत्कट असावी आणि नंतर ती नेहमीप्रमाण क्षीण झाली असावी, असे अनुमान करण्यास काही हरकत नसावी. पहिल्या अंकातील एखाद्दुसऱ्या लेखाचा अपवाद सोडल्यास सारेच लेख विचारप्रवर्तक आहेत. त्यामध्ये 'राष्ट्रकुट कालीन कंदार येथील कालप्रियनाथ मंदिराचा इतिहास' हा वि. अं. कानोल्यांचा आणि प्रा देशपांडे यांचा Fresh light on king Chandra of Mehruli Pillar inscription यांसारखे निखळ संशोधनात्मक व प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाचा वेध घेणारे लेख आहेत, त्याचप्रमाणे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या १८५५ साली प्रसिद्ध झालेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा' ह्या ग्रंथाच्या अवलोकनाने 'अर्थशास्त्र' हा शब्द चिपळूणकरांनी कुठून आणि कसा घेतला असावा, या संबंधीचा प्रा. दि. के. बेडेकरांचा उद्बोधक मागोवाही आहे. अशाच प्रकारे डॉ. घारे यांनी उलगडलेला मराठकालीन राजकीय रीतिरिवाजांचा व वकिलांच्या कामगिरीचा देखावाही उद्बोधक आहे. वैचारिक दृष्टीने अत्यंत अर्थवाही अशा प्रकारचा डॉ. बारलिंगे यांचा 'सर्वोदय ट्रुथ अँड नॉनव्हायोलन्स' हा लेख तर त्यांच्या सूक्ष्म विश्लेषणशक्तीचा उत्तम नमुना आहे. प्रा. कुरुंदकर प्रा. अधिकारी व प्रा. गाडगीळ यांच्या लेखांचे वैचारिक स्वरुप आकर्षक आहे. यातील कुरुंदकरांचे विवेचन त्यांच्या नेहमीच्या विवेचनाप्रमाणे वेधक आहे तर गाडगी-

ळांचे मुख्यत: संकलनात्मक आहे. प्रा. अधिकारी यांनी प्रा. दयाकृष्णांच्या सामाजिक परिवर्तनाच्या सिद्धांताचा परामर्श घेतला आहे. दयाकृष्णांच्या सिद्धांताचे स्वरुप व त्यावरील आक्षेप असेच त्याचे स्वरूप आहे, त्यामुळे आजकालच्या सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात दयाकृष्णांचा ग्रंथ व त्यावरील आक्षेप यांनी पुरेसा प्रकाश टाकला आहे, असे वाटत नाही. खुशवंतसिंगांच्या इंग्रजी कादंबऱ्यातील शब्दशैली व भाषाशैली या बाबतीत इंग्रजीत लिहिलेल्या प्रा. शहाणे यांच्या लेखाचे स्वरूप तर फारच मर्यादित आहे. खुशवंतसिंगाच्या एखाद् दुसऱ्या कादंबरीतील उदाहरणे देऊन भारतीयांच्या इंग्रजी लेखनाबद्दल जे सांगितले गेले आहे, त्याचे पुरेपूर प्रत्यंतर येण्यासाठी या विषयाचा सर्वांगीण विचार या लेखात केला गेला नाही. प्राध्यापकांच्या शिकविण्याच्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या शोधनिबंधाचे स्वरूप यातील बऱ्याच लेखांना आहे. आणि केतकरांच्या नावाने निघणाऱ्या पत्रिकेची ही मर्यादा राहू नये असे नम्रपणे सुचवावेसे वाटते. केवळ स्फुट व वैचारिक लेखनापेक्षा फार मोठ्या सामर्थ्याच्या संशोधनात्मक लेखनाकडे या संशोधन मंदिराने झेप घेणं अवश्य आहे.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे केतकर पत्रिकेचा १९७२ च्या दुसरा अंक पहिल्याच्या मानाने क्षीण आहे या दुसऱ्या अंकातील लेखांचे स्वरूप पहिल्या अंकाप्रमाणे संमिश्र आहे. काही प्राचीन विषयावरील संशोधनात्मक लेखन, काही संकलनात्मक संशोधन, काही वैचारिक स्वरूपाचे तर काही शिकविण्याच्या निमित्ताने सुचलेले विमर्शात्मक स्वरूपाचे. यामध्ये डॉ. केतकरांच्या वेदविद्याविषयक संशोधनाचे चि. ग. काशीकर यांचे संक्षेपाने केलेले विवेचन, धर्मापुरी शिलालेखकाचे प्रा. देशपांडे यांचे विश्लेषण, 'भोगवर्धन' या स्थळाचा प्रा. ढवळीकरांनी घेतलेला शोध हे संशोधनात्मक लेख त्रोटक, छोट्या पल्ल्याचे आहेत. इतर लेखांमध्ये श्री. देवीसिंग चौहानांनी 'जानको सैंवर'ची केलेली भाषिक पाहणी महत्त्वाची वाटते. मराठी व हिंदी 'कृष्णार्जुन युद्ध'ची या कृतींचे तुलनात्मक विवेचन (जोशी), वुदरिंग हाईटस् या विश्वविख्यात कादंबरीची अलोचना (सौ. शिरवाडकर), मराठी भाषिक व इंग्रजी उच्चार (यार्दी), अस्तित्ववाद (डॉ. गोळे) इ. लेख हे अभ्यासपूर्ण आहेत, परंतु त्यांचे स्वरूप संशोधनात्मक नाही. तसेच ह्या अंकातील बहुसंख्य लेखन बाहेरून हस्तगत करण्यात आल्याचेही लक्षात येते. छपाई शोधनिबंधाच्या बाण्यास साजेशी अशी निर्दोष नाही. असे का व्हावे ?

केतकर संशोधन मंदिराने जिद्दीने या कामी वाहून घ्यावे व इर्षेने अधिक उज्वल असे संशोधनात्मक कार्य करून दाखवावे. लेखांचे स्फुट स्वरूप न ठेविता केवळ श्रेष्ठ दर्जाच्या शोध निबंधांनाच स्थान मिळेल अशी दक्षता घ्यावी, अशी एक कळकळीची सूचना. अर्थातच त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी लेखाण्याच्या

पृष्ठ ४६ वर

‘ नाट्यमंदार ’चे नवे रौप्यमहोत्सवी नाटक

# चांदणे शिंपीत जा !

पुष्पा भावे

‘तरुण तुर्क ’च्या पाठोपाठ नाट्यमंदारने मधुसूदन कालेलकरांचे ‘ चांदणे शिंपीत जा ’ हे नाटक रंगभूमीवर आणले व अल्पावधीत त्याचा रौप्यमहोत्सवही झाला. योगायोगाने हे नाटक पाहायचे राहून गेले होते. परवा ते पाहायला जाताना फार उत्सुकता नव्हती; कारण मधुसूदन कालेलकर, बाळ कोल्हटकर, हिराकांत कलगुटकर अशा नाटककारांच्या नाट्यरचनेचा स्वभाव आणि मर्यादा आपल्याला इतक्या परिचित असतात की नवे नाटक पाहायला जाताना एरवी वाटणारा उत्साह या नाटककारांच्या नाटकाच्या प्रयोगाला जाताना वाटत नाही तरी मनात अंधुक आशा होती की मधुकर तोरडमलांची निवड आणि दिग्दर्शन असणारे कालेलकरांचे ‘ चांदणे शिंपीत जा ’ हे नाटक वेगळे असेल. पण प्रत्यक्ष नाटक पाहताना मात्र बाळ कोल्हटकरी नाटकाचाच एक श्रीमत अवतार पाहात अहोत असे वाटत होते. १९७३ साली रंगमंचावर आलेल्या या नाटकातील पात्रांच्या प्रयोजनाचा विचार करू लागले की अत्रे काळातील नाट्यरचनेच्या कल्पना स्मरतात.

‘ चांदणे शिंपीत जा ’ या नाटकाच्या केंद्रस्थानी दिनानाथ लाड हा कर्तबगार, स्वयंकेंद्रित मनुष्य आहे. नाटकाची कथा म्हणजे दिनानाथ लाड या कुटुंबप्रमुखातील आणि त्याच्या कुटुंबातील दुरावा नष्ट होऊन मायेचे धागे कसे निर्माण होतात त्याची कथा आहे. कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीची कथा या नाटकात सांगितली आहे. अत्रे-रांगणेकर युगातील नाटकाप्रमाणे पहिल्या अंकात घरातील नोकर पूर्वकथन करतो, अंक जरा पुढे सरकला की लाडांचा जिवलग मित्र व सौ. लाड यांच्या संभाषणातून पूर्वकथानकाचे आणखी धागे जुळवले जातात. नाटकातल्या घटना अतिरंजित आहेत. एस. एस्. सी. च्या निकालाच्या आदल्या रात्री वडिलांनी मुलोला — “ नापास झालास तर गय करणार नाही ” असे म्हणणे, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात आपला नंबर नाही असे

पाहून तिने आत्महत्या करणे—नंतर बोर्डाने ती चूक कळविणे—या साऱ्याच घटनांचा क्रम कृत्रिम वाटतो. त्याहूनही कृत्रिम तिसऱ्या अंकातील लाडकन्यकेच्या प्रियकराच्या मृत्यूची व नंतर 'सुटके'ची बातमी! प्रत्येक पात्राच्या दुःखाविषयी प्रेक्षकांच्या मनात सहानुभूती निर्माण करून त्यावर नाटक चालविणे याला रसनिष्पत्ती म्हणत नाहीत. असो.

या नाटकाचा प्रयोग ठीक होतो. बाबूराव सडवेलकरांच्या कलेला वाव मिळेल अशा नेपथ्याची मागणीच हे नाटक करीत नाही. तरी लाडांच्या घराच्या भिंती मार्बलसारख्या भासविण्याचा यत्न व 'Stainglass' चा कोपरा परिणामकारक वाटला. नाटकातील प्रमुख भूमिका (लाडांची) मधुकर तोरडमल यांनी त्यांच्या नेहमीच्या सफाईने केली असली तरी मूळ लेखनातच ती कच्ची असल्यामुळे तोरडमलांना त्यात फारसा वाव नाही. तोरडमलांनी काळजी घेतली नाही तर 'हुकुमशहा' छापाची भूमिका त्यांना चिकटून बसेल. सुमन धर्माधिकारी (सौ. लाड) दिनानाथ टाकळकर (अंकल) यांनी आपल्या भूमिका समरसून केल्या. प्रमिलची भूमिका करणारी उज्वला केणी अत्यंत समजुतीने रंगमंचावर वावरली. मनावर दडपण असणारी अल्पवयस्क मुलगी तिने फारच सूक्ष्मपणे सादर केली. तिचा चेहरा संवेदनाक्षम आहे—रंगमंचावर येणाऱ्या नव्या चेहऱ्यापेक्षा वेगळा आहे. शीला वाळावलकर या गुणी नटीचा 'उदय कला-केंद्रा'च्या, 'का—असंच का' मधील अभिनय आठवत असल्यामुळे तिला घरातील वडील मुलीची सामान्य भूमिका मिळालेली पाहून विरस झाला. स्नेहलदत्त यांची उंची साधारण मराठी नटांपेक्षा जास्त आहे तरीही ते फार डौलाने, सहजतेने रंगमंचावर वावरतात. एखाद्या चांगल्या सुखात्मिकेत अभिनय करण्याची संधी मिळाली तर या नटाच्या गुणांचे चीज होईल.

नव्या नावाने त्याच त्याच प्रकारची नाटके रंगभूमीवर येतात आणि त्यांचे रौप्य, सुवर्ण महोत्सवही होतात. व्यावसायिक रंगमंचावरील नटांच्या दृष्टिकोनातून ही चांगली गोष्ट असली तरी मराठी रंगभूमीच्या आणि मराठी प्रेक्षकांच्या दृष्टिकोनातून मुळीच हितावह नाही. जे मधुकर तोडरमल प्रायोगिक रंगभूमीवरून व्यावसायिक रंगभूमीवर आले तेही व्यावसायिक रंगमंचाचेच झाले ही घटना निश्चित दुःखद आहे. ●

# २१ मार्च १९७३

काल (२१ मार्च १९७३) बातमी ऐकली, विश्वास बसेना. शंकर घाणेकर...छे...शक्य नाही. बातमी ऐकली तीही घाणेकरांच्या गाववाल्याकडे. 'शंकर गेला...गावातला कर्ता पुरुष गेला.' ही प्रतिक्रिया खास गाव-

वाल्याची. 'काय गाववाले' ही हाकही खास शंकर घाणेकरांची. माझी-त्यांची ओळख सासरच्या संबंधामुळे झालेली... नंतर मात्र साहित्य संघाच्या आवारात नाटकांना, व्याख्यानांना आम्ही सतत भेटत राहिलो. दरवेळी भेटले की घाणेकर आम्हाला तंबी द्यायचे, 'लेको सगळे साहेब झालात. आता सगळ्यांना एकदा शिंदेसरकारच्या (राजाराम शिंदे) गाडीत कोंबून गावी (पिरंदवणे) घेऊन जातो. 'पु. ल.'ला माझं गाव दाखवायचंय. तुमची कसली घरं — माझं घर येऊन बघा गावाला.' पिरंदवणे या छोटयाशा गावाविषयी ताठ मानेने बोलणारा हा माणूस खरोखरच त्या गावावर आणि गावकऱ्यांवर माया करीत होता. कोणतेही पैठणी पवित्रे न आणता सहजपणे मदत करीत होता.

मला आठवते, एकदा संघात मी 'आयेनेस्को'वर बोलत होते. बोलता बोलता माझं कोपऱ्यात लक्ष गेले : शंकर घाणेकर तेथे हसत उभे होते. क्षणभर आश्चर्य वाटले. व्याख्यानानंतर त्यांना म्हटले, 'तुम्ही इकडे कुठे?' 'म्हणजे काय, खाली बोर्ड वाचला — आलो. आता सगळया गाववाल्यांना सांगतो ना, सून कशी बोलते खणखणीत.' नंतर त्यांच्या नेहमीच्या लकबीने फिस्सकन हसून म्हणाले, 'अहो, आम्हाला कुठे इंग्रजी वाचता येतंय, आता तुमचे ऐकून ठेवले. कुणालातरी आडवता यईल पटकन्.' किंबहुना घाणेकर कोणत्याही व्याख्यानाला, चर्चेला, कोणत्याही प्रकारच्या नाटकाला भेटत असत. कोणत्याही नव्या विषयातले कळण्याइतकी बुद्धी तल्लख होती — तिच्यावर शिक्षणाचे (कु)संस्कार झाले नव्हते इतकेच.

शंकर घाणेकरांना जवळ जवळ गेली पधरा वर्षे वेगळयावेगळया भूमिकात मी पाहिले आहे. आज आठवते ती 'दुरितांचे तिमिर जावो' या नाटकातील बाबराव गुरवाची भूमिका. त्या भूमिकेला खास व्यक्तिमत्व होते. एरवी विनोदी नटाच्या वाटयाला 'विनोदी' असा शिक्का मारलेल्या रंगहीन भूमिका येतात तशाच घाणेकरांच्या वाटयाला येत असत. पण घाणेकरांची लवलवाणी, वाक्याच्या तोलाची जाणीव, कुठे स्तब्धता अर्थपूर्ण करावी याचे भान, यामुळे ते कोणतीही भूमिका रंगवत; भरपूर हशे घेत असत. 'कटयार काळजात घुसली', 'घनश्याम नयनी आला' या नाटकामध्ये गायनाच्या लकबींचा वापर करून ते विनोद निर्माण करीत असत. कुठल्याही नटसंचात चपखल बसेल अशी शरीरयष्टी, अचाट स्मरणशक्ती आणि प्रसंगावधान यामुळे नाटयसंस्थांना ते हवेसे वाटत. परंतु त्यांच्या अभिनयाला काही वाव मिळेल अशी भूमिका त्यांना मिळाली नाही. 'आमचं नाव बाबूराव'मध्ये प्रमुख भूमिका मिळाली; परंतु ते नाटक फारसे चालले नाही. अर्थात घाणेकरही अभिनय उभा करताना नाटयकृतीशी समरस झाले नाहीत. आपण रंगमंचावर असताना प्रेक्षकांनी हसत राहिले पाहिजे हा त्यांचा अहंकार त्यांना भूमिकेत

प्रवेश करू देत नसे. ते सतत घाणेकरच असत आणि मनोरंजनकार (entertainer) ही त्यांची एकच भूमिका असे. त्यांच्या चाणाक्ष बुद्धीला हे उमजले असावे. कारण गेल्या दोन-चार वर्षांत ते पुन्हा पुन्हा एकपात्री कार्यक्रम करण्याविषयी बोलत. गडकऱ्यांच्या 'बाळकराम 'ची रंगावृत्ती कोणी करून दिली तर मी एकपात्री करीन म्हणतो, असे सारखे सांगत. मला वाटते 'पु. ल.' शी याविषयी ते बोललेही होते. पण राहूनच गेले!

मला शकर घाणेकरांविषयी आस्था, जवळीक वाटायची ती नट म्हणून नाही; एक नाटकवेडा प्रसन्न माणूस म्हणून. मराठी रंगभूमीचा प्रवास इतका जवळून पाहिलेला चाणाक्ष माणूस आत्मचरित्र लिहील तर रंगभूमीचा इतिहासच जतन केला जाईल असे वाटायचे. न राहवून मी एकदा त्यांना म्हटलेही, 'घाणेकर, 'माणूस 'साठी आत्मचरित्र सांगता का? लिहून घ्यायची व्यवस्था करू या.' मान उडवून ते मनःपूर्वक हसले. म्हणाले, 'तुम्हाला या धंद्यातल्या लोकांची खरी ओळख नाही. या धंद्यात असताना खरं लिहिणे शक्यच नाही. पाहू नंतर कधीतरी.' आता ते सगळेच राहून गेले. रंगभूमीवरचे विनोदी किस्से ते व्याख्यानात नेहमी सांगत असत; परंतु त्यांच्याजवळची रंगभूमीविषयीची, जुन्या नटांविषयीची सारी माहिती आता नाहिशी झाली. घाणेकरांच्या वाक्याच्या फेकीचा सूर, मान झटकण्याची लकब अजून मनात आहे. आणि तरी यानंतर नाटकाला गेल्यावर घाणेकर दिसणार नाहीत, भेटणार नाहीत हे मनाला पटवायचे आहे.

काल बातमी ऐकली... आणि सपकन् आठवले: घाणेकर म्हणाले होते, 'बाई एक इच्छा आहे, कधीतरी हाती पैसे असले, की 'एक शून्य बाजीराव' व्यावसायिक रंगमंचावर आणायचे आणि त्यातली प्रमुख भूमिका स्वतः करायची.' घाणेकर, परवा तुम्ही खरंच रंगमंचावर विनोदी भूमिका करता करता...त्या खानोलकरांच्या 'बाज्या'-सारखे आणि तेही तुमच्या गावीच...!

एका नाटकवेडयाच्या वेडाला प्रणाम!

● ● ●

---

## पुस्तके : पृष्ठ ४२ वरून

हेतूने ही सूचना केली नसून त्यांनी कोणते आव्हान स्वीकारावे, यासंबंधीची अभ्यासकांची जाणीव व्यक्त करण्याच्या हेतूनेच ती केली आहे, हे त्यांनी कृपया लक्षात घ्यावे. एरवी, नांदेडसारख्या ठिकाणी हे काम सुरू झाले आहे, याला फार महत्त्व आहे. सर्व तऱ्हेची अनुकूलता असता असे काही विचारही कोणाच्याच डोक्यात येत नाहीत. केतकरांसारख्या संशोधकांचे महत्त्व या निमित्ताने उजळून निघते, हा या कार्यामागचा खरा अर्थ! —अभ्यासक

**केतकर पत्रिका : केतकर संशोधन मंदिर, नांदेड**



# मीनाकुमारी

अरुणा अंतरकर

लौकिकार्थी ३१ मार्च १९७२ ला मीनाकुमारी निधन पावली. पण खरे म्हणजे यापूर्वीच कधीतरी मृत्यूने तिला गाठले होते. मला ते कधी जाणवले सांगते. मुंबईच्या त्या ट्रिमधे अचानक 'सात फेरे' ही मोठी अक्षरे डोळ्यांसमोर चमकली. मीनाकुमारीचा नवा चित्रपट म्हणून मी अतिशय उत्सुकतेने नजर तिकडे वळवली. प्रत्यक्षात पोस्टरवरचा प्रकार पाहिला, आणि निमिषार्धात ट्रिपची सारी चव कडवट झाली डोळे जे काही समोर पहात होते त्यावर विश्वास ठेवायला मन तयार होत नव्हते. त्या पोस्टरमध्ये माझ्या हयातीत बघितली नव्हती अशी मीनाकुमारी नजरेला पडत होती. आठवण झाली की अजून इगळचा डसल्यासारखे वाटते. त्या-त्या पोस्टरमधे तिची पाठ बहुतांश उघडी दाखवण्यात आली होती.

खरे म्हणजे 'दो राहा' पोस्टर्सचा जमाना यापूर्वीच सुरू झाला होता. नटयांची याहून भयंकर पोस्टर्स नजरेने पचवली होती. पण मीनाकुमारी...छे! ती ऐन पणात होती, तारुण्याची झळाळी तिच्या अंगावर होती, तेव्हा हे घडले असते तर समजण्यासारखे होते. पण चाळिशीच्या घरात पोचलेल्या, विकलांग झालेल्या मीनाकुमारीच्या वाट्याला ही इतकी क्रूर विटंबना यावी? भर दुपारच्या उन्हात, अंगावर आधणाचे पाणी पडावे तशी माझी अवस्था झाली. 'सात फेरे कसले, मीनाकुमारीच्या नि तिच्या चहात्यांच्या दुर्दैवाचे दशावतार होते ते!'

'हे असले काही पहाण्यापेक्षा मीनाकुमारी पडद्यावर अजिबात दिसली नाही तरी चालेल!' प्रक्षोभाच्या त्या क्षणी एक विचार मनात सणकून गेला. आणि झाले असेच. आणखी दोन तीन वर्षांनीच मीनाकुमारी कायमची पडद्याआड गेली तिच्या सन्मानाची परमेश्वराला माझ्यापेक्षा अधिक चिंता असावी. दुःखात सुख एवढच की 'सात फेरे' पडद्यावर आलाच नाही

बाकी मीनाकुमारीच्या आयुष्यातल्या त्या साऱ्या कालखंडावर 'सात फेरे'च्या अष्टग्रहीचा शिक्का होता. कुठेतरी वाचनात आले, 'मीराबाई'च्या भूमिकेसाठी तिला 'ट्रिक सीन फेम' बाबूभाई मिस्त्री दिग्दर्शन होणार होते. बिमल रॉय, गुरु दत्त, हृषिकेश; दिलीपकुमार, अशोककुमार, राजकुमार यांची नायिका स्टंटपट पौराणिकपटांच्या दिग्दर्शकाकडे काम करणार? परमेश्वरा! माझे मन व्याकुळ झाले 'लक्ष्मी नारायण' नि 'अल्लादिन'पासून सुरुवात करून छोटी बहूच्या प्रासादात शिरलेली मीनाकुमारी आता जिथून सुरुवात झाली तिथंच पोचणार की काय?

पण याही वेळी माझ्या इच्छाशक्तीने बाबूभाईंच्या ट्रिक फोटोग्राफिक चमत्कारांनी हरवले. 'मीराबाई' कशी कोण जाणे (सूज्ञपणे) अर्ध्या वाटेवरूनच चित्रसृष्टीची वाट सोडून माघारी परतली.

चाललेय् हे काही खरे नव्हे, याची मीनाकुमारीला जाणीव नव्हे, बोच

होती तीही आतून झुरत होती. 'पाकीजा'त एका ठिकाणी तिच्याबद्दल म्हटलंय् ना की, 'गममें रोती भी नहीं और चुपके-चुपके मरती जा रही है,' त्या शोकसफरीची सुरुवात तेव्हापासूनच झाली होती. या काळात मीनाकुमारीचे पडद्यामागचे एखादे छायाचित्र बघणे हा अक्षरश: Shattering experience होता. एकेकाळी, वाऱ्याच्या मंद झुळकेनिशी पाण्यावर तरंग उठावेत तशी भावनांची कारंजी उसळवणारी तिची नजर अक्षरश: ताठरलेली दिसायची. चेहऱ्यावरून हास्यरेषा पार लुप्त झाली होती. तशी मीनाकुमारी पडद्यावर हसताना फार क्वचितच दिसली हे खरे. पण जेव्हा केव्हा ती हसायची ते मनापासून. अगदी फार फार मनापासून. तिचे अश्रू जसे आतून आल्यासारखे वाटत, तसे तिचे मंद स्मितदेखील हृदयातून उमलल्यासारखे वाटायचे.

पण आजकाल हे जे नजरेला पडत होते ते काही वेगळेच! ही मीनाकुमारी ओळखच द्यायला तयार नसल्यासारखी वाटायची.

हल्ली तिच्याबद्दल बातम्या वाचायला मिळायच्या त्याही सतत तिच्या आजाराच्या; नव्या करारांच्या नव्हे. या सगळ्या पार्श्वभूमीवर तिचे मरण अगदी सहज पचवता येईल, मला वाटायचे. कशी कोण जाणे, पण तिच्या मृत्यूची चाहूल मला लागली होती. एक ना एक दिवस लवकरच ही बातमी ऐकावी लागेल, याची मनाने तयारी केली होती.

पण झाले उलटेच! ज्या प्रकारे तिच्या मृत्यूची बातमी कानावर आली तो क्षण मनावर एक ठुसठुसणारा शरमेचा घाव मागे ठेवून गेला. ३१ मार्चच्या त्या शुक्रवारी पुण्यात एका बड्या चित्रपटाचे 'प्रीमियर' होते. त्याच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दिग्दर्शकांची मुलाखत घेण्याची जबाबदारी संपादकांनी माझ्यावर सोपवली होती. या निमित्ताने दोन-तीन गोष्टी नजरेला पडणार होत्या – एक : तो बडा दिग्दर्शक; दोन : ज्याच्याबद्दल बरंच बोलले जाते तो 'प्रीमियर'चा भपकेबाज सोहळा; आणि तीन म्हणजे 'ब्लू डायमंड' हे पंचतारांकित अलिशान हॉटेल. खोटे कशाला सांगू? ज्या गोष्टींचा कधी दुरूनही विचार केला नव्हता, त्या साऱ्या एकदम हातात हात घालून समोर ठाकल्या आणि मला मोह आवरला नाही. नाही म्हटले तरी मित्रमैत्रिणीत फुशारकी मारण्यासारखे काहीतरी हाती आले होते. सगळे साधल्याच्या आनंदात 'ब्लू डायमंड'-वरचे ते आळणी जेवणही गोड लागत होते. आणि आईस्क्रीमचा शेवटचा चमचा जिभेवर ठेवत असताना कुणीतरी एकदम विस्फोट केला, 'अरे तुम्हा मंडळींना आजची न्यूज कळली की नाही? आज मीनाकुमारी गेली.'

त्याच्या दृष्टीने उद्याच्या पहिल्या पानाची चिंता मिटली होती!

'मीनाकुमारी गेली म्हणजे मरण पावली' हे समजायला माझ्या मेंदूने मात्र बराच वेळ घेतला. छे:!

आईस्क्रीमचा शीतल स्वाद एवढा दाहक कधी वाटला नसेल. ते आजच कां घडायला हवे होते? ही बातमी लवकरच कानी यायची होती खरी. पण अजून वर्ष-सहा महिने तरी ती कानी पडणार नाही, असे वाटत होते.

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून सविस्तर वृतांत वाचला तेव्हा ओशाळलेल्या माझ्या मनाने एवढीच नोंद घेतली, की ज्यावेळी मीनाकुमारीने शेवटचा श्वास सोडला होता, तेव्हा मी ऑफिसात संध्याकाळच्या प्रीमियरची स्वप्ने पहात होते. मिटल्या डोळ्यांनी ती आपल्या घरी पोचली होती तेव्हा मी चित्रपट बघण्यात रंगून गेले होते. माझगाव कबरस्तानाच्या मातीआड तिने आपला चेहरा कायमचा लपवला तेव्हा – तेव्हा मी आईस्क्रीमची प्लेट उडवीत होते!

खरे म्हणजे जिच्याबद्दल इतकी आत्मीयता वाटत आली, तिची-माझी ओळख, गाठभेट – सारे काही सिनेमाच्या पडद्यापुरते मर्यादित होते. पण इतकी दूर असूनही ती फार फार जवळची वाटायची खरी. एखाद्या जिवलग मैत्रिणी सारखी वाटायची ती. हिचा एखादा चित्रपट पडला तर मलाच दुःख व्हावे. हिला एखादा नवा चित्रपट मिळाला की माझेच भले झाल्याचा आनंद मला होई. हिच्या हातून कधी 'फिलमफेअर' ॲवॉर्ड निसटले का मलाच चुटपूट लागून राही. तसे कठिण प्रसंगही माझ्यावर या बाईने काही थोडे आणले नाहीत. 'साहेब, बीबी और गुलाम'च्या वेळी मुश्किलीने तिकिटे मिळवली तर मुसळधार पावसाने गाठले, आणि अखेर आनखशिखान्त भिजलेल्या, कुडकुडत्या अवस्थेत तो पहावा लागला, यावर ताण म्हणजे त्या चित्रपटात पहिला अख्खा तास ही पडद्याआडच घालवते! 'दिल एक मंदिर'ला एकदा सगळ्याजणी जायला निघालो, तर आमच्या एक मैत्रीणबाई सगळ्यांची तिकिटेच घरी विसरून आल्या होत्या. अर्ध्या वाटेवरून परत जाताना त्या बापडीने आयुष्यभरातली निम्मी बोलणी त्या एका क्षणी खाल्ली होती.

अकरावीत असताना, आठवतंय्, शाळेशेजारच्या थिएटरमधे हिचा 'तमाशा' नावाचा बोलपट लागला होता. 'मीनाकुमारी असल्या पिक्चरमध्ये? हॅट्! आपण नाही बघणार!' म्हणून मोडता घालणाऱ्या एका मैत्रिणीची आर्जवं करीत तास बुडवून थिएटरकडे निघालो. तर दारात आमचे हेडमास्तर (त्यातही गणिताचे सर म्हणजे कल्पना करा!) वाट अडवून उभे! सगळा मुत्सद्दीपणा पणाला लावून तो भिकार चित्रपटदेखील तिचा म्हणून गोड मानत पाहिला. आज भिकार म्हणत्येय्; त्या भाबड्या वयात मीनाकुमारीचा म्हणून तो चित्रपटही चांगला असल्याबद्दल सोसासोसानं वाद घातल्याचं आठवतंय्.

मीनाकुमारी जर तुमच्या आठव्या-दहाव्या वर्षी तुमच्या आयुष्यात शिरली असेल, तर पुढे आयुष्यभर ह्या बाईला मनातून काढून टाकणे अशक्य होते. बाकीच्या नट्यांच्यात आणि मीना-

कुमारीत हा मोठाच फरक होता. मीनाकुमारीची आणि प्रेक्षकांची ओळख चटकन् पटायची. हिचे रूप, हिचे वागणे-बोलणे चारचौघांसारखे वाटायचे आणि तरीही वेगळे वाटायचे. 'She never acts; ती आपल्या भूमिकांशी आणि प्रेक्षक तिच्याशी—पटकन् समरस होऊन जायचे. 'जिंदगी और ख्वाब'मध्ये तिची सावत्र आई कशावरून तरी तिला एखाद्या मारकुट्या मास्तरणीच्या आवेशात झोडपते. आमच्या नुसत्या मुठीच वळत्या होत्या ते पहाताना; समोरच्या रांगांतून त्या आईला 'हडळ... चेटकिणी'—काय काय आहेर मिळाले होते विचारू नका.

'यहुदी'मध्ये राजकन्येच्या दिमाखदार पोशाखात ती सामोरी आली. जेमतेम पंचविशीची असेल ती तेव्हा. उत्फुल्ल लावण्याचा तो मनोरम आविष्कार पडद्यावर दिसला, आणि 'अरेबियन नाइट्स्'च्या पानामधून परी उतरून आल्यासारखे वाटले. एक सरदार तिचा अपमान करतो. त्यासरशी दिलीप कुमार त्यांच्याशी द्वंद्वयुद्ध खेळायला सज्ज होतो. दिलीपची उत्स्फूर्त तलवारबाजी ती! त्या क्षणी मनात येते, हिच्यासाठी कुणीही जीव असा पणाला लावील!

'कोहिनूर'मधे तिला 'चंद्रमुखी' हे अगदी सार्थ नाव मिळाले होते. तिच्या लाजऱ्या लावण्याचे रक्षण करायला जणू दोन्हीकडून केसांच्या महिरपी सज्ज असतात. हे नुसतं तसबिरीत पाहूनच नटसम्राट आपल्या मुलायम आवाजात एकच वाक्य बोलून गेला, 'आज होली खेलनेको जी करता है!'—एकदम पटलं!

सौंदर्य आणि अभिनयगुण—दोन्ही एकत्र नांदताना हिंदी चित्रसृष्टीने क्वचित पाहिले. या मोजक्या अपवादात मीनाकुमारी सामील झाली. तसा लांबसडक, महिरपदार केशकलाप सोडला तर मीनाकुमारीजवळ खास सौंदर्यविशेष नव्हते. तिच्या डोळ्यांतली जादूही त्यांच्या संवादशक्तीत होती; विशाल आकारात वगैरे नव्हती. '३६–२४–३६'च्या जमान्यात तर मीनाकुमारी कुठेच उभे राहू शकली नसती. 'ग्लॅमरच्या दुनियेत तुमचे मोल काय?' असा एक कुत्सित प्रश्न एकदा तिला विचारण्यात आला होता. मीनाकुमारीनं प्रामाणिकपणे उत्तर दिले, 'शून्य!' तिचे देखणेपण सामावले होते तिच्या चेहऱ्यावरच्या गोडव्यात, लाघवात आणि हालचालींमधल्या एकंदर मार्दवात. नर्तकी म्हणून ती कधीच शोभली नाही खरी. ('पाकीजा' ते सप्रमाण सांगतोच म्हणा!) पण भल्याभल्या नर्तकींजवळ नाही असा डौल तिच्या चालीत होता. उच्छृंखलता वा उन्मादकपणाचा लवलेशही तिच्या चालीत नव्हता. आपल्या संथ चालीने एखादा मखमली रुजामा हळुवारपणे उलगडत ती चालते आहे असे वाटायचे. 'प्यारका सागर', 'दिल एक मंदिर', 'दिल अपना प्रीत परायी'—कितीतरी चित्रांनी एकएक सबंध शॉट त्यासाठी खर्च घातली आहे.

मीनाकुमारीच्या सौंदर्याची जात देह-वैशिष्टयांपेक्षा व्यक्तिमत्व संपन्नतेकडे झुकली होती. म्हणून की काय, कोणत्याही भूमिकेत, कोणत्याही वेशभूषेत ती पसंत पडायची. सामाजिक चित्रपटातला साध्यासुध्या पांढऱ्या वेशभूषेतही ती उठून दिसायची, आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या चित्रपटातले दिमाखदार पोशाखही तिच्या रूपाची झळाळी वाढवायचे.

पडद्यावर आणि पडद्याबाहेरही मीनाकुमारी कधी नटीसारखी दिसली नाही; नटीसारखी वागली व बोलली नाही. तिच्याबाबत कोणतीही गोष्ट कधी कृत्रिम वाटली नाही; बनावट भासली नाही. मग ते अश्रू असोत की आणखी काही. अर्थात मीनाकुमारीसारखे साधे दिसायला बराच खर्च येत असणार हे उघडे आहे. पण ' Art lies in concealing art ' ह्या तत्त्वाचे मेकअप् नि अभिनय या दोन्ही बाबतीत काटेकोर पालन करण्यात ती यशस्वी झाली खरी.

' इलस्ट्रेटेड वीकली 'चे संपादक खुशवंतसिंग यांच्याबाबत घडलेला हा मजेदार प्रसंग. ' खय्याम म्युझिक नाइट 'ला आपल्या शेजारी बसलेली स्त्री म्हणजे मीनाकुमारी याचा खुशवंतला पत्ताच नव्हता. बोलता-बोलता सहजच त्यांनी तिला विचारले, ' तू सिनेमात का जात नाहीस ? तुझा चेहरा फोटोजेनिक आहे. '

मीनाकुमारीच्या प्रेमात पडायला स्त्री-पुरुष वा वय असल्या क्षुल्लक भेदांचा अडसर नव्हता. स्त्रीत्व ही तिच्यातली सर्वात विलोभनीय गोष्ट होती. ' मीनाकुमारी म्हणजे एक साक्षात् कविता होती ' असं विधान गुलजारसारख्या कवीला करावेसे वाटते यात नवल नाही ' स्त्रीत्व हा तिच्या अवघ्या व्यक्तिमत्वाचा परवल होता. काकणभरल्या हातांनी तुमच्यासाठी तिने चहा बनवावा या सारखी मोहक गोष्ट नव्हती. ' वी. के. करंजियांनी केलेलं हे एक रसिक निरीक्षण त्यावर आणखी भाष्याची काहीही गरज नाही. मीनाकुमारीचा सगळाच साजशृंगार साधा, तरीही निराळा होता. त्यात ती तनमनाने रंगून जायची. ' पिया ऐसो जियामें समाय गयो रे ' या ' साहेब बीबी ' मधल्या इथे गीताची एकदम आठवण होते. पतीची वाट बघत, साजशृंगार करणारी छोटी बहू डोळयांत साठवून ठेवावीशी वाटते. काजळ घालताना तिच्या डोळयांच्या पाखरांची मोहक हालचाल होते; कानावर ती सुपरिचित बट ओढताना बोटे कशी रांगोळी घातल्यासारखी रेखीव हालचाल करतात. मला स्वतःला साजशृंगार पूर्ण केलेल्या छोटी बहुपेक्षा तिची ही तयारीच अधिक गोड वाटली. साधी गुडघे मोडून खाली बसण्याची गोष्ट घ्या. मीनाकुमारी कधी फतकल मारून बसलेली तुम्हाला कोणत्याही चित्रात आढळणार नाही. पदराचा मागे रुळणाऱ्या शेवाचे एक टोक ती हाताभोवती गुंडाळेल आणि मगच खाली बसलेली दिसेल. ' दिल अपना प्रीत परायी 'मधे डॉक्टर तिला विचारतो, ' काश्मिरहून तुला काय आणू ? ' ' तिथं काय काय मिळते ? ' ही विचारते. ' काश्मिरला

स्वर्ग म्हणतात स्वर्ग !' डॉक्टर सांगतो. 'अच्छा ! स्वर्गात काय काय बरे मिळते ?' खोडकर प्रश्न टाकून डॉक्टरला निरुत्तर करताना मीनाकुमारीने असा खट्याळ कटाक्ष फेकला होता म्हणता ! तोवर 'विद्ध करणारा कटाक्ष' वगैरे वर्णन फक्त फडक्यांच्या कादंबरीत वाचले होते.

मीनाकुमारीने रंगवलेला प्रणयखंड ही तर हिंदी रजतपटावरची एक मधुमधुर, रसभरीत गोष्ट आहे. कमालीचा मोकळा प्रणयाभिनय करूनही ती त्यातली संयततेची गोडी हरवू द्यायची नाही. 'साहेब बीबी' मधली 'न जाओ सैंया' गीताच्या वेळी पतीला रिझवण्यासाठी तिने काय केले नाही ? त्याच्या केसातून बोटे फिरवण्यापासून त्याला फुले फेकून मारेपर्यंतची मदनाची सारी आयुधे ती वापरते. त्याच्या हातातल्या मदिरेला लाजवील अशी मादक धुंदी तिच्या नजरेत उसळत असते. 'आरती' मध्ये एक असाच उत्कट क्षण आहे. 'बार बार तोहे क्या समझाऊँ' याच गीतातल्या 'इन लहरोंपे दिल मेरा गया मचल मचल' या ओळीच्या वेळी 'मचल मचल'ची उचंबळलेली स्थिती दाखवण्यासाठी मीनाकुमारी एका लयीत मानेची मोठी मोहक हालचाल करते, त्यावेळा 'आरती' तल्याच एका गीतातले शब्द नकळत ओठावर येतात: 'गर्दन है एक झुकी हुई डाली गुलाबकी.'

'मझली दीदी' मध्ये ती पतीराजाची जेवणासाठी वाट पहात थांबलेली असते. तो येतो खूप उशिरा आणि तेही बाहेर जेवून ! मग ही जो त्रागा करते, जो त्रागा करते की तिच्या लटक्या रुसव्याने आपल्याच हृदयाची स्पंदनं वाढतात. 'सांझ और सवेरा' तले प्रणयप्रसंग तिने असेच खुलवले आहेत.

गाणी फक्त लता-आशांवर सोडून देऊन आपण ओठांची हालचाल करायची नसते, स्वतः त्या गीतांमधे डुबून जायचं असते, हा धडा मीनाकुमारीने स्वतःच्या अभिनयाने घालून दिला. अंगाई-गीते गाताना बाळाकडे पहाण्याऐवजी छताकडे टक लावणाऱ्या नायिका पाहिल्या, भजनांच्या वेळी कुठे बघावे ते न सुचल्यामुळे कॅमेऱ्याकडे पहाणाऱ्या नायिका आढळल्या, म्हणजे त्यांना 'सांझ और सवेरा' तल्या लोरीत किंवा 'काजल' मधले 'तोरा मन दर्पन' या भजनात कसा जीव ओतला आहे ते मुद्दाम पहायला लावावेसे वाटते

मीनाकुमारीचा आठवणीचा असा एकेक कण कंजुषाप्रमाणे जपत असतानाच, तिची भेट घेण्याचा मी एकदाही प्रयत्न केला नाही. न जाणो मनाने जपलेल्या तिच्या काव्यमय चित्रावर डाग तर पडणार नाही ना, अशी भीती मला वाटायची. मागे एकदा गीता दत्तची गाठ पडली होती. मनमोकळेपणाने बोलताबोलता तिने मधेच एकदम तोंडातल्या पानाची पिचकी

**प्रणय मीनाकुमारी असा रंगवायची**

टाकली आणि जमून आलेल्या भेटीचा सगळा बेरंग झाला. तेव्हाच पक्कं ठरवलं–मीनाकुमारीला बिलकुल भेटायचं नाही. तीही पट्टीची पान खाणारी होती, हे तुम्हाला ठाऊकच आहे (अर्थात् माझा आक्षेप पान खाण्यावर नाही; ते खाण्याच्या प्रकारावर आहे.)

तशी मीनाकुमारीच्या भेटीबाबत माझी थोडीशी मिजास होती. कुठेतरी शंभरजणांच्या गर्दीत शूटिंग बघायला जाऊन दुरूनच बघून समाधान मानणे मला मंजूर नव्हते. हां ! तिचा इंटरव्ह्यू घ्यायला मला आवडले असते. नव्हे, जर्नॅलिझमची परीक्षा पास झालो, तर पहिला प्रारंभ तिच्या मुलाखतीपासून करायचा, हे मी ठरवूनही टाकले होते. (जणू काय ते माझ्याच हातात होते !)

त्या अगोदर सलमा सिद्दीकी या सुप्रसिद्ध उर्दू लेखिकेचा मीनाकुमारीशी आपली पहिली भेट कशी झाली हे सांगणारा लेख वाचला होता.श्रावणाच्या सरीत न्हालेल्या एका सकाळी (मीनाकुमारीला भेटायला अगदी साजेशी वेळ ! ) सलमा तिच्या घरी गेली आणि त्या सकाळप्रमाणेच, नुकतेच न्हाऊन बाहेर पडलेली मीनाकुमारी तिला सामोरी आली. सलमाने लिहिलेय्, 'त्यानंतर खूपदा तिला भेटले. पण ती तिची ती एकच मुद्रा–दवबिंदूत न्हाऊन निथळलेली, सुकुमार मुद्रा स्मृतिशिंपल्यात बंदिस्त झालीय् !'

बस्स् बस्स् ! हे वाचताना मीनाकुमारीला सदेह न भेटताही मी भेटले होते. नाही म्हणायला एकदा फोनवर तिचा आवाज ऐकायला मिळाला होता. तिच्यावर लिहिलेल्या एका लेखाच्या बक्षिसाखातर, तिच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या माझ्या मैत्रिणीने कुठूनतरी तिचा फोननंबर मिळवून आणला होता. खरे तर शूटिंग चालू असताना तिला पहाणे काय किंवा फोनवर भेटणं काय– दोन्ही सारखेच होते. अखेर होय–नाही करता मी तो नंबर फिरवला. फोन घेणारी तिची बहीण फारशी शहाणी नव्हती म्हणून बरे ! एरवी 'टाइम्स ऑफ इंडिया'ची कचेरी एका दिवसात पुण्याला का हलली, असा तिला प्रश्न पडला असता तर आमचा निकालच लागणार होता. वर्तमानपत्रातून आलेला फोन झटकून टाकायचा नाही, एवढेच तिला कळत असावे. माझ्या हृदयाची धडधड आणखीच वाढवीत मीनाकुमारी फोनवर आली. प्रत्यक्ष माझ्याशी बोलण्यापूर्वी बहिणीशी तिने थोडी कुरकुर केली असावी. बहुधा नुकतीच ती शूटिंगहून परतली असावी, किंवा तिची बैठक मी मोडली असावी. स्वतः होऊनच मी फोन खाली ठेवणार, इतक्यात पलीकडून अतिशय नम्रपणे विचारणा झाली, 'कौन चाहिये आपको जी ?'

'मीनाजी'. आमची दररोज गाठभेट पडत्येय् अशा सुरात मी उत्तरले.

'कौन मीनाजी ?' तितक्याच मृदु आवाजात प्रश्न आला, आणि माझा बर्फ व्हायची वेळ आली. तिला विनोदबुद्धी चांगली आहे हे मी ऐकून होते. पण त्याचा प्रयोग माझ्यावर होईल

# नहीं बाबा, नहीं, आपको राँग नंबर मिल गया है ।

याची मला कल्पना नव्हती.

'आप मीनाजी ही तो बोल रही हैं ना?' मी धीर करून विचारले.

'नही बाबा, नही. माफ करना, आपको राँग नंबर मिल गया है.' आणि चपळाईने तिने फोन खाली ठेवला.

ते 'नहीं बाबा, नहीं' ऐकले आणि माझी खात्री पटली, मीनाकुमारीच माझ्याशी बोलत होती. तो आवाज, बोलण्याची ती ढब मी झोपेतही ओळखली असती. ते तीन शब्द माझ्या मनावर मोरपीस फिरवून गेले. त्या शब्दांच्या रेशमी स्पर्शाने आमच्यातले १२० मैलांचे अंतर एका झटक्यात तोडून टाकले होते. खरे म्हणजे तिने मला कटवले होते; पण किती गोडपणे! झटकन् फोन खाली ठेवतानाही फोनचा आवाज पलीकडून आला नव्हता, इतक्या अलगद तो ठेवला गेला होता. नाहीतर 'राँग नंबर' लागला की ज्या झटक्यात फोन खाली ठेवला जातो, तो खरे म्हणजे नाईलाजाने आपल्या डोक्याएवजी क्रेडलवर ठेवावा लागतोय् हे सांगून जातो. काय कारण होते तिला माझी माफी मागण्याचे, इतके आर्जवून बोलायचे? दिवसाकाठी असले छप्पन्न फोन तिला त्या काळी येत असणार! आणि अखेर मीनाकुमारी म्हणजे काय होती? आवाज आणि नजर यांना मिळालेले ते सदेह रूपच नव्हते काय?

'जवाब' किंवा 'पाकीजा'सारख्या एखाद्या चित्रपटात ती स्वतः लिहिलेले पत्र वाचते तेव्हा नजरेसमोर ती अर्थातच हजर नसते. पण त्या आवाजातून तिचे अस्तित्व जाणवते. नाही! तिचा आवाज मंजुळ नव्हता की सुरेल नव्हता. पण त्यात उत्कट जिवंतता होती, सच्चाई होती, मनःपूर्वकता होती त्या त्या शब्दांचा नाद, गंध आणि स्पर्श तिच्या उच्चारणातून जाणवे. बाकी बोलण्याचे काम तिची वाणी आणि नजर एकाच वेळी करीत. खूपदा नजर वाणीवर मातही करून जायची. इतके बोलके मौन रूपेरी पडद्यावर कधी अनुभवले नव्हते. ती बोलू लागली. म्हणजे वाटायचे, हिचे हृदय वितळून हिच्या बोलण्यात पाझरलेय्. आनंद असो, क्रोध असो, आवेग असो की उरी फुटणारे दुःख त्या त्या भावनांचे हृदयात लागलेले दीप तिच्या डोळ्यांत प्रकाशायचे. डोळे हे मीनाकुमारीच्या मायाजालातले पहिले आयुध होते. माणसाला काबीज करण्याचे.

समुद्रावर लाटा उठाव्यात आणि फुटाव्यात, त्या क्रमाने विश्वामित्री दुनियेतही भाराभार कलाकार येतात आणि जातात. लीला नायडू किंवा अजय सहानीसारखे गुणी कलाकारही इथे भरडले जातात. नटचांची सद्दी तर नटांहून लवकर संपते. या पार्श्वभूमीवर मीनाकुमारीने दोन दशके टिकाव

धरावा, ही असाधारण कामगिरी आहे, achievement आहे. याला कारण तिचे असामान्य अभिनयसामुर्थ्य तर आहेच; पण तिची संपूर्ण व्यावसायिक दृष्टी (Professional attitude) हेही आहे कॅमेऱ्यापुढे जाताना रागलोभ, चिंता-दु:ख, नाती-गोती, प्रेमप्रकरणे, फार काय मद्यपान देखील मीनाकुमारी फुंकरी-सारखे दूर उडवून लावी. अनेकदा स्टुडिओत जाताना देखील तिची अवस्था सैरभैर असे. पण गाडी स्टुडिओत शिर-ताच तिचा कायापालट होई. सेटवर आलेली मीनाकुमारी नेहमीची दक्ष कलाकारच वाटायची.

कोणती भूमिका आपल्याला फायदा मिळवून देईल याची तिला चांगली परख होती. धर्मेंद्रबरोबर तिचे नाव जोडले जाई, त्या काळातही 'काजल'-मध्ये त्याच्या बहिणीचे काम करायला ती कचरली नाही. त्या भूमिकेत नाविन्य नव्हते, पण अभिनयाच्या कलाकुसरीला वाव होता. तिने मीनाकुमारीला तिचे चौथे 'फिल्म फेअर' मिळवून दिले; तिच्या दूरदृष्टीचे इनाम तिला दिले. (विसाव्या शतकात, १९७२ सालात राजेश खन्नासारखा नट 'जया भादुरी-बरोबर एकदा भावाचे काम केले, आता तिचा नायक कसा बनू ?' अशी विधाने करतो तेव्हा अनेक चांगल्या, त्याच्या-योग्य असलेल्या भूमिका नाकारतो, हे त्याच्या लक्षात येईल का ?)

'स्टार' आणि 'अॅक्ट्रेस' या दोन्हींचा सुरेख समन्वय तिच्यात होता, म्हणूनही मीनाकुमारीचे स्थान अढळ राहिले. तिच्याबरोबर नायक कोण आहे वगैरे गोष्टींचा विचार न होता केवळ तिच्या नावावर चित्रपट विकले जायचे. कुणी एम्. राजन् किंवा प्रेमनाथ वा करण दिवाण असे जमाना संपलेले नटही तिच्या नायकांच्या यादीत आहेत. (चित्रपट – अनुक्रमे : 'सहारा', 'जागीर' व 'मधू.') प्रामुख्याने 'पुरुषाचे जग' समजल्या जाणाऱ्या चित्रसृष्टीत तिची ही कामगिरीही महत्त्वाची समजली जाईल.

चित्रपटांच्या या भाराभर संख्येनं मीनाकुमारीला हुकमी अभिनयाबद्दल, सातत्याने दर्जेदार कामगिरी बजावल्या-बद्दल पुरेपूर प्रशंसा मिळवून दिली, आणि 'टाइप' असल्याचा आरोपही. मला हा आरोप मान्य नाही. मीनाकुमारीने विनोदी भूमिकात लक्ष घातले नाही हे खरे. पण ज्या मोजक्या हास्यभूमिका तिच्या वाट्याला आल्या, त्यांमध्ये ती कमी पडल्याचेही आढळलं नाही. 'मिस् मेरी'तली संपूर्ण विनोदी भूमिका तिने छानच रंगवलीय्. 'कोहिनूर'मधे तिला वाव अगदं च थोडा. पण दिलीपकुमारला तिने उत्तम साथ दिली आहे. (खल-नायकाच्या हस्तकांच्या पाठीत दंडुका मारणारी आणि त्यांच्या अगोदर स्वत:च दचकून तीनताड् उडणारी मीनाकुमारी पहाताना वेगळीच गंमत वाटत होती.) अगदी करुणरसाला प्राधान्य देणाऱ्या भूमिकांमधेदेखील जेव्हा खेळकर क्षण वाट्याला आले, तेव्हा मीनाकुमारीने त्यांचे पूर्ण चीज केले. 'मैं चूप रहूँगी' मधल्या सुनील दत्तकडून द्राक्षांची भेट

नाकारताना 'ना! खट्टे है', म्हणून मिश्किलपणे तिने दिलेला टोमणा आठवा; 'आरती' आणि 'मझली दीदी'मधे आपल्या खाष्ट जावांना ती स्वत: थंड राहून कशी भडकवीत असते पहा; 'साँझ और सवेरा'मधली, खोटी डोकेदुखी ओढवून घेऊन पतीला घरी बोलावून घेणारी गौरी; 'दारू प्यायला कचरणाऱ्या या अज्ञ बालकाचे कसे होणार' म्हणून उसन्या गांभीर्याने ब्रह्मचाऱ्याला सहानुभूती दाखवणारी चित्रलेखा; मुलांचे भांडण मिटवायला म्हणून गेलेली आणि अखेर स्वतःच त्यांच्या उश्यांच्या फेकाफेकीत भाग घेणारी मीना...खेळकरपणाने तिने रंगवलेले असे कितीतरी प्रसंग सांगता येतील.

खेळकर प्रसंगावरून आठवलं, 'पूर्णिमा'मध्ये मीनाकुमारी आणि धर्मेंद्र यांच्यावर राधा-कृष्ण बनण्याचा प्रसंग आला होता. त्या वेळी त्यांची जोडी अगदी मुळगावकरांच्या राधा–कृष्णासारखी दिसत होती. राधा भरलेल्या अंगाची; कृष्ण बिचारा कृश! पण मीनाकुमारीच्या चेहेऱ्यावरचे प्रणयिनीचे भाव! इतके स्वप्नाळू, इतके मृदु! चित्रसृष्टीने राधेचे इतके गोड प्रतिबिंब दुसऱ्या कुणा नटीत पाहिलं नसेल.

'गोमतीके किनारे'मधे एक गोड प्रसंग आहे पहा. आपल्या मुलाकडून ती त्याचे गोड गुपित काढून घेते. 'अच्छा? तो लडकी है?'–ती लटकी नाराजी दाखवते. आणि मुलगा भांबावून गेला आहे असे पाहिल्यावर त्याला अधिकच गोंधळवून टाकते. 'सुंदर है? बहुत सुंदर है?' म्हणून प्रश्नांची एकदम फैर झाडून अखेर संमती देते. या क्षणी 'गेस हू इज कमिंग टू डिनर'मधल्या कॅथरिन हेप्बर्नची तिने आठवण करून दिली. त्या चित्रपटात असाच एक प्रसंग आहे. फक्त मुलाच्या ऐवजी तिथं मुलगी असते. हे साम्यही इथेच संपते. एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. तो प्रसंग उंचीवर न्यायला कॅथरिनला स्टॅन्ले क्रॅमरसारखा सिद्धहस्त दिग्दर्शक लाभला होता. मीनाकुमारी सावनकुमार सारख्या, दिग्दर्शनक्षेत्रात प्रथमच पाऊल टाकणाऱ्या नवख्याच्या हाताखाली काम करीत होती. 'She lived beyond the script' असा तिचा गौरव बी. आर. चोप्रा करतात, तो किती योग्य आहे याचा उत्तम पुरावा म्हणजे 'गोमती'. बाकी 'गोमती'च काय, ७७ चित्रपटांपैकी 'मझू', 'चाँद' 'सहारा' आणि तत्सम असंख्य चित्रपट म्हणजे मीनाकुमारीने एकाकीपणे झुंजवलेले किल्ले आहेत. मामुली कथा, निष्प्रभ दिग्दर्शन, कनिष्ठ नायक वा सुमार तांत्रिक अंगे – या सगळ्यांवर तिचा अस्सल अभिनय मात करतो. तिच्या भूमिकांना शोभणाऱ्या आर्य स्त्रीच्या सोशिकपणाने ती ह्या असल्या कृत्रिम भूमिकांनाही जीवन द्यायची.

मीनाकुमारीला 'टाइप' म्हणायचे तर अशोककुमारसारखा एखादा अपवाद वगळता, हिंदी चित्रसृष्टीतल्या सगळ्या कलाकारांना 'टाइप' म्हणावे लागेल.

# राधा सलुजा, रेहाना सुलताना यांचा आदर्श मीनाकुमारीच

दोष त्यांचा नाही. कल्पनादरिद्री निर्मात्यांचा आहे. कलावंतांच्या लोकप्रिय प्रतिमांवर चित्रपट विकणाऱ्या त्यांच्या बाजारी वृत्तीला जुन्याच नव्हे तर नव्या पिढीतल्या रेहाना सुलतान आणि जया भादुरीसारखे गुणी कलाकार बळी पडतात आणि जोवर कलाकारांना साजणाऱ्या भूमिका लिहून घेण्याऐवजी, भूमिकांना अनुरूप असणारे कलाकार निवडण्याची वृत्ती वाढत नाही तोवर गुणी कलाकारांचे अभिनयसामर्थ्य असेच धो धो वहाणाऱ्या नळाच्या पाण्यासारखे फुकट जाणार आहे.

मीनाकुमारी 'टाइप' असती तर इतका दीर्घ कालखंड गाजवूच शकली नसती. चारपाच वर्षांतच प्रेक्षकांनी तिला पडद्यामागची वाट दाखवली असती. कुणाला कुठे ठेवायचे, कुणाला कधी उचलायचे हे प्रेक्षकांना चांगले कळते. म्हणून तर दिलीपकुमारच्या नकलेचा ते 'सिल्व्हर जुबिली स्टार' म्हणून गौरव करतात; पण पारितोषिकाची पसंती त्याला कधीच देत नाहीत.

एक अगदी साधी गोष्ट बघा. 'फिल्म इन्स्टिटय़ूट'मधून अभिनयाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेल्या, उन्मादक भूमिकांसाठी प्रसिद्ध असलेल्या रेहाना सुलतान आणि राधा सलुजा या नव्या नटयांपुढेही आदर्श आहे मीनाकुमारीचा. 'टाइप' असती तर ती 'क्रेझ' ठरली असती; 'ऑल टाइम ग्रेट आर्टिस्ट' ठरली नसती.

इतके करूनही कुणाला तिला 'टाइप' ठरवण्याचा हट्ट असेल तर मला त्याची कीव वाटण्यापलीकडे काही वाटणार नाही. निदान 'स्पेशलायझेशन'च्या युगात तरी या आरोपाचे वाईट वाटायला नको. मराठी उत्तम येणाऱ्या विद्यार्थ्याचे गणित डावे असेल तर त्याला कुणी कमी मानीत नाही काही!

बाकीच्यांचे राहो, पण ए. हमीमुद्दीनसारख्या बुद्धिवंत टीकाकाराकडून 'मीनाकुमारी नूतनच्या 'बंदिनी'-सारखी वा वहिदाच्या 'गाइड'सारखी भूमिका वठवू शकत नसे' असले उथळ आरोप होतात तेव्हा आश्चर्य वाटते. मीनाकुमारी तशा भूमिका वठवू शकली नसती हे खरेच. पण तिच्या 'छोटी बहू'-सारखी किंवा 'मेरे अपने'सारखी भूमिका नूतन वा वहीदा करून दाखवीत होत्या का, असे नाही का म्हणता येणार? पण मला असे म्हणावेसे वाटत नाही. कारण या तिघीही अभिनेत्री मला श्रेष्ठ दर्जाच्या वाटतात. त्यांचे नंबर लावून त्यांना एकाच साच्यात कशासाठी बसवायचे? त्या तिघींनी एकमेकींसारख्या भूमिका वठवल्या असत्या तर त्यांची वेगळी गरज भासतीच कशाला? ह्या तिघींचीही खास वेगवेगळी वैशिष्टये आहेत, म्हणून तर तिघींचीही नावे

श्रेष्ठांच्या मालिकेत आहेत. वहीदा एखाद्यावेळेस मीनाकुमारीच्या दोन पावले पुढे जाईल, या मताशी सहमत होण्यात-ही मला कमीपणा वाटत नाही. पण अखेर सर्वश्रेष्ठत्वाचा मुकुट कुणाच्या शिरी घालायचा हा वैयक्तिक आवडीचा प्रश्न नाही का? कलासृष्टी ही एखाद्या भरगच्च उद्यानासारखी आहे—निदान असावी. सगळी फुले एका रंगाची, एका तऱ्हेची झाली तर उद्यानाची शोभा ती काय राहिली? तथाकथित टीकाकारांना नाही तरी प्रेक्षकांना हे नेहमी पटले आणि म्हणून तिघींनाही रसिकांनी तोंड भरभरून प्रशंसा बहाल केली.

बाकी नूतन आणि वहीदा मीना-कुमारीपेक्षा नशीबवान् आहेत यात शंका नाही. त्यांच्या गुणांना योग्य कोंदण अगदी प्रारंभापासून मिळत गेले. नूतनची 'करीअर' वाढवायला शोभना समर्थसारखी चतुर अभिनेत्री माता होती. वहीदा तर एका रत्नपारख्याच्या हातात पडली उलट मीनाकुमारीने कितीतरी वर्षे उमेदवारी केली. अनेक फालतु स्टंट वा पौराणिक चित्रपटात, सामान्य दिग्दर्शकांच्या हाताखाली तिच्या अभिनयशक्तीचा दुरुपयोग झाला. हे अर्थात् एकेकाचे नशीब आहे.

'बैजूबावरा' आणि 'परिणिता' हे मीनाकुमारीचे लागोपाठचे चित्रपट पाहिले म्हणजे तिची सुप्त अभिनयशक्ती कशी विकसित होत गेली याची कल्पना येते. 'बैजूबावरा'करता आपल्याला मिळालेले 'फिल्मफेअर अवॉर्ड' हा 'अपघात' होता, हे स्वतः मीनाकुमारी-नेही कबूल केले आहे. (कितीसे कला-कार इतका प्रामाणिकपणा दाखव-तील?) गौरीच्या त्या कामात तोंडाचा चंबू करून लाडिकपणे बोलणे, रुसणे नि विरहाची गाणी गाणे यापेक्षा दुसरे काय होते? त्या भूमिकेला परीक्षकांनी बक्षिस दिले ते बहुधा मीनाकुमारीतल्या मार्दवावर खूष होऊन. तसे असेल तर ते बक्षीस अनाठायी नव्हते. गौरीच्या त्या भूमिकेला उंची नव्हती नि खोलीही. होता फक्त तारुण्याच्या गोडव्याचा सुगंध. मीनाकुमारीने तो प्रेक्षकांपर्यंत बरोबर पोचवला.

यानंतर 'परिणिता'मधे मात्र नवीच मीनाकुमारी आपल्याला भेटते. या मीनाकुमारीत आत्मविश्वास दिसतो; स्वाभाविकपणे संवाद कसे बोलावेत याची समज दिसते. इथे मुद्राभिनय ती 'बैजूबावरा'इतके सढळ वापरत नाही. मोजके आणि अचूक वापरते. ही किमया तिला साध्य झाली बिमल रॉय आणि अशोककुमार यांच्या साहाय्याने. सच्च्या कलाकाराच्या उमदेपणाने हे ऋण मीनाकुमारीने वेळोवेळी जाहीरपणे मान्य केले.

'परिणिता'मुळे लागलेला हा अभि-नयशोध म्हणजे कस्तुरीमृगाला आपल्या-जवळच्या कस्तुरीचा शोध लागण्या-

## ते फिल्मफेअर ॲवॉर्ड म्हणजे एक अपघात होता

सारखेच होते. या चित्रपटानंतर मीनाकुमारीने मागे वळून पाहिले नाही. या पूर्वीही चित्रपटात ती मन लावून काम करायची. पण ते सखोल नव्हते. दिग्दर्शकाच्या सूचनांची ती अंमलबजावणी असे. आता ती स्थिती राहिली नव्हती. आता कलेचा उपयोग दोन घास पोटात ढकलण्यासाठी नव्हता. यापुढे तिची कला आणि जीवन वेगळी रहाणारच नव्हती. आपल्या सगळ्या आंतरिक शक्ती तिने आता अभिनयावर केंद्रित केल्या. याचक्षणी हिंदी रजतपटाला एक श्रेष्ठ कलाकार मिळण्याचा सुवर्णक्षण होता. या पुढचा मीनाकुमारीचा पुढच्या हरेक चित्रपटागणिकचा कलाविष्कार म्हणजे उत्स्फूर्त कलेचा अभिजात नमुना होता.

'साहेब-बीबी-गुलाम'च्या पहिल्या दिवशी रहमान मोठ्या आत्मविश्वासाने सेटवर आला होता. पण पहिल्याच शॉटमधे मीनाकुमारीच्या तयारीने तो इतका हबकून गेला, की अब्रार अल्वीला घाईघाईने कोपऱ्यात नेऊन त्याने सांगितले, 'उद्यापासून मी मनाजोगती रिहर्सल झाल्याशिवाय कॅमेऱ्यासमोर येणार नाही!' उमद्या मनाच्या रहमानने मीनाकुमारीच्या हयातीतच ही गोष्ट जाहीरपणे सांगितली होती. या कौतुकामागे तसेच कारण होते. या घटनेच्या १२ वर्षे अगोदर मीनाकुमारीने त्याच्याबरोबर 'मदहोश'मधे काम केले होते. तिची अर्थातच दुय्यम भूमिका होती. त्या वेळची लाजाळू मीनाकुमारी आणि 'साहेब बीबी'त आत्मविश्वासाने फुललेली मीनाकुमारी...सुरवंटाचे पाखरू झालेले बघून रहमान चकित झाला होता.

हिंदी चित्रपटानं तिला वारंवार डोळे पुशीत, देवाची नाहीतर अन्य कुणाची करुणा भाकायला का लावलं कोण जाणे! एका विशिष्ट वयानंतर ह्या भाबड्या भूमिका आपल्याला बिलकूल पटेनाशा होतात. ह्या असल्या कमालीच्या अवास्तव नि तकलादू भूमिका विश्वासनीय करण्याची तिची हातोटी मात्र अनन्यसाधारण होती. ती बेडौल झाल्यावर तिच्या वाटच्या खास भूमिका निर्मात्यांनी माला सिन्हा आणि नूतन यांना देऊन पाहिल्या. माला सिन्हाची बातच सोडा, नूतनसारखी समर्थ अभिनेत्रीही मीनाकुमारीची जागा घेऊ शकली नाही. मनाच्या कप्प्यांना हात घालणाऱ्या अशा मृदुमुलायम भूमिकांशी, भावनांची वादळे उठवणाऱ्या झंझावाती क्षणांशी प्रेक्षकांनी मीनाकुमारीचं मनोमन नातं मानलं होतं. तिला त्या भूमिकांत पहायला मिळेनासं झाल्यावर त्या प्रकारच्या भूमिकांची लोकप्रियताच कमी झाली. (दरम्यान सत्तरीचा नव्या लाटेचा जमानाही सुरू झाला होता म्हणा.)

स्वतः मीनाकुमारीची 'टाइप'वरील आक्षेपाला काय प्रतिक्रिया होती. 'माधुरी' पाक्षिकाच्या 'बातचित' स्तंभामधे कुणीतरी तिला तसा सरळच सवाल टाकला होता. "माझ्यावर कुणाला 'टाईप'चा आरोप करायचा असेल तर त्याची मर्जी!" तिने म्हटले

होते. "मला मात्र त्याचे दुःख होत नाही. शोकान्त भूमिका मला मनापासून आवडतात. पण विनोदी भूमिका करायच्या नाहीत असेही मी कधी ठरवलेले नाही 'ट्रॅजेडी' हा मला वाटते माझा 'स्पेशलाइज्ड ॲप्रोच' आहे. प्रत्येक साहित्यकाराची स्वतःची शैली असते. एकसूर न होऊ देता तो अनेक विषय त्या माध्यमाद्वारा हाताळण्याचा प्रयत्न करतो. आम्हा कलाकारांची स्थिती याहून काय वेगळी असते? आता 'ट्रॅजडी रोल्स' मला का आवडतात म्हणाल तर अश्रूंची, दुःखांची भाषा मला लवकर समजते. त्या भाषेत संवाद करणे सोपे जाते."

बिंदू या आजच्या आघाडीवरच्या अभिनेत्रीला तिने दिलेला सल्ला तिचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट करतो. 'त्या त्याच भूमिका कराव्या लागल्यामुळे अभिनयाचा कंटाळा येऊ लागला आहे.' बिंदूने आपली व्यथा तिच्याजवळ व्यक्त केली. "छ छ! असा कंटाळा येऊन कसे चालेल?" मीनाकुमारीने तिची समजूत काढीत म्हटले, "जे तुझ्या वाट्याला येते ते तू उत्तम रीतीने प्रगट केले पाहिजेस. मग भले ती एकाच प्रकारची कामे का असेनात! असे पहा, चांगला जोडा कोणता? तर पायाला फिट् बसतो तो! आपलाच आपल्या अभिनयावर, भूमिकेवर विश्वास नसेल तर चांगला 'परफॉर्मन्स' देणे कसे शक्य होईल?"

अभिनयाच्या प्रांतातली ही मुशाफरी म्हणजे मीनाकुमारीला कुण्या राजपुत्राने लालपरीच्या शोधार्थ केलेल्या वेड्या प्रवासाची कहाणी वाटे. त्या राजपुत्राला काही ती परी सापडत नाही आणि त्याचा प्रवास कधी संपत नाही. कलाकार आणि व्यक्तिरेखांचे हेच नाते ती मानायची. मीनाकुमारीबरोबरची ही मुशाफरी प्रेक्षकांनाही रोमहर्षक वाटली यात नवल नाही.

अभिनयाचे तिचे असे काही खास तंत्र होते का? प्रत्येक भूमिकेत एवढे बेमालूम मिसळून जायला तिला कसे काय जमत असे? तिला प्राप्त झालेल्या अभिनयसिद्धीचा गुरुमंत्र काय होता?

जी व्यक्तिरेखा साकार करायला मिळेल तिचे सुखदुःख कलाकाराने स्वतः भोगले पाहिजे, असे तिला वाटे. भावनांची अभिव्यक्ती ही तिच्या मते जाहीर प्रदर्शन नव्हते. एखादे दृश्य वठवायचे तर ते बाह्यतः आपल्यावर ओढून घेणे तिला मंजूर नसे. आपण त्या दृश्यात उतरले पाहिजे, आपल्या भावना त्याला द्यायला पाहिजेत, असे तिला वाटे.

'मीनाजवळ एकेका सीनची चारचार इंटरप्रिटेशन्स असायची.' हृषिकेश मुखर्जींना मी तिच्या अभिनयाचे वैशिष्टय विचारले, तेव्हा ते उत्तरले. 'शी वॉज् सिम्पली ग्रेट! मात्र एक व्यथा सांगतो. तिचा 'बेस्ट परफॉर्मन्स'

---

**तिचा बेस्ट परफॉर्मन्स मला मिळाला नाही —हृषिकेश**

---

मला मिळाला नाही. बिमल रॉयबरोबरचा तिचा 'परिणिता' मी फार फार मानतो. इट वॉज अॅन इन्स्पायर्ड परफॉर्मन्स! याउलट 'मझली दीदी मधे आम्ही एकत्र आलो तेव्हा ती फार वैफल्यग्रस्त झाली होती. तिचे स्टॅंडर्ड तिने कधीच खाली येऊ दिले नाही, खरे. पण 'मझली दीदी'चा रंग जमला नाही खरा!'

होय! देहयष्टीकडे दुर्लक्ष हे मीनाकुमारीच्या सबंध अभिनय कारकीर्दीतले मोठेच वैगुण्य आहे. कलाकार देखणा नाहीतरी नीटनेटका दिसला तरच त्याच्या अभिनयाचा प्रभाव पडतो. कृश आणि निस्तेज वाटणारी 'दायरा—बादबान'मधली मीनाकुमारी, भरल्या अंगलटीची, सुकुमार चेहऱ्याची 'आरती, दिल एक मंदिर'ची मीनाकुमारी आणि अनियमितपणाच्या रस्त्यावरून आयुष्याच्या गाडीने बेलगाम दौड केल्यावरची 'मझली दीदी'तली मीनाकुमारी! जागोजाग फुललेल्या पापडासारखे बेढब शरीर; डोळे आणि गाल एकमेकात विलीन होण्याइतकी झालेली मांसवृद्धी! मुद्राभिव्यक्ती हे हातखंडा वैशिष्टच साकार करायला त्या मांसभऱ्या चेहऱ्यावर जागाच होती कुठे? त्या वेळच्या मीनाकुमारीला आम्ही पडद्यावर पाहिले–नव्हे, साहिले, ही तिची पूर्वपुण्याई! बाळ गंधर्वांचे नव्हाळीचे रूप आठवीत त्यांचे चहाते त्यांची साठीतली नाटके पहायचे म्हणे! मीनाकुमारीच्या चहात्यांच्या एकनिष्ठ प्रेमाचे स्वरूप याहून वेगळे नव्हते.

'मेरे अपने'मधे मीनाकुमारीकडून अविस्मरणीय व्यक्तिरेखा साकार करून घेणाऱ्या गुलजारना ती सर्वोत्कृष्ट अभिनेत्री वाटावी हे ओघानेच आले. त्यांच्या मते 'मीनाची ग्रहणशक्ती आश्चर्यकारक होती. दिग्दर्शकाने सांगितलेला सीन ती जसाच्या तसा 'अॅब्सॉर्ब' करायची'

'मीनाकुमारीची समज असाधारण होती; चोखंदळपणा, जिवापाड श्रम यांच्या जोडीला प्रत्येक शॉटमधे ती जिवंतपणा आणायची.' मीनाकुमारीबद्दल हे मत बोलून दाखवून बी. आर. चोप्रांनी चक्क बॉंबगोळा टाकला: 'सेक्स'चे प्रेझेंटेशन तिच्याइतके उत्तम, पडद्यावर कुणीही दिलेलं नाही.'

'पण तिच्या भूमिका तर नेहेमी अनग्लॅमरस...' माझं वाक्य पुरे व्हायच्या आत बी. आर. नं. स्पष्टीकरण दिले: 'सेक्स ही सुंदर भावना आहे, नैसर्गिक प्रेरणा आहे; नग्न देहदर्शन नव्हे, याची जाणीव तिच्या प्रणयदृश्यातून व्हायची. या एकाच विशिष्ट भावनेचे इतके रंग आहेत! 'दुश्मन'मधला तिचा रेप् सीन पहा. काय एक्स्प्रेशन दिलंय् तिनं! मोस्ट नॅचरल!'

मीनाकुमारीहून अभिनयात सरस असा कलाकार कदाचित् भविष्यात होईलही. तिच्याइतका लोकप्रीय कलाकार होणे मात्र दुर्मिळ आहे. 'पाकीजा' चालू असताना तिच्या मृत्यूची बातमी समजल्यावर पुण्याच्या 'नटराज'मधे प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे मौन पाळून तिला श्रद्धांजली वाहिली. चित्रपटांशी संबंधित नसणाऱ्या वृत्तपत्रांनी, नि लेखकांनी

## बस्स ? लोक दिल्ली-आग्र्याहून व आफ्रिकेतूनही येतात

तिच्यावर लेख-अग्रलेख लिहिले. चौदा भाषांमधले एकही प्रकाशन असं नसेल की ज्यानं तिला भरभरून शब्द वाहिले नसतील. मुंबईत असताना मझगाव-मधल्या रहिमतबाग कबरस्तानाकडे सहज म्हणून आम्ही पाय वळवले. (समोरच्या हॉटेलमधून त्याच क्षणी 'यूं ही कोई मिल गया था' लागावं, हा शुद्ध 'पाकीजा'मधे शोभावा असा योगायोग नाही का ?) एका झाडाच्या छायेखाली निळं मखमली कफन पांघरून बसलेल्या तिच्या कबरीवर फुलांचा, धुपाचा, मेणबत्त्यांचा आणि अगर-बत्त्यांचा ढीग पाहिला, आणि आम्ही खजिल झालो. किमान एखाद्या फुलाचे तिचे देणे आम्ही चुकते करायला हवे होते. ते दृश्य बघून मला एकदम 'साहब बीबी'तल्या एका प्रसंगाची याद आली. अंगावर काटा आणणाऱ्या त्या संवादाला आपल्या भावपूर्ण कंठा-तून गद्यकाव्याचा साज चढवताना छोटी बहू भूतनाथला म्हणाली होती, 'मेरे मरनेके बाद मुझे इतना सजाना... इतना सजा देना रे...' (तिची नजर आणि आवाज केव्हाच अंतराळापल्याड पोचले होते.)

तिच्यावर वेडे प्रेम करणाऱ्या सगळ्या भूतनाथांनी आपल्या छोटी बहूची इच्छा इमानाने पूर्ण केली होती !

योगायोग पहा, तिच्या शेवटच्या चित्रपटातले सर्वच प्रसंग कबरस्तानाशी जाऊन भिडतात. 'पाकीजा'त तिने 'मुझे कब्रस्तान ले चलो !' म्हणून आर्त मागणी केली होती. 'मेरे अपने'त ती शेवटी ॲम्ब्युलन्समधून मिटल्या डोळ्यांनी गेली होती...

कबरस्तानाच्या रखवालदारानं विचा-रले, 'कुठून आलात ?' 'पुण्याहून' म्हटल्यावर तो निराश स्वरात उत्तरला, 'बस्स् ? लोक दिल्ली, आग्र्याहून आणि आफ्रिकेतूनही येतात.'

रहिमतबागच्या आसपासची पोरे 'मीनाजी'वर बेहद्द खूष दिसली. तिची कबर दाखवण्याच्या निमित्ताने दररोज त्यांना चिल्लर कमाई होत होती ना !

मीनाकुमारी खरोखरीची 'जनतेची कलाकार' होती. इतकी आपुलकी तिच्याबद्दल लोकांना का वाटायची ? 'ती साक्षात् भारतीय स्त्री पडद्यावर जगली' वगैरे विधाने ढोबळ वाटतात. ती जगली त्या कथा आणि व्यथा हाडा-मांसाच्या स्त्रीच्या होत्या. सार्वत्रिक स्वरूपाच्या होत्या. पाण्यावर चमकणाऱ्या सूर्यकिरणांप्रमाणे तिच्या नितळ नज-रेच्या डोहात तरळणाऱ्या अश्रूत आम्हाला आमच्याच दुःखांचे चेहरे दिसायचे. प्रौढ वयाची, शिक्षणाची कुंपणे पडलेल्या आमच्या अश्रूंच्या पापण्यावरचे पडदे ती थिएटरातल्या अंधारात उलगडा-यची. आमच्याकरता हसणारे–आम्हाला हसवणारे कलाकार खूप होते. पण रडणारी मीनाकुमारी एखादीच होती.

'साहब बीबी' तिच्या मृत्यूनंतर पाहिला तेव्हाची गोष्ट. पतीनं घराण्यातल्या इतर बायकांशी तुलना केल्यावर छोटी बहू क्रुद्ध झाली. बघताबघता तिच्या नजरेतला स्निग्धांश वितळून तिथं निखारे धुमसू लागले. 'क्या दिया है तुमने मुझे ?' तिनं फाटलेल्या स्वरात विचारले, 'मुझे माँ कहकर पुकारनेवाला कोई...'

बस्स् ! ते जीवघेणे वाक्य मीनाकुमारीने हेतुत: तिथच अर्धवट सोडून दिले, आणि त्याच क्षणी माझ्या हातावर एक घामेजलेला हात पडला. मी दचकून पाहिले. माझ्या शजारी बसलेली ती मध्यमवयीन स्त्री पडद्यावरच्या छोट्या बहुप्रमाणेच आनखशिखांत कापत होती. त्या दोघींच्या दुःखाची जात एकच होती, हे उघड होते. Meenakumari never speaks; she communicates, imparts, transmits her thoughts' असे अभिप्राय ती का मिळवायची हे तेव्हा कळले. अशा बेभान क्षणी तिचा आवाज सदोष वाटावा अशा पातळीवर गेला तरी खटकायचा नाही. कारण तो फार उत्कट, फार खरा वाटायचा.

'दिल एक मंदिर'मधे पतीची शुश्रूषा करताना ती कधी आर्जवे करीत होती, कधी त्याला दटावीत होती, त्याला एवढेसे काही झाले तरी डॉक्टरकडं धाव घेत होती. माझ्या डोळ्यासमोर 'जहांगीर नर्स होम'मधले माझे अण्णा दिसत होते आणि जिवापाड त्यांची शुश्रुषा करणारी आई...

'गोमतीके किनारे'त तिचा मुलगा मोठा इंजीनीयर होतो, त्याचे लग्न ठरते. सुखाच्या त्या अत्युच्च क्षणी ती देवासमोर अश्रू भरल्या डोळ्यांनी बसली होती. गेल्या तीन वर्षांत आमच्या घरी हेच दृश्य तीनदा घडलं होतं. तीन वेळा सनया दारात वाजत होत्या आणि आई देवघरात....

कारुण्याला मीनाकुमारी अशी लाडक्या सोनुल्यासारखी अंगावर मुक्तपणे बागडू द्यायची. तळहातावरच्या फोडासारखे त्याला जपायची. तिच्या मुद्रेवर कारुण्य कधी बेगडी वाटलं नाही, कुरूप वाटलं नाही. तिच्या अस्तित्वात ते काव्य बनून मिसळून गलं.

काव्यावरून आठवण झाली.

आपल्या कवितांसारखंच जीवन मीनाकुमारी जगली म्हणायची. छोटंसं, आत्मकेंद्री, थोडक्यात बरंच काही सांगून जाणारं आणि उत्कट.

---

कसं होतं तिचं हे काव्यजीवन ?
सांगते—

उत्तरार्ध
पुढील
अंकी.

---

अन हे सगळं जर असंच चालू
रहाणार असेल तर मग पुन्हा
चार वर्षांनी, पाच वर्षांनी
केव्हातरी पण नक्की दुष्काळ
पुन्हा पडेल....

रघू दंडवते
अशोक शहाणे

---

## पुढील अंकी....

दुःख दुसऱ्याचे जाणावे।
ऐकोन तरी वाटून घ्यावे।
बरे वाईट सोसावे।
समुदायाचे ॥

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**